मेहता मराठी ग्रंथजगत

मे २०१० | किंमत १५ रुपये

अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले
दर्जेदार मासिक

'शांताराम'चे प्रकाशन

'शांताराम' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता, चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी, लेखक ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट, अनुवादिका अपर्णा वेलणकर आणि रॉबर्ट यांच्या पत्नी प्रिन्सेस्.

◆ मे २०१०
◆ वर्ष दहावे
◆ अंक पाचवा

मेहता मराठी ग्रंथजगत

— अनुक्रमणिका —

संपादकीय	४
साहित्यवार्ता	१४
पुस्तक परिचय	
क्रायसिस : अनु.डॉ. प्रमोद जोगळेकर	५८
प्रस्थान : रेखा बैजल	६२
''मी अनीता राकेश सांगतेय...'' : अनु. रजनी भागवत	७४
हिरॉईन ऑफ द डेझर्ट : अनु. शोभना शिकनीस	८४
पुरस्कार	९३
वाचकांचा प्रतिसाद	९८
श्रद्धांजली	१०१
बालनगरी	१०२

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२

Email - info@mehtapublishinghouse.com
Website - www.mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु. ३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

संमेलन - एक यशस्वी आयोजन

पुण्यात झालेले ८३ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन हे अनेक नव्या कल्पना यशस्वीपणे प्रत्यक्षात आणणारे एक संस्मरणीय संमेलन म्हणून रसिकांच्या मनीमानसी रेंगाळत राहील. निधी संकलनाची अमाप क्षमता असलेले डॉ. सतीश देसाई, उल्हास पवार यांच्यासारखे उत्साही आयोजक या संमेलनाचे निमंत्रक. त्यांनी एक कोटीचा खर्च आणि किमान एक कोटीची भावी वाङ्मयीन कार्यासाठी बेगमी असा भव्य संकल्प आरंभीच जाहीर केल्याने या संमेलनाचे एकूणच स्वरूप व्यापक राहणार याची तुतारीच फुंकली. राज्य सरकार संमेलनाला २५ लाखांचे अनुदान देते. या निधीसंकलननिपुण निमंत्रकांनी पुणे महापालिकेकडून त्याच्या दुप्पट म्हणजे एक्कावन्न लाखांचा धनादेश त्याआधीच मिळवला. वीस-पंचवीस लाख देणारे प्रायोजकही धुंडाळले. माणिकचंद जर्दाचा वीस लाखांचा प्रायोजकत्वाचा प्रस्ताव डॉ. अभय बंग यांच्या टीकेमुळे बासनात टाकला तर त्यापेक्षा जास्त निधी देणारे प्रायोजक पुढे सरसावले...हे दृश्य मराठी साहित्य संमेलनाच्या संदर्भात अभूतपूर्वच म्हणायला हवे. योजकस्तत्र दुर्लभ: हे याबाबत नि:संशय लागू पडते. निधीचा तोटा नसल्याने या साहित्य संमेलनाच्या आयोजनात काटकसरीचा विचार करण्याची गरज भासली नाही. संमेलनासाठी सर परशुराम भाऊ महाविद्यालयाचे प्रशस्त मैदान मुक्कर करण्यात आले; त्यामुळे मुख्य मंडप एक लाख चौरस फुटांचा, १०हजार खुर्च्या सामावून घेणारा उभारण्यात आला. परिसंवादासारख्या कार्यक्रमांसाठी दुसरा छोटा मंडप, हौशी कवींसाठी कविकट्टा मंडप, भोजन व्यवस्थेसाठी मंडप आणि तीनशेवर स्टॉल्सचे ग्रंथप्रदर्शन हे सर्व या मैदानावर सुखेनैव सामावून घेण्यात कसलीच अडचण नव्हती. मंडपाची उभारणी अत्याधुनिक तंत्राने केल्याने वर पत्रा, संपूर्ण आच्छादन, जमिनीवर संपूर्ण मॅट्रेस, धूळ-ऊन-पाऊस यांच्यापासून सुरक्षितता यामुळे प्रथमदर्शनीच रसिकांवर प्रभाव पडणे स्वाभाविक होते. पुस्तक प्रदर्शनाची उभारणी इतकी चांगली याआधी कुठल्याही साहित्यसंमेलनात नव्हती. लहान लहान गल्ल्या केल्याने एका दृष्टिक्षेपात सर्व स्टॉल्स येणे शक्य नव्हते, पण तरीही ग्रंथप्रेमींची गर्दी बहुतेक स्टॉलवर चांगली होती. चार पेक्षा जास्त स्टॉल कोणाला द्यायचे नाहीत असा धोरणात्मक निर्णय आयोजकांनी का घेतला हे एक कोडे होते. त्यामुळे दर संमेलनात

आठ दहा स्टॉल्स घेऊन हजारो पुस्तकांची मांडणी करण्यासाठी नावाजलेल्या प्रकाशक-विक्रेत्यांची यावेळी कुचंबणा झाली. मेहता पब्लिशिंग हाऊस, अक्षरधारा, शुभम साहित्य वगैरेंनी त्यामुळे आयोजकांकडे नाराजी व्यक्त केली. त्यांना जादा स्टॉल देण्याची तयारी आयोजकांनी ऐनवेळी दाखवली; परंतु स्टॉल्सची सोडत आधीच काढण्यात आलेली असल्याने आणि आधी जाहीर केलेल्या मूळ नियम-अटींची पायमल्ली होऊ नये असा आग्रह बहुसंख्य स्टॉलवाल्यांनी धरल्याने ऐन उद्घाटनाच्या वेळी आयोजकांना माघार घेणे क्रमप्राप्त ठरले. ग्रंथप्रदर्शनाच्या संदर्भातील घोळ प्रत्येक संमेलनात वादविषय ठरतो. इतक्या सुंदर व सुविहीत ग्रंथप्रदर्शनाच्या बाबतीत असा गोंधळ टाळता आला असता तर बरे झाले असते. चारपेक्षा जास्त स्टॉल देण्यात येणार नाहीत या सारखे नियम अवास्तव व अनावश्यक आहेत. ज्यांची पुस्तकांची संख्या मोठी आहे त्यांना अधिक स्टॉल्स लागतात; त्याप्रमाणे दिले पाहिजेत. परंतु तसे व्यावहारिक व न्याय्य धोरण न ठेवल्याने अकारण तणाव निर्माण होतो. तो टाळला गेला पाहिजे.

या संमेलनात कार्यक्रमांचीही रेलचेल होती. 'संमेलनाआधीचे संमेलन' या अभिनव उपक्रमामुळे एक महिना आधीपासूनच वेगवेगळ्या प्रकारचे पंधरा वीस कार्यक्रम झाले. शाळाशाळांमध्ये 'लेखक तुमच्या भेटीला' कार्यक्रमाअंतर्गत मुलामुलींना साहित्यिकांशी गप्पागोष्टी करण्याची संधी मिळाली. 'दहा रुपये संमेलनाला' या उपक्रमाद्वारे सर्वसामान्य पुणेकरांना संमेलनाला आर्थिक हातभार लावण्याचा आनंद घेता आला. स्मरणिकेचे प्रकाशन एक आठवडा आधी करून एक नवा पायंडा पाडण्यात आला. मात्र साहित्य संमेलनाची स्मरणिका आणि तिच्यात महामंडळ, पुण्यातील आधाची संमेलने, पुण्यनगरी,संमेलनाचे अध्यक्ष यांच्या विषयी काहीच मजकूर नाही हेही या स्मरणिकेचे वैशिष्ट्य मानायला हवे का? 'गेल्या दशकातले मराठी साहित्य' याबद्दल वाङ्मयप्रकारानुसार धावती टिकाटिपण्णी करणारे वीस बावीस लेख एकत्र केल्याने या स्मरणिकेला संदर्भ पुस्तकाचे मोल लाभायला हरकत नाही. परंतु बरेचसे लेख शेरेबाजीच्या पातळीवरच घोटाळत राहिल्याने चोखंदळ वाचकांची निराशा झाली असणार.

या संमेलनाला रसिकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती. अमिताभ बच्चनची उपस्थिती हे संमेलनाचे मोठे आकर्षण ठरले. त्याला पाहण्यासाठी, त्याचे बोलणे ऐकण्यासाठी तुफान गर्दी झाली. मंडपाबाहेरही हजारो रसिक मोठ्या पडद्यावरून त्याच्या सान्निध्याचा अनुभव घेत होते. अमिताभच्या उपस्थितीने समारोपाच्या कार्यक्रमाची मात्र एकूणच गोची झाली. ज्योत्स्ना देवधर आणि उत्कर्षचे प्रकाशक सुधाकर जोशी यांना केवळ सत्कार स्वीकारूनच बसावे लागले. हे दोन्ही जीवनगौरवाचे सन्मान, त्यांचे महत्त्व जाणून त्या मानकऱ्यांना आपली मनोगते मांडण्याची संधी मिळायला हवी होती. पण अमिताभसाठी आतुर रसिकांना इतर कोणाचे काही ऐकण्यात रस

नव्हता. त्यामुळे या मानकऱ्यांना बोलण्याची संधी देण्यात आली नाही हेच बरे झाले. खुद्द महामंडळाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील आणि संमेलनाचे अध्यक्ष डॉ. द.भि कुलकर्णी यांनाही प्रेक्षकांच्या वेळीअवेळी चाललेल्या टाळ्यांमुळे आपली वक्तव्ये गुंडाळावी लागली, तेव्हा इतरांची काय कथा? संमेलनाचे वाङ्मयीन स्वरूप जपण्यासाठी राजकीय नेत्यांना उद्घाटनासाठी न बोलावणाऱ्यांना अमिताभचे काव्यवाचन मोलाचे वाटले हेच अप्रूप म्हणायचे. अमिताभसारख्या लोकप्रिय अभिनेत्याला बोलावले याबद्दल आम्ही बिलकुल नाराज नाही. साहित्य हे सर्वांसाठी असते; आणि अभिनेत्यांच्या लोकप्रियतेमुळे साहित्याकडे सर्वसामान्य जन आकृष्ट होत असतील तर ती आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. प्रायोजकांनाही अशा लोकप्रिय व्यक्तींच्या उपस्थितीने आपले दातृत्व दाखवायला उत्साह मिळतो. तेव्हा कलावंतांच्या जनमानसातील विधायक प्रतिमेचा लाभ साहित्यसंस्कृतीला होत असेल तर तक्रारीचे कारण नाही. दहा साहित्यिक परिसंवादांतील बौद्धिके ऐकून जाणवणारा जडपणा अमिताभच्या मधुशालातील काही रुबायांनी हलका झाला तर काय बिघडले?

या संमेलनातील अमिताभच्या उपस्थितीमुळे मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना मात्र एक दिवस आधी संमेलनाला येऊन परिसंवादात वक्त्याची भूमिका करावी लागली. ..दिल्लीश्वरांची मर्जी.

या संमेलनात निमंत्रित साहित्यिकांची संख्या लक्षणीय होती. सुमारे ८० निमंत्रित कवींची दोन संमेलने...दहा परिसंवादातले साठ-सत्तर वक्ते ...मुलाखतींचे तीन कार्यक्रम. सुमारे दोनशे जणांना त्यामुळे संमेलनाच्या खर्चाने हजेरी लावता आली. आठ-नऊ माजी संमेलनाध्यक्षांनीही उद्घाटनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्याला शोभा आणली. त्यांना कुठल्याही अन्य कार्यक्रमात मात्र सहभागी करून घेतले गेले नाही. खरे तर, त्यांच्या मनोगतांचे एखादे सत्र ठेवता आले असते. किंबहुना प्रत्येक संमेलनामध्ये माजी अध्यक्षांना पाचारण करून त्यांच्या मनोगतांचे एक खास सत्र किंवा रसिक चाहत्यांशी त्यांचा सहज संवाद होऊ शकेल असा एखादा कार्यक्रम ठेवायला हवा. वयोमानाने ज्येष्ठ असणाऱ्या या महानुभावांना दूरदूरहून प्रवास करून या म्हणून आग्रह करायचा आणि त्यांना प्रेक्षकांच्या पहिल्या दुसऱ्या रांगेत बसवून खालीच शाल-श्रीफळ-गुच्छ देऊन त्यांची बोळवण करायची हे योग्य नाही. त्यांच्या उपस्थितीकडे अधिक सन्मानाने बघायला हवे.

या सम्मेलनाला महाराष्ट्राच्या सर्व भागांतून शेकडो वाचक रसिक तर वारकऱ्यांप्रमाणे येत असतातच; नवोदित लेखक-कवी, नव्याने लिहू लागलेले युवक हेही मोठ्या संख्येने, भक्तिभावाने पदरमोड करून येत असतात. त्यातील कवींना कविकट्ट्यावर कविता सादर करण्याची संधी मिळते. परंतु गद्यलेखकांना, कथा-कादंबरी वगैरे लिहिणाऱ्यांना कुठेच व्यासपीठ मिळत नाही. आपल्या साहित्याच्या प्रकाशनाच्या दृष्टीने त्यांना मार्गदर्शन आणि मदत हवी असते. त्यासाठी संपादक, प्रकाशक,

समीक्षक आणि नवोदित लेखक यांचे अनौपचारिक मेळावे प्रत्येक संमेलनात आयोजित केले जाण्याची गरज आहे. साहित्य संमेलनातील उपस्थिती ही वाङ्मयीन व्यवहाराला चालना आणि दिशा देणारी ठरत असेल तर सध्याच्या व्यावहारिक वातावरणाला ती पोषक होऊ शकेल. संमेलन म्हणजे साहित्याचा उत्सव तर खराच; पण तो साहित्यकारांच्या व्यावसायिक अडीअडचणींचे निराकरण करणारा एक विश्वासार्ह फोरम म्हणूनही आपली वेगळी ओळख निर्माण करू शकेल. एक मंडप त्यासाठी जादा उभारावा लागेल एवढेच! पण त्यामुळे कोणाही नवलेखकाला नियमाने संमेलनाला येण्याची आणि आपले वाङ्मयीन वर्तुळ विकसित करण्याची आंतरिक ऊर्मी वाटत राहिल. परिसंवादातील ॲकॅडमिक चर्चांतून जे साध्य होते, त्यापेक्षा अधिक काही अशा अनौपचारिक चर्चांमधूनही लाभू शकते हे लक्षात घ्यायला हवे. दलित, ग्रामीण, आदिवासी वगैरे प्रवाहांना मुख्य प्रवाहात सामावून घेणे ही काळाची गरज आहे.

या संमेलनात 'बालमेळावा' म्हणता येईल असा उपक्रम नव्हता कविवर्य पाडगावकरांची मुलाखत तीही मुलामुलींनी घेतलेली. या कार्यक्रमाला बालमेळावा म्हणता येणार नाही. बालसाहित्यावर परिसंवाद म्हणजे बालमेळावा नाही. हजारो मुले एकत्र येतात, कथा ऐकतात, बालगीते ऐकतात, नाटुकली बघतात, नकला बघतात, नाट्यछटा करतात, आपल्या भावभावनांचा अविष्कार करण्यासाठी साहित्याचा आधार घेतात तेव्हा होणारा त्याचा सामूहिक परिणाम हा चिरस्थायी असतो. लेखककवींना समक्ष बघणे, त्यांचे बोलणे ऐकणे, कल्पनाशक्तीची झेप बघणे ही आपल्या सांस्कृतिक, भाषिक, वाचिक आणि कल्पकतेच्या क्षमतांची जाण वाढवण्याची प्रक्रिया असते. त्यादृष्टीने अग्रगण्य बालसाहित्यकारांचा व कलाकारांचा सहभाग असणारा बालमेळावा हे प्रत्येक संमेलनाचे एक आवश्यक अंग असायला हवे. आपल्या भावी वाचक लेखकांची समर्थ पिढी तयार करण्यासाठी हे मेळावे आहेत- ही श्रद्धा त्यामागे हवी. या संमेलनात बालवाचकांचा सहभाग अभावानेच आढळला.

यंदाचे संमेलन उत्कृष्ट आयोजनामुळे आदर्श ठरेल. पुढची संमेलने आयोजित करणाऱ्यांना त्यामुळे दिशा दिसेल. साहजिकच या संमेलनात जे होऊ शकले नाही, पण जे करण्यासारखे आहे त्याकडे लक्ष वेधणे गरजेचे आहे.

मराठी साहित्य संमेलन ही महाराष्ट्राची एक खास परंपरा आणि उपलब्धी आहे. ती अधिकाधिक सशक्त आणि समर्थ व्हायला हवी; कालानुरूप नवनवोन्मेष धारण करायला सिद्ध हवी. यादृष्टीने रसिकांचे विचारमंथन होत राहिले पाहिजे.

T बुक क्लब १८

सभासद फी ५०रु. आजच सभासद व्हा!

टी बुक क्लब १८ मधून प्रकाशित होणारे पाचवे पुस्तक

जॉन ग्रिशॅम अनु. अनिल काळे

४४०रु. सभासदांना २२०रु.
पोस्टेज ४०रु.

एक माफिया फॅमिली :
विविध प्रकारच्या गुन्ह्यांमधून जमवलेला
प्रचंड काळा पैसा पांढरा करणारी...
त्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकणारी...
एका वकिलांची फर्म :
माफिया फॅमिलीचा सभ्य धुवट चेहरा असलेली...
फॅमिलीच्या काळ्या पैशाचं बेमालूमपणे
'शुद्धीकरण' करणारी... एक वकील :
नुकताच शिक्षण घेऊन बाहेर पडलेला अत्यंत हुशार, चलाख तरुण फर्ममध्ये नोकरी मिळवतो. त्याला आणि त्याच्या सुंदर बायकोला स्वप्नं पडतात ती फक्त उज्ज्वल भविष्यकाळ, भरपूर पैसा, बीएमडब्ल्यू यांची. प्रत्यक्षात मात्र दोघंही एकीकडे माफिया फॅमिली, तर दुसरीकडे एफबीआय, अशा कात्रीत सापडतात...
आणि जीव वाचवण्यासाठी पळत सुटतात...
दिशा मिळेल तिकडे.

टी बुक क्लब १८ मधून प्रकाशित झालेली पुस्तके

पहिले पुस्तक

डिसेप्शन पॉईंट

डॅन ब्राऊन । अनु. अशोक पाध्ये

५००रु. टी बुक क्लब सभासदांना २५०रु.
पोस्टेज ३०रु.

दुसरे पुस्तक

द अॅटर्नी

स्टीव्ह मार्टिनी । अनु. अजित ठाकूर

३५०रु. टी बुक क्लब सभासदांना १७५रु.
पोस्टेज ३०रु.

तिसरे पुस्तक

क्रायसिस

डॉ. रॉबिन कुक । अनु.डॉ. प्रमोद जोगळेकर

३५०रु. टी बुक क्लब सभासदांना १७५रु.
पोस्टेज ३०रु.

चौथे पुस्तक

वन शॉट

ली चाइल्ड । अनु. बाळ भागवत

३४०रु. टी बुक क्लब सभासदांना १७०रु.
पोस्टेज ३०रु.

टी बुक क्लब १८ मधून प्रकाशित होणारे सहावे पुस्तक



नेक्स्ट

मायकेल क्रायटन
अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर

कर्करोगाच्या उपचारांसाठी आलेल्या रुग्णांच्या पेशी मिळवून
त्या विद्यापीठाला विकणारा डॉक्टर.
या पेशींच्या मालकीसाठी काहीही करायला तयार
असणारे उद्योगपती आणि मतलबी प्राध्यापक.
चिम्पँझी मादीच्या जनुकसंचात स्वत:चेच जनुक मिसळून बेकायदेशीररीत्या
'ह्यूमंझी' बनवणारा बेजबाबदार जीवशास्त्रज्ञ.
धर्म आणि विज्ञान यांची चलाखीनं सरमिसळ करणारा, आपल्या विद्यार्थ्यांचं
संशोधन चोरणारा आणि राजकारणात राजकारण्यांनाही मागे टाकणारा शास्त्रज्ञ
रॉबर्ट बेलार्मिनो.
स्वत:ची तुंबडी भरण्यासाठी कोणत्याही थराला
जाणारे प्रसिद्धी माध्यमांचे लोक.
या सगळ्या काळ्या पार्श्वभूमीवर मनोरंजन करणारा आणि
गणित सोडवणारा बुद्धिमान पोपट....
या सगळ्यातून तयार होते प्रश्नांची मोठी मालिका.
उत्तरं नसलेले, अस्वस्थ करणारे प्रश्न....
मन मानेल ते करायला सज्ज असणारं आजचं जीवशास्त्र ...
पुढे काय होणार?

निरंजन घाटे यांचे आगामी साहित्य

रोबॉट फिक्सिंग

स्वप्नचौर्य

घाटे यांच्या विज्ञानकथांना बराच मोठा वाचकवर्ग लाभलेला आहे. मध्यंतरी त्यांनी विज्ञानकथांकडे दुर्लक्ष केलं की काय, असं वाटू लागलं होतं; पण हा नवा विज्ञानकथासंग्रह घाटे यांनी विज्ञानकथा लेखनाकडे दुर्लक्ष केले नाही, हे सिद्ध करेल. आजकाल मॅच फिक्सिंगबद्दल बरंच बोललं जातं. विज्ञानतंत्रज्ञानाची प्रगती पाहता रोबॉट फिक्सिंगचे दिवसही लांब नाहीत, हे आपल्या लक्षात यायला हवं.

रोबॉट, म्हणजे यंत्रमानव हा तर घाटे यांचा आवडता आणि हातखंडा विषय; पण या कथासंग्रहात 'रोबॉट फिक्सिंग'शिवाय इतर यंत्रमानवी कथांबरोबर यंत्रमानवरहित विज्ञानकथाही आढळतील.

मेहता पब्लिशिंग हाऊस

जगभरातल्या 30 हून अधिक भाषांमध्ये ५० लाख प्रतींच्या विक्रीचा टप्पा गाठणारी 'बेस्ट सेलर' कादंबरी आता मराठीत



शांताराम

ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स

अनु. अपर्णा वेलणकर

पृष्ठे : १४२८

मूळ किंमत : ९९०रु.

सवलतीत : ८५०रु.

पोस्टेज : ४०रु.

सवलत ३० जून २०१० पर्यंत

दूर देशाहून एक गोरं पाखरू.

पळून आलं होतं.

तुटलं होतं माणसांपासून... मातृभूमीपासून... जगण्यापासूनच!

मागावर असलेले पोलीस आणि स्वत:च्या डागाळलेल्या आयुष्याची लाज वाटणारं मन

यापासून त्याला पळून जायचं होतं... लपून राहायचं होतं.

ते उतरलं होतं मुंबईत.

अंधारी, काळी, कलकलाटाची दुनिया. पिचलेली... तरीही ताठ उभ्या कण्याची!

क्षणात नरडीचा घोट घेणारी, क्षणात प्रेमाची पाखर घालून पोटाशी कवटाळणारी दुनिया!

घर सुटलेलं, कुटुंब तुटलेलं, जिवलग दुरावलेले, अशा शून्य अवस्थेत भिरभिरणारं ते

एकुट पाखरू शिरलं मुंबईच्या कुशीत.

– आणि बघता बघता सारं बदललं.

एक नवीच दुनिया उलगडत गेली.

प्रेमाचा पाऊस... द्वेषाचा जाळ... विश्वासघाताचे सुरे...

रहस्यांचं चक्रव्यूह आणि गुपितांच्या गुहा!

शरीरसुखाच्या उफाळत्या लाटांवर नाचणारा उत्कट प्रणय

आणि तुरुंगाच्या अंधारकोठडीतला रक्तरंजित छळ.

जगण्याच्या लढाईत धगधगणाऱ्या झोपड्या आणि पंचतारांकित हॉटेलातलं थंडगार ऐश्वर्य.

अंडरवर्ल्डमधल्या टोळीयुद्धांच्या चिखलात रुजलेली तत्त्वज्ञानाची कमळं आणि बॉलीवुडच्या झगमगाटाआडचा सुन्न अंधार.

– मुंबई.

साहित्यवार्ता

*** 'शांताराम'चा मराठीत अनुवाद**

एखादी भाषा जगवायची ती कशी? धाक दाखवून? दंडुके उगारून? सक्ती करून? असे केले तर पसरते ती भाषेविषयीची दहशत ठरेल. राजकीय अट्टाहासाने भाषा जगत नाही. भाषा जिवंत, प्रवाही राहायची तर त्या भाषेत सुंदर गाणी जन्मावी लागतात, त्या भाषेतले साहित्य सशक्त असावे लागते. उत्तम नाटके, अप्रतिम चित्रपट हा भाषेचा श्वास असतो. मराठीसाठी हे सारे मन:पूर्वक प्रेमाने केले तर मराठी अशीच खळखळती राहील, असा ठाम विश्वास व्यक्त करणारा एक 'गोरा मुंबईकर'... सारे जग त्याला ओळखते ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स या नावाने. पण तो मुंबईत आला की मसाला चाय पितो, ब्रुन मस्का खातो आणि होतो या मातीतला 'शांताराम'

'शांताराम' या जगभरात प्रचंड लोकप्रिय असलेल्या या कादंबरीच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन करण्याकरिता ग्रेगरी वरळीच्या 'फोर सीझन्स' हॉटेलमध्ये आला आणि स्वत:चे सेलिब्रिटी वलय क्षणात उतरवून मुंबईवर जिवापाड प्रेम करणारा 'शांताराम'च बनून गेला.

लोकमतच्या फीचर्स एडिटर अपर्णा वेलणकर यांनी या जगप्रसिद्ध कादंबरीचा मराठी अनुवाद केला आहे. अपर्णाने माझ्या कहाणीला तिच्या खास कौशल्याने मराठी श्वास दिला आहे, अशा शब्दांत ग्रेगरीने आनंद व्यक्त केला.

मराठी भाषा मरते आहे असे मला अजिबात वाटत नाही. जगण्यावर मन:पूर्वक प्रेम करणारी लाखो माणसे मराठी बोलतात. महाराष्ट्राच्या थेट हृदयस्थानी घेऊन जाणारी सारी दारे उघडू शकेल, अशी एक 'सोन्याची किल्ली' या भाषेजवळ आहे. ती अखंड जिवंत राहावी, प्रवाही असावी असे वाटत असेल तर मराठी चित्रपट, रंगभूमी-संगीत-साहित्य या साऱ्या कलाप्रांतांमध्ये मोठी गुंतवणूक करायला हवी, असेही ग्रेगने गप्पांच्या ओघात सांगितले.

जगभरात जिथे जिथे मरणाऱ्या भाषा जगवण्यासाठी धाकदपटशाचा वापर केला गेला तिथे तिथे हे शस्त्र उलटले. ज्या भाषेतले संगीत, काव्य मनाला भिडते, तीच भाषा लोक स्वत:हून आपलीही करतात आणि शिकतात असेही ग्रगने सांगितले.

मुंबईवर जिवापाड प्रेम करणाऱ्या ग्रेगला बॉम्बस्फोटांनी हादरलेली, दहशतवादी

हल्ल्यात धगधगून पेटलेली मुंबई कशी दिसते, असे विचारताच ग्रेगचा स्वर बदलला. या शहराचे खरे स्पिरिट हे झुंजण्याचे आणि झुंजून उभे राहण्याचे आहे. त्यावर हल्ला करण्याचे प्रयत्न कधीच यशस्वी होणार नाहीत, असे ग्रेगने सांगितले. आदल्या दिवशी लिओपोल्डच्या ज्या टेबलावरती बसलो होतो, त्याच टेबलाखाली दुसऱ्या दिवशी बॉम्ब फुटल्याची थरारक आठवण ग्रेगने सांगितली. मुंबईवरच्या दहशतवादी हल्ल्यानंतर सगळ्या माध्यमांमध्ये बदल्याची आग पेटवली गेली होती. पण रस्त्यावरच्या सामान्य माणसाच्या तोंडी मात्र शांततेची प्रार्थना होती. हे मी स्वत: अनुभवले आहे. क्षमा आणि शांती ही या शहराची बलस्थाने आहेत. सूड आणि बदला नव्हे, असे त्याने ठासून सांगितले.

अपर्णा वेलणकर यांनी मराठीत अनुवादित केलेले 'शांताराम' मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केले असून वाचकांसाठी ते उपलब्ध झालेले आहे.

कार्यक्रमाला सुनील मेहता, ज्येष्ठ पत्रकार दत्ता सराफ, पुस्तकाचे वैशिष्ट्यपूर्ण मुखपृष्ठ साकारणारे चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी आणि ग्रेगरीची पत्नी प्रिन्सेस प्रामुख्याने उपस्थित होते.

*** समवयस्क पालकांमध्ये संवाद आवश्यक**

बदलत्या काळात पालकत्त्व निभावताना पालकांना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे मुलांना वाढविताना आलेल्या अडचणी, त्यावर केलेले उपाय याविषयी समवयस्क पालकांनी एकमेंकाशी संवाद साधणे आवश्यक आहे, असे मत लेखक महेंद्र सेठिया यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ लेखक अविनाश भोमे यांच्या 'तुम्ही आणि तुमची मुलं' या पुस्तकाच्या दहाव्या आवृत्तीचे प्रकाशन ज्येष्ठ व्यवस्थापन तज्ज्ञ डॉ. प्र.चिं. शेजवलकर यांच्या हस्ते झाले. या वेळी विनोदी लेखक मुकुंद टाकसाळे, महेंद्र सेठिया, मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल व सुनील मेहता आदी उपस्थित होते. या वेळी भोमे म्हणाले, ''सध्याच्या तणावाच्या युगात मुले आणि पालक यांच्यातील सुसंवाद नव्हे संवादच हरवला आहे. संवाद ही एक निरंतर प्रक्रिया आहे. नववीत मार्क कमी पडले म्हणून आता दहावीत त्याच्याशी सुसंवाद करू, असे म्हणून संवाद होत नसतो.''

कालानुरूप पुस्तकात बदल करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी मुकुंद टाकसाळे यांनी व्यक्त केले.

डॉ. प्र.चिं. शेजवलकर म्हणाले, ''आमच्या वेळी शाळा म्हणजे तुरुंग वाटे; मात्र आताच्या मुलांना प्रेमाने शिकवणारे शिक्षक, पालक लाभले आहेत. आर्थिक दुर्बल घटकातील पालकही आपल्या मुलांच्या जडणघडणीविषयी जागरूक झाले आहेत.''

महेंद्र सेठिया म्हणाले, ''मुलांच्या करिअरविषयी वाढलेली जागरूकता मुलांसाठी त्रासदायक ठरली आहे. आपल्या मुलांना सर्व काही आले पाहिजे, हा पालकांचा अट्टहास असतो. सुट्टीच्या काळात मुले मोकळी राहिली की आईवडिलांनाच टेन्शन येते. वाढत्या स्पर्धेत मुले मागे पडू नयेत, या धास्तीने बालवाडीतच क्लास लावले जातात. शाळेत खेळ, कला यांना मार्क आहेत का किंवा ते कंपलसरी आहे का, असे विचारूनच पालक मुलांना परवानगी देतात. एकाग्रता भंग, मानसिक असंतुलन, निवडकौशल्याचा अभाव या समस्या उद्‌भवू नयेत, यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.'' वंदना धर्माधिकारी यांनी सूत्रसंचालन केले.

*** कागदपत्रांचे 'डिजिटलायझेशन'**

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने प्रशासकीय कामकाज 'पेपरलेस' करण्यासाठी 'शाश्वत प्रकल्प' हाती घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत प्राधिकरणाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंच्या सर्व कागदपत्रांचे 'डिजिटलायझेशन' करण्यात आले आहे, अशी माहिती प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास दिवसे यांनी दिली.

प्राधिकरणाने प्रशासकीय कामकाज पेपरलेस करण्याचा 'शाश्वत प्रकल्प' हाती घेऊन 'डिजिटलायझेशन' करण्यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद केली होती. अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देऊन डिजिटलायझेशनसाठी आवश्यक संगणकीय व इतर यंत्रणा उभारण्यात आल्या.

गेल्या वर्षभरात बारा हजार फायलींचे 'डिजिटलायझेशन' झाले. तब्बल तीस लाख पाने झाली. प्राधिकरणाच्या स्थापनेपासून, म्हणजे १९७२ पासूनच्या सर्व कागदपत्रांचे 'डिजिटलाझेशन' करण्यात आले आहे. एका विशिष्ट संगणक प्रणालीमध्ये प्राधिकरणामार्फत आजपर्यंत झालेल्या जमिनीचे भूसंपादन, नियोजन, वाटप, बांधकाम परवानगी व पूर्णत्वाचे दाखले आदींचे महत्त्वाचे अभिलेख जतन करण्यात आले आहेत.

कागदपत्रांचे 'डिजिटलायझेशन' पूर्ण झाल्यानंतर ही सर्व कागदपत्रे नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यासाठी 'टच स्क्रीन' सुविधा उपलब्ध असेल. त्यामुळे प्राधिकरणाशी संबंधित कोणतीही कागदपत्रे पाहता येतील. या प्रकल्पासाठी २०१०-११ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात आणखी ५७ लाख रुपयांची तरतूद केली आहे.

*** अण्णा भाऊ साठे स्मारक**

कात्रज, धनकवडी, सहकारनगर, बिबवेवाडी या उपनगरासह मार्केड यार्ड परिसरातील नागरिकांना सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ देणारे राज्यातले पहिले

'अण्णा भाऊ साठे स्मारक' वर्षभरात साकारणार आहे.

कात्रज ते स्वारगेट बी.आर.टी. मार्गावरील स्वामी विवेकानंद पुतळ्याशेजारील बिबवेवाडी सर्व्हे नं. ६८२/६८३ हा भूखंड १९८७च्या मान्य विकास आराखड्यात सांस्कृतिक क्षेत्रासाठी राखीव ठेवण्यात आला होता. शहरासह वेगाने वाढणाऱ्या उपनगरामध्ये सांस्कृतिक वातावरण निर्माण व्हावे, नागरिकांना शहराप्रमाणेच जवळच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घेता यावा, या दृष्टीने उभारण्यात येत असलेले नाट्यगृह संकुल लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या भव्य स्मारकाचा एक भाग असून, या नाट्यगृहाची क्षमता बाल्कनीसह नऊशे आसनांची आहे.

संगणक लायब्ररी, प्रदर्शन हॉल आणि अण्णा भाऊ साठे यांचा भव्य पुतळा, प्रशस्त लॉन, कारंजे, सहा हजार चौरस मीटरचा बंदिस्त वाहनतळ, अशा प्रकल्पास मुख्य सभेत २० फेब्रुवारी २००४ रोजी मान्यता मिळाली होती.

चौदा हजार चौतीस चौरस मीटर अशा एकूण जागेपैकी सात हजार पाचशे चौरस मीटर जागेवर प्रत्यक्ष बांधकाम सुरू असून आर.सी.सी. बांधकामासह साडेसात कोटी रुपयांच्या दोन मजल्यांचे काम पूर्ण होत आले आहे.

*** 'आजचे समाजवास्तव लोमटे यांच्या कथेत प्रकट होते'**

आजचे समाजवास्तव, त्याच्यातले ताणतणाव आणि आशाआकांक्षाचा गुंता आसाराम लोमटे यांच्या कथेत ताकदीने प्रकट होतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध कादंबरीकार रंगनाथ पठारे यांनी केले.

एस. एम. जोशी फाउंडेशन सभागृहात पठारे यांच्या हस्ते लोमटे यांच्या 'आलोक' या कथासंग्रहाचे प्रकाशन झाले. विश्राम गुप्ते यांच्या 'नारी डॉट कॉम' या कादंबरीचे आणि 'परिकथा आणि वास्तव' या लेखसंग्रहाचे प्रकाशनही झाले. ही तिन्हीही पुस्तके मुंबईच्या 'शब्द पब्लिकेशन'ने प्रसिद्ध केली आहेत.

या वेळी पठारे म्हणाले की, समकालीन वास्तवाची इतकी नेमकी आणि खोल समज अपवादात्मकच आढळते. या कथांचे सामर्थ्य आणि आवाका हा कादंबरीच्या जवळ जाणारा आहे. ग्रामीण जीवनाचे आधीचे साहित्यातले चित्रण रोमँटिक होते. या कथांचे चित्रण वास्तवाला थेट आणि रोखठोक भिडणारे आहे. श्रीमती दळवी यांनी 'नारी डॉट कॉम' ही कादंबरी स्त्री प्रश्नाकडे वेगळ्या नजरेने पाहणारी कादंबरी असून, विविध स्त्रीरूपांचे दर्शन त्यात घडते, असे सांगितले. प्रा. थोरात यांनी गुप्ते यांच्या लेखनाचे सूत्र सांगून त्यांच्या काव्यमय भाषाशैलीचा आवर्जून उल्लेख केला. गुप्ते यांनी 'नॉरी डॉट कॉम' या कादंबरीबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

*** अनंत फंदींचे स्मारक संगमनेरमध्ये उभारावे**

'बिकट वाट वहिवाट नसावी... धोपट मार्गा सोडू नको' या फटक्यासारख्या

अनेक कवनांमुळे महाराष्ट्राला परिचित असलेल्या अनंत फंदींचे स्मारक व्हावे, अशी संगमनेरकरांची इच्छा आहे. फंदींचे जन्मस्थळ असलेली जागा ज्यांच्याकडे भाडेपट्ट्याने होती त्या बाबूलाल जाजू यांनीही ती कोणतीही पूर्वअट न घालता दिली आहे.

साहित्य व सांस्कृतिक उपक्रमांच्या माहीतगार असलेल्या दुर्गा तांबे नगराध्यक्षा आहेत. त्यांचे पती डॉ. सुधीर तांबे माजी नगराध्यक्ष व पदवीधर मतदारसंघाचे आमदार आहेत. राज्याचे कृषी, शालेय शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात या सर्वांच्या प्रयत्नांमुळे फंदींच्या समारकासाठी अडचण येऊ नये, असे वाटते.

फंदींनी त्या घरात विविध समाजप्रबोधनपर फटके, कवने लिहिली. फंदींचा जन्म १७४४ व मृत्यू १८१९ मध्ये झाला. त्यांचे अखेरचे वंशज असलेले गणेश फंदी हे पणतू १९९१च्या दरम्यान वारले.

जाजू कुटुंबीयांनी फंदींच्या काही नातलगांशी संपर्क साधून त्यांना संगमनेरला बोलावून घेतले व घरावरील ताबा सोडल्याचे अधिकृत पत्र त्यांच्याकडे सुपूर्त केले. संगमनेर पालिकेच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षात नगराध्यक्ष तांबे यांनी पुढाकार घेतला तर फंदींचे स्मारक उभे राहू शकेल असे संगमनेर इतिहास संशोधन मंडळाचे अध्यक्ष संतोष खेडलेकर यांनी सांगितले. फंदींचे हे जन्मस्थळ बाजारपेठेत आहे.

*** प्रा. सुनील करपे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन**

अध्यापक विद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. सुनील नानासाहेब करपे यांनी लिहिलेल्या 'शिक्षण सेवक अभ्यासक्रम प्रवेश परीक्षा' (सीईटी) या मार्गदर्शनपर पुस्तकाचे प्रकाशन रामनवमीला करण्यात आले.

ज्येष्ठ कृषितज्ज्ञ प्रा. डॉ. मुकुंद गायकवाड, 'शिवसमशेर'चे संपादक राम पायगुडे या प्रसंगी उपस्थित होते. या पुस्तकामध्ये देशाची भौगोलिक व इतर आवश्यक माहिती, राजधान्या, राज्यभाषा, केंद्रशासित प्रदेश, राष्ट्रीय प्रतीके, विविध क्षेत्रांतील महत्त्वाच्या घटना, नद्या, सरोवरे व धरणे, शिखरे, बंदरे, खनिजे, वाहतूक, राष्ट्रीय उद्याने, देशाची धोरणे, पुरस्कार, वास्तुशिल्पे, गणितीय व वैज्ञानिक संज्ञा यांचा समावेश आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान समृद्ध करेल.

*** कलाकारांच्या आवाजात पुस्तके ऐका**

पुण्यातील रिअलायझेशन मीडियातर्फे द. मा. मिरासदार यांचे 'गप्पांगण', शिवराज गोर्ले यांचे 'नग आणि नमुने' आणि मिलिंद बोकील यांचे 'झेन गार्डन' या ऑडिओ बुक्सचे प्रकाशन करण्यात आले. आघाडीचे अभिनेते प्रशांत दामले यांनी गप्पांगणचे, गिरीश कुलकर्णी यांनी नग आणि नमुने, तर संदीप कुलकर्णी आणि अश्विनी गिरी यांनी झेन गार्डनचे अभिवाचन केले आहे. लघुपट निर्माते व दिग्दर्शक वीरेंद्र वळसंगकर यांनी दिग्दर्शन केले असून, केदार दिवेकर यांनी संगीत दिले आहे.

रियलायझेशन मीडियाचे संचालक जीवन वैशंपायन, श्रीधर देशपांडे आणि गौरव चांदककर यांनी ही ऑडिओबुक्स सादर केली. वळसंगकर म्हणाले, ''पाश्चात्त्य देशात ही संकल्पना रूढ झाली आहे. बदलत्या काळात आपल्याकडेसुद्धा याचे स्वागत होईल, असा विश्वास आहे. ही पुस्तके म्हणजे 'श्रुतिका' नाही.''

*** अमेरिकेत एकत्र कुटुंब पद्धतीचे वारे**

मुक्त जीवनशैलीचा व विभक्त कुटुंब पद्धतीचा अंगीकार करणाऱ्या अमेरिकेत आता एकत्रित कुटुंबपद्धतीचे वारे वाहू लागले आहेत. सज्ञान झाल्या झाल्या केवळ 'हम दो' असे म्हणत घराबाहेर पडून आपले स्वतंत्र विश्व उभे करण्यासाठी धडपडणारी तरुण मंडळी बदलते सामाजिक संदर्भ व आर्थिक विवंचनेमुळे आता मोठ्या कुटुंबात राहणे पसंत करत असल्याचे एका पाहणीतून स्पष्ट झाले आहे.

एकूण लोकसंख्येच्या १६ टक्के अमेरिकन एकत्र कुटुंबात राहत असून, १९८०च्या तुलनेत हे प्रमाण १२.१ टक्क्यापेक्षा जास्त आहे. 'पेव रिसर्च सेंटर्स'तर्फे ही पाहणी करण्यात आली आहे. प्रत्येक मोठ्या कुटुंबात कमीत कमी दोन वयस्क लोक राहात असल्याचे आढळून आले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकन कुटुंब पद्धतीतील स्थित्यंतरास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. बदलते सामाजिक वातावरण व आर्थिक मंदीमुळे २००८ पर्यंत ४९ लाख लोक एकत्र आल्याचे अहवालात म्हटले आहे. आर्थिक मंदीमुळे चांगली नोकरी व स्वतंत्र घर घेता येत नसल्याने २० टक्के अविवाहितांनी एकत्र कुटुंबाला प्राधान्य दिल्याचे अहवालात म्हटले आहे. सर्व वयोगटावर एकत्र कुटुंबपद्धतीचे परिणाम होऊ लागले असून, २५ ते ३५ वयोगटातील प्रत्येक पाच जणांपैकी एक व ६५च्या पुढील वयोगटातील प्रत्येक पाच जणांपैकी एक एकत्र कुटुंबात राहत आहे.

*** मध्य प्रदेशात 'मराठी अकादमी'**

मराठी भाषा, मराठी माणसाच्या मुद्यावरून महाराष्ट्रात संघर्ष चालू असला तरी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मध्य प्रदेश सरकारने स्वतंत्र मराठी विभागानंतर आता 'मराठी अकादमी'च स्थापन करण्याचा निर्णय घेऊन अकादमीसाठी वीस लाख रुपयांची तरतूदही केली आहे.

नियोजित मराठी अकादमीचे प्रभारी गणेश बागदरे यांनी माहिती देताना म्हटले, 'मध्य प्रदेश सरकारने मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी मंत्रालयातील संस्कृती परिषदेंतर्गत मराठी, हिंदी, उर्दू आणि सिंधी या चार भाषांचे विभाग सुरू केले आहेत. त्या विभागांद्वारे प्रत्येक भाषेच्या समृद्धीचे कार्य सुरू आहे. मराठी अकादमी स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. परराज्यातही मराठी भाषेला 'राजाश्रय' मिळतो आहे हे महत्त्वाचे आहे. प्रामुख्याने राज्यातील

ग्वाल्हेर, इंदूर, भोपाळ, जबलपूर या चार महानगरांमध्ये मराठी भाषिकांची संख्या मोठी आहे. छिंदवाडा, बालाघाट, धार, देवास, खरगोन, खांदवा ही चार शहरे, तर महाराष्ट्राच्या सीमेवरील बुंदेलखंडामध्ये दमो, छत्रपूर हा मराठी भाषिकांचाच भाग. झाशी राणी लक्ष्मीबाई आणि शूरवीर सेनानी तात्या टोपे यांची ही कार्यक्षेत्रे. अकादमीमुळे मराठी भाषेची व्याप्ती वाढण्यास मदत होणार आहे. त्याद्वारे राज्यातील मराठी भाषिक साहित्यिकांची पुस्तके, प्रकाशित करून तसेच कार्यशाळेद्वारे मराठी भाषकांच्या साहित्याला चालना देण्यात जाईल. मराठी साहित्य, संस्कृती, इतिहासाचे पुरावे असणाऱ्या भांडारकर प्राच्य विद्या मंदिर किंवा समर्थ वाग्देवता वाङ्मय मंडळातील एक हजार वर्षांपूर्वीच्या पोथ्या, ज्ञानदेव ते नामदेव यांच्या साहित्यांचे 'मायक्रोफिल्मिग' केले जाईल. मराठी संस्कृती जनत करणारे सण, उत्सव, तसेच पारंपरिक पोवाडे, भारूड, लावणी, गोंधळी, नाटक आदी माध्यमातील साहित्याचे चित्रण करून ते कायमस्वरूपी संवर्धित केले जाईल.'

*** पुस्तकांचं 'ऑनलाइन' दालन**

पुस्तकं वाचायला आवडतात, पण दुकानात जाऊन ती खरेदी करण्याएवढा किंवा लायब्ररीत जाऊन पुस्तके नेमाने बदलत राहण्याएवढा वेळ नाही, अशी परिस्थिती शहरात आढळते. साहित्य संमेलनासारख्या वार्षिक अक्षरउत्सवामध्ये अशा प्रश्नांची दखल घेतली जातेच असे नाही, पण यंदाच्या ग्रंथप्रदर्शनामध्ये वाचकांपर्यंत पुस्तके नेणाऱ्या दोन उपक्रमांचे स्टॉल्स लक्ष वेधून घेत होते.

फजीसॉफ्ट सॉफ्टवेअरच्या अंजली कुलकर्णी यांनी इ-बुक्स वाचण्यासाठी www.sahityasampada.com ही वेबसाइट तयार केली आहे. तरुण इंटरनेट सॅव्ही वाचकांना किंवा इंटरनेटशी जुळवून घेतलेल्या प्रौढांनाही या साइटमुळे घरबसल्या पुस्तके वाचता येतील. सध्या या साइटवर १२५ पुस्तके उपलब्ध आहेत. ही संख्या वाढत जाईल. यातील काही पुस्तके स्कॅन केलेली आहेत; तर काही पुस्तकांच्या निर्मितीवेळी तयार केलेल्या पीडीएफ फाइल्स उपलब्ध झाल्या आहेत. एक पुस्तक वाचण्यासाठी साधारण दोन ते आठ रुपये फी असेल. सभासद होताना काही रक्कम प्रीपेडप्रमाणे भरावी लागेल. पुस्तके वाचली की त्या रकमेतून ती फी वळती होत राहील. एका पुस्तकाची १० पाने आज वाचा, उद्या थोडी वाचा अशी सोयही आहे. त्यामुळे आपल्या सवडीने, हवे ते पुस्तक वाचायला मिळेल. अनेक लेखकांनी या उपक्रमाला पाठिंबा दाखवला आहे. सध्या कवी ना. धों. महानोर, ना. सी. फडके, प्रमोदिनी वडके-कवळे, बाबा भांड, रा. रं. बोराडे इत्यादींची पुस्तके वेबसाइटवर टाकण्यात आली आहेत.

राहुल भांदुर्गे या पुणे विद्यापीठातून एमबीए झालेल्या तरुणानेही लायब्ररीची सेवा

ऑनलाइन देण्यासाठी २५०० पुस्तकांची खरेदी केली असून त्यात १४०० मराठी आणि इतर इंग्रजी पुस्तकांचा समावेश आहे. www.mylibrary.in या वेबसाईटवरून 'ऑनलाइन मेंबरशिप' घेता येते. वेबसाइटवर पुस्तकांची यादी असून सभासदांनी आपल्याला हवे ते पुस्तक साइटवरून मागवायचे. त्यांना ते त्यांच्या घरी किंवा ऑफिसमध्ये आणून देण्याची सोय आहे. पुस्तक वाचून झाल्यावर त्याची नोंद वेबसाइटवर करता येईल आणि पुढील पुस्तकासाठी सभासदांना मागणी नोंदवता येईल. लायब्ररीतर्फे एक माणूस येऊन नवे पुस्तक घेऊन येईल आणि जुने घेऊन जाईल. सभासद खरेदीसाठी नवी पुस्तके सुचवू शकतील. लायब्ररीच्या ऑनलाइन कामाबरोबरच वेबसाइटवर साहित्यविषयक चर्चा करणं, पुस्तकांबद्दलचे अभिप्राय कळवणे, यासाठीही सोय असेल.

*** कवितेवरचे प्रेम हा सुखलोलुपतेवरचा उतारा आहे**

प्रा. शरद उमराणी यांच्या 'अज्ञानाच्या वाटेवर' या कवितासंग्रहाचे प्रकाशन १४ मार्च रोजी शैलेश सभागृहात झाले.

प्रा. के. रं. शिरवाडकर म्हणाले, ''कवितेवरचे प्रेम वाढेल तसतसे जग अधिकाधिक सुंदर होईल, कारण कविताप्रेम हा माणसाच्या सुखलोलुपतेवरचा खरा उतारा आहे. मानवी मूल्यांचा आधार घेऊनच कविता जन्माला येते; म्हणूनच एका अर्थी कविता ही मानवतेची पूजाच आहे. पदार्थविज्ञान शास्त्राचे प्राध्यापक असलेल्या शरद उमराणींच्या कवितेत मोठ्या कवीची बीजे निश्चित आहेत.''

डॉ. सु. रा. चुनेकर म्हणाले, ''उमराणींची कविता उठून दिसते ती तिच्या सच्चेपणाने आणि प्रगल्भ अंतर्मुखतेने! निसर्गप्रेम आणि जीवनाबद्दलची सजगता यांचा प्रभावी आविष्कार या कवितेतून प्रकट होतो.''

प्रा. शरद उमराणी मूळचे कऱ्हाडचे असल्याने हा समारंभ 'कऱ्हाडकरांचा स्नेहमेळावाच' झाला होता. या समारंभात डॉ. संगीता बर्वे यांचेही भाषण झाले. प्रा. शरद उमराणी यांनी मनोगत व्यक्त करून काही कविता सादर केल्या. शशिकला उपाध्ये यांनी सूत्रसंचालन केले. या समारंभास डॉ. अविनाश वळवडे, देवकी वडवळे, प्रा. विद्याधर गोखले, बाळासाहेब खंडकर आदी रसिक उपस्थित होते.

*** डॉ. अभिजित वैद्य यांच्या पुस्तकाचे प्रकाशन**

डॉ. अभिजित वैद्य लिखित 'हृदयरोग, धूम्रपान आणि तंबाखू' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्या हस्ते पत्रकार भवनात झाले. तंबाखूच्या सेवनामुळे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम यात विशद केले आहेत.

तेंडुलकर म्हणाले, ''साहित्यिक आणि त्याचे लेखन याचा बऱ्याचदा संबंध असतोच असे नाही. त्यामुळे गुटखा निर्मिती करणाऱ्या एका कंपनीकडून साहित्य

संमेलनाला प्रायोजकत्व मिळाले याचा निषेध करायला कोणताही साहित्यिक पुढे आला नाही. पूर्वीही अनेक तंबाखू कंपन्या होत्या. मात्र त्या वेळेस प्रायोजकत्व कोणी स्वीकारले नाही.''

''साहित्यिक प्रतिभा संवर्धनासाठी हे संमेलन असते, त्याला इतका खर्च करायची गरजच काय? आपण आपल्या जाणिवा आणि भावना बधिर करून जगायचे ठरविल्याने अशा घटना घडत आहेत,'' असे डॉ. वैद्य म्हणाले.

*** 'मुरलीचे बोल' या आत्मचरित्राचे प्रकाशन**

''मुरलीचे बोल हे आत्मचरित्र वाचनीय आणि प्रेरणादायी आहे,'' असे मत निवृत्त उपजिल्हाधिकारी अण्णासाहेब आडकर यांनी व्यक्त केले.

मुरलीधर इनामदार यांनी लिहिलेल्या 'मुरलीचे बोल' या आत्मचरित्राचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. १९३६ ते १९४३ या काळातील इनामदार यांचे मित्र या प्रसंगी उपस्थित होते. वयाच्या ८५व्या वर्षी आत्मचरित्र लिहावयास घेऊन ते ९०व्या वर्षी पूर्ण केले. विठ्ठलवाडी भागाचे संघचालक विठ्ठलराव कांबळे यांच्या हस्ते इनामदार यांचा सत्कार करण्यात आला.

*** महिला वाद्यवृंद**

संगीतविषयक आकर्षणातून एकत्र आलेल्या महिलांच्या 'रसिक मोहिनी' या वाद्यवृंदाने नुकताच पन्नासावा प्रयोग सादर केला.

संगीत अभ्यासक सुनीता खाडिलकर म्हणाल्या, ''छंदाच्या माध्यमातून महिला व्यावसायिक वाद्यवृंदाचा यशस्वी प्रयोग होत आहे. परदेशात महिलांचे वाद्यवृंद खूप असतात, पण सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहरात महिलांनी वाद्यवृंदाची निर्मिती केल्यामुळे सांगीतिक क्षेत्रात केवळ गायिकाच नाही तर उत्कृष्ट साथीचे कलाकारही लवकरच तयार होतील.''

या कार्यक्रमात भारतीय चित्रपट सृष्टीतील सदाबहार गीते, 'सुफी गझल' आणि शास्त्रीय संगीतावर नृत्य सादरीकरण करण्यात आले. मंजिरी वाटवे चुनेकर, कविता रवखंडीकर, वैशाली सप्रे, गीतांजली जेधे यांनी गायन केले. स्नेहल दयाळ (तबला), नीलिमा भूमकर (पखवाज), अंजली सिंगडे-राव (व्हायोलिन) आणि एरिका जोशी, संध्या साठे यांनी (संवादिनी) साथसंगत केली. मंजिरी धामणकर यांनी निवेदन केले. व्हायोलिनवादक अंजली सिंगडे या म्हणाल्या, ''गाणं शिकताना कोणाचा ताल पक्का होता, तर कोणाचे सूर पक्के होते हे जाणून आम्ही वाद्यवृंद निर्मिती केली.''

*** किल्ले मोहिमेची सांगता**

ज्येष्ठ इतिहास संशोधक निनाद बेडेकर यांनी वयाच्या ६१व्या वर्षानिमित्त

आखलेली ६१ किल्ल्यांची मोहीम शिवाजी महाराजांच्या ३३०व्या पुण्यतिथीदिनी किल्ले रायगड येथे पूर्ण झाली. या प्रसंगी मोहिमेतील ६० किल्ल्यांवरील जल, तसेच रायगडावरील गंगासागर तलावातील जलाने शिवसमाधीला अभिषेक करण्यात आला. २९ मार्चला बेडेकरांचा पाचाड ते रायगड असा पदभ्रमणाचा कार्यक्रम झाला. ३० मार्चला पहाटे साडेपाच ते सकाळी ८या वेळेत शिवप्रेमींना त्यांनी रायगडाचा इतिहास विशद केला. श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळातर्फे बेडेकरांचा सत्कार अर्थमंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते झाला. इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे, महेश तेंडुलकर, पराग पुरंदरे, मोहन शेटे या वेळी उपस्थित होते.

*** ॲबिलिटी अनलिमिटेड**

सैद सलाउद्दीन पाशा हे कलेच्या माध्यमातून अपंगांमध्ये संजीवनी ओतणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गुरू आहेत. दिल्लीतील त्यांची 'ॲबिलिटी अनलिमिटेड' ही संस्था गेली २५ वर्षे केवळ अपंग कलावंतांकडून नृत्यनाट्याचे प्रयोग सादर करीत आहे.

पुण्यातील 'बालकल्याण' या संस्थेच्या पुढाकाराने गुरू सैद सलाउद्दीन पाशा यांचे एक शिबिर नुकतेच पुण्यात घेण्यात आले. अपंगांसाठी कार्य करणाऱ्या विविध संस्थांचे ५० शिक्षक त्यात सहभागी झाले होते. अकोले, जळगाव, नागपूर, नांदेड, इस्लामपूर, कोल्हापूर, सातारा, अमरावती, सांगली, नाशिक, नंदुरबार, मुंबई वगैरे जिल्ह्यांमधील संस्थांची मागणी लक्षात घेऊन लवकरच आणखी एक शिबिर घेण्यात येणार आहे. एवढी मागणी असण्याजोगे या गुरूंकडे आहे तरी काय? तर चाकांच्या खुर्ची किंवा कुबड्या या साधनांना ते अपंग कलावंतांच्या वाढीव अवयवाचेच रूप जणू देतात. आपल्याला पाय असते तर चालता आले असते, असा निराशाजनक विचार करणाऱ्यांना ते कुबड्या व चाकांच्या खुर्च्यांची मदत घेऊन तालबद्ध नृत्य करायला शिकवतात. शास्त्रीय नृत्यप्रकार व मार्शल आर्टचा मेळ साधून ते धडधाकट माणसांनाही अवघड वाटणाऱ्या हालचाली अपंग कलावंतांकडून सहजगत्या करून घेतात.

गुरू पाशा म्हणाले, ''अंध, कर्णबधिर व मतिमंद मुलांसाठी जी विशेष शिक्षण पद्धती राबवली जाते, ती त्यांच्या फायद्याची ठरण्याऐवजी त्यांना शिक्षा वाटावी, अशी परिस्थिती कित्येक ठिकाणी आहे. अपंगांमध्येही अपार क्षमता असते. फक्त त्यांना ती जाणवून देण्याची गरज असते. मी त्यांच्यातली प्रतिभाशक्ती चेतवून, त्यांच्यातल्या अमर्याद कार्यशक्तीची जाणीव त्यांना करून देतो. संगीत व नाट्य हे त्यांच्या अभिव्यक्तीसाठी परिणामकारक माध्यम ठरते, असा अनुभव आहे.''

गुरू पाशा या सगळ्याला 'उपचारात्मक कलाविष्कार' असे नाव देतात. केवळ

दोन घडीच्या करमणुकीसाठी अपंगांना ते नृत्य व नाट्य शिकवत नाहीत, तर सुदृढ शरीराच्या कलावंतांप्रमाणे रंगभूमीवर कारकीर्द घडविण्याचे स्वप्न साकार करत आहेत. शंभराच्या वर कार्यक्रमांचे दहा हजारांपेक्षा जास्त प्रयोग जगभर करून त्यांच्या संस्थेतील कलावंतांनी 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्'मध्ये स्थान मिळवले आहे. संपर्क २५६५५९५३

*** ऐतिहासिक चित्रपटांची लाट**

चाळीसच्या दशकानंतर सुमारे तीस वर्षे छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यातील विविध घटना दाखवणारे 'थोरातांची कमळा', 'संताजी-धनाजी', 'नेताजी पालकर', 'गड आला पण सिंह गेला' इत्यादी चित्रपट यशस्वीपणे साकारण्यात आले. पुढे मराठी चित्रपट सामाजिक आणि विनोदी कथांकडे वळले. गेल्या काही वर्षात ऐतिहासिक चित्रपट इतिहासजमा झाले होते. आता पुन्हा मराठी चित्रपटसृष्टी इतिहासाच्या आश्रयाला जाऊ लागली आहे. 'रायगड गातो शंभू गाथा', 'संभाजी', 'हिरकणी', 'राजमाता जिजाऊ' हे ऐतिहासिक चित्रपट तयार होत आहेत.

'हिरकणी'चे दिग्दर्शन अनंत पेंटर करीत आहेत. 'हिरकणी' ही एक ऐतिहासिक कथा आहे. हिरकणीने घडविलेल्या इतिहासाला मातृत्वाची किनारही आहे. हिरकणीची कथा सर्वांना माहीत असल्यामुळे ती पडद्यावर दाखविणे हे एक आव्हान आहे. जून २०१० मध्ये हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची वेशभूषा ऑस्कर पुरस्कार विजेत्या भानु अथैय्या यांनी केली आहे. पन्हाळा, रायगड, राधानगरी या ठिकाणी या चित्रपटाचे चित्रीकरण करण्यात आले आहे.

'रायगड गातो शंभूगाथा' या चित्रपटाचे १८ तासात चित्रीकरण होणार आहे. चित्रपटाचे निर्माते व्ही. व्ही. यंदे यांनी सांगितले की, या चित्रपटात शिवाजी महाराजांची भूमिका प्रमोद पवार, तर संभाजी राजांची भूमिका शशांक उदापूरकर साकारणार आहेत. वयाच्या १६व्या वर्षापासून ते संभाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंतचा कालखंड या चित्रपटात दाखविण्यात येणार आहे. एकाच वेळी वाई, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी सेट उभारून हा चित्रपट पूर्ण करण्यात येणार आहे. 'हिरकणी'चे बजेट दीड-दोन कोटीच्या, तर 'रायगड गातो शंभूगाथा' चे बजेट एक कोटी रुपयांच्या घरात आहे.

*** मराठी कॅलिग्राफीतील टी-शर्ट**

अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या मराठीच्या काव्यपंक्ती सार्थ अभिमानाने आपल्या अंगावर मिरवण्याची संधी भारतीय वस्त्र शिल्प या ठाणेस्थित कंपनीने उपलब्ध करून दिली आहे.

मराठीतील श्रेष्ठ कवींच्या काव्यपंक्ती या टी-शर्टवर अच्युत पालव, यजुवेंद्र,

पिनाकिन रिसबूड आदी नामवंत सुलेखनकारांनी (कॅलिग्राफर्स) आपल्या सुंदर अक्षराने रेखाटल्या आहेत. हाय डेन्सिटी प्रिंटिंगमुळे प्रिंटचा दर्जा उत्तम आहे. सर्वोत्तम काव्यपंक्ती, उत्तम डिझाईन, आकर्षक रंगसंगती व चार साईजेस ही या टी-शर्टची वैशिष्ट्ये.

शिवछत्रपतींची राजमुद्रा, पाडगावकरांच्या काव्यपंक्ती, साहित्यिकांची नावे, माऊलींच्या ओव्या या कॅलिग्राफी असलेल्या टी-शर्ट्ना सर्वाधिक मागणी होती. विंदा करंदीकर यांच्या काव्यपंक्ती, पसायदानाच्या ओळी, आयुष्यावर बोलू काही यासाठीही मागणी असल्याने लवकरच तसे टी-शर्ट्स उपलब्ध करून देऊ, असे सोमवंशी म्हणाले. 'विश्वास ठेवा यात काही पाप नाही', 'या जन्मावर या जगण्यावर', 'एक रात चांदण्यात अन् मिठीत मोगरा', 'अभिमान आहे मला मी मराठी असण्याचा', 'माझं काय तुमचं काय प्रेमात पडलं की असंच व्हायचं', 'हा छंद जिवाला लावी पिसे', 'त्यानं प्रेम केलं तिनं प्रेम केलं', 'तिची का रंगते मेंदी' यासारख्या ३०-४० काव्यपंक्ती या टी-शर्टवर उपलब्ध आहेत.

*** ग्रंथालयासाठी साई शुगर प्रतिटन एक रुपया मदत देणार**

लातूर जिल्ह्यात ग्रंथालय चळवळ वाढीसाठी आणि 'गाव तिथे ग्रंथालय' ही कल्पना रुजविण्यासाठी साई शुगर कारखाना येत्या गळीत हंगामापासून प्रतिटन एक रुपया जिल्हा ग्रंथालयाकडे सुपूर्द करील, अशी घोषणा या कारखान्याचे अध्यक्ष ॲड. राजेश्वरराव बुके यांनी केली.

लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे २७वे वार्षिक अधिवेशन निलंगा येथील महाराष्ट्र सार्वजनिक वाचनालयाच्या विद्यमाने रविवार दि. १४ मार्च २०१० रोजी संपन्न झाले. अध्यक्षस्थानी राज्य साक्षरता परिषदेचे अध्यक्ष ॲड. त्र्यंबकदास झंवर हे होते.

ॲड. राजेश्वर बुके पुढे म्हणाले की, ग्रंथालय चळवळीला सामाजिक आशय असल्याने ॲड. त्र्यंबकदास झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कार्यकर्ते झटत आहेत. प्रत्येक अधिवेशनाला उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. गाव तिथे ग्रंथालय चळवळ वाढविण्यासाठी औसा तालुक्याने जोरदार मुसंडी मारली आहे. निलंगा तालुकाही या वाटेने निघाला आहे. शिवराज पाटील चाकूरकर, डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर, विलासराव देशमुख, दिलीपराव देशमुख यांनी ग्रंथालय चळवळीला जाणिवपूर्वक मदत केली आहे. प्रत्येक गावात ज्या प्रमाणे देवालय असते, त्याप्रमाणे ज्ञान देणारे ग्रंथालय उभारण्यासाठी गावकऱ्यांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.

*** 'टॉम आणि जेरी' झाले सत्तरीचे**

जगभरातील कार्टूनप्रेमींच्या लाडक्या 'टॉम ॲन्ड जेरी' या मांजर-उंदराच्या

जोडगोळीने १ एप्रिलला सत्तर वर्षे पूर्ण केली.

सतत एकमेकांवर कुरघोडी करत राहण्याच्या प्रयत्नात असलेल्या टॉम आणि जेरी या कार्टून पात्रांनी जगभरातील प्रेक्षकांना रिझवले आहे. त्यांच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त नवी दिल्ली येथे विनोदी कलाकार वीर दास यांनी पार्टीचे आयोजन केले होते.

इंटरनेटवर टॉम आणि जेरी यांच्याविषयी माहिती देणारी साडेसत्त्याहत्तर कोटी पाने आहेत. जगभरात 'सुपरस्टार' म्हणून गणल्या गेलेल्या ब्रॅड पिट, अमिताभ बच्चन आणि टॉम क्रूज या तिघांविषयीच्या माहितीच्या एकत्रित पानांपेक्षाही या मस्तीखोर मांजर-उंदराच्या पानांची संख्या अधिक आहे हे विशेष.

विल्यम हन्नाह आणि जोसेफ बार्बरा यांनी १९४० मध्ये 'टॉम ॲन्ड जेरी'च्या गडबडगोंधळाच्या कार्टूनकथा पडद्यावर आणल्या. तेव्हापासून 'टॉम' हे पाळीव मांजर आणि चीझच्या प्रेमात असलेला उंदीर 'जेरी' आपल्या निर्मळ भांडणांच्या माध्यमातून रसिकांना खिदळवत आहेत. टॉम ॲन्ड जेरीच्या वाढदिवसानिमित्त 'कार्टून नेटवर्क' या वाहिनीने दीड तासाचा 'चुहा बिल्ली चोर पुलिस' हा नवा कार्यक्रम तयार केला आहे.

* भारतात इंटरनेट एक्सप्लोररला धक्का

जगभरातील सर्वाधिक वापराचे वेब ब्राउझर असलेल्या मायक्रोसॉफ्टच्या इंटरनेट एक्सप्लोररला गेल्या वर्षभरात भारतात मोठा फटका बसला असून त्याचा मार्केट शेअर २० टक्क्यांनी घसरला आहे. गुगलचे क्रोम आणि मोझिलाचे फायरफॉक्स या दोन वेब ब्राउझर्सनी इं. एक्सप्लोररला चांगलीच टक्कर दिल्याने भारतीय मार्केटमध्ये २००८ मध्ये ७० टक्के असलेला त्याचा वाटा घटून यावर्षी ५१ टक्के झाला आहे. स्टॅटकाउंटर या आयरिश कंपनीच्या अहवालात ही बाब स्पष्ट झाली आहे.

विशेष म्हणजे भारतात कोणतेही निर्बंध नसताना इंटरनेट एक्सप्लोररची पिछेहाट सुरू आहे. विंडोज-७ या ऑपरेटिंग सिस्टिममध्ये क्रोम, फायरफॉक्स, सफारी, ऑपेरा आणि इतर प्रतिस्पर्धी वेब ब्राउझर्सचा पर्याय देणारा 'बॅलट स्क्रीन' देण्याचे बंधन युरोपीय समुदायाने घातल्याने एक मार्चपासून अनेक देशांमध्ये इंटरनेट एक्सप्लोररचा टक्का मोठ्या प्रमाणात घसरला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात इं. एक्सप्लोररचा सध्याचा वाटा ५५ टक्के तर फायरफॉक्स, क्रोम आणि सफारी यांचा अनुक्रमे ३१, ७ आणि ४ टक्के आहे. ग्राहकांना वेब ब्राऊझर्स निवडण्याची संधी मिळायला हवी अशी भूमिका घेत प्रतिस्पर्धी कंपन्यांनी नवीन बदलांचे स्वागत केले आहे.

* 'बिट्स'द्वारे बहुभाषिक डीटीपी सुविधा

'बिट्स' या कंपनीने बहुभाषिक डीटीपी (टाइपसेटिंग) सुविधेचा ३१ मार्च रोजी

शुभारंभ केला. आजच्या घडीला डेस्कटॉप पब्लिशिंग किंवा टाइपसेटिंगची सुविधा इंग्रजी, हिंदी अन्य प्रादेशिक भाषांतून उपलब्ध असली तरी बिट्सच्या या सेवेत कोणत्याही भारतीयच नव्हे तर विदेशी भाषेतूनही टाइपसेटिंग करता येईल. विशेषत: आपल्या उत्पादनाची माहितीपत्रिका, मॅन्युअल, जाहिराती, विक्री तपशील आणि अन्य दस्तऐवज कंपन्यांना एकापेक्षा अधिक भाषांतून प्रकाशित करणे या सुविधेमुळे सोपे होईल असे कंपनीचे संचालक नूलकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. डीटीपी हे भाषाकौशल्यप्रवण कार्य असून, ते काम लिपीचे कोणतही ज्ञान नसलेल्या व्यक्तींकडून पूर्ण केले जाते. त्यामुळे मजकुरात एखाद्या अक्षराची मोडतोड, चुकीचा शब्द होऊन चुकीचा अर्थ किंवा व्याकरणदृष्ट्या मोठी त्रुटी होऊ शकते. मल्टिलिंग्वल डीटीपी संकल्पनेच्या निर्मात्या आणि प्रकल्प संचालिका काजल आंबेडकर या संबंधाने बोलताना म्हणाल्या, ''विविध विदेशी आणि भारतीय भाषांमध्ये कंपनीचे साहित्य भाषांतरित करून छापू इच्छिणाऱ्या कंपन्यांना भेडसावणाऱ्या व्यावसायिक अडचणी बिट्सने ध्यानात घेतल्या आहेत. कोणत्याही भाषेतील मजकूर अधिकाधिक अचूकतेने छापून घेण्याची निकड पाहूनच ही संकल्पना पुढे आली आहे.

*** इंग्रजीचे नवे भावंड : 'रसंग्लिश'**

इंग्लिशचे एक भावंड म्हणून हिंदी चेहऱ्याच्या 'हिंग्लिश'ला पूर्वीच मान्यता मिळाली होती, आता रशियन चेहऱ्याचे 'रसंग्लिश' हे नवे भावंड इंग्लिशला मिळाले आहे. इंग्रजी व रशियन या दोन भाषांच्या एकत्रीकरणातून तयार झालेल्या 'रसंग्लिश' या भाषाविशेषाचा 'युएस-मेरियन ओपन डिक्शनरी'मध्ये समावेश करण्यात आला आहे. 'रुमरॉलॉजी' (अफवाशास्त्र!) या शब्दाच्या निमित्ताने 'रसंग्लिश'चा समावेश शब्दकोशात करण्यात आला आहे. 'अफवा पसरविण्याची कामगिरी किंवा त्याचा अभ्यास' असा 'रुमरॉलॉजी' या शब्दाचा अर्थ आहे. रशियन भाषांतरकार युरी स्टोमा यांनी केलेल्या सूचनेनंतर या शब्दाचा समावेश शब्दकोशात करण्यात आला. स्टोमा यांनी यापूर्वी 'रशियन व इंग्लिश यांचा एकत्रित वापर' या अर्थाने 'रसंग्लिश' हा शब्द स्वीकारण्याची सूचना केली होती. 'व्हॉट काइंड ऑफ सोक (ज्यूस) डू यू वॉन्ट : ॲपलसिनोव्ही (संत्रे) ऑर ॲपल?' यासारख्या उदाहरणांमध्ये एका इंग्रजी वाक्यात 'सोक' व 'ॲपलसिनोव्ही' हे दोन रशियन शब्द बेमालूमपणे वापरले असल्याने 'रसंग्लिश' या भाषाविशेषाचा वापर दिसून येतो, असे स्टोमा यांनी आपल्या सूचनेत म्हटले आहे. या शिवाय 'इंटरनॉट' सारख्या 'रसंग्लिश' शब्द आहे ज्याचा अर्थ होतो 'इंटरनेटमध्ये गुंतून गेलेली व्यक्ती'. अशा इतरही काही 'रसंग्लिश' शब्दांची ओळख करून देण्याचा स्टोमा यांचा विचार आहे.

* 'शाहू मोडक : प्रवास एका देवमाणसाचा'चे प्रकाशन

वयाच्या तेराव्या वर्षी चित्रपटात काम करण्यासाठी पुण्याला आलेला मुलगा. कृष्ण आणि ज्ञानेश्वरांच्या भूमिकेसाठी रसिकांच्या मनात घर करणारा माणूस... स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दीला त्यांच्या पेहेरावात भाषण करणारे... ज्येष्ठ अभिनेते शाहू मोडक यांनी मराठी चित्रपटाला नवी परंपरा दिली, असा उल्लेख करत केंद्रीय राज्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी त्यांच्या जीवनातील विविध पैलूंना उजाळा दिला. अमेय प्रकाशनतर्फे प्रतिभा शाहू मोडक लिखित आणि प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांनी शब्दांकित केलेल्या 'शाहू मोडक : प्रवास एका देवमाणसाचा' या पुस्तकाचे प्रकाशन शिंदे यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ अभिनेत्री बेबी शकुंतला आणि प्रकाशक उल्हास लाटकर यावेळी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, ''मी मुंबईला पोलिस अधिकारी असताना शिवाजी मंदिर परिसरात विवेक आणि शिवाजी पार्क भागात शाहू मोडक यांना नेहमी पाहायचो. त्या वेळी हे दोघेही माझ्यासाठी दूरचे दिवे होते. पुढे राजकारणात आल्यावर बाळ सामंत यांच्यासमवेत मी सिद्धप्रकाश इमारतीतील शाहूरावांच्या घरी गेलो. माझा हात पाहून 'तुम्ही खूप मोठे होणार' असे भाकीत त्यांनी केले. त्या वेळी मी राज्यमंत्री होतो. भविष्य म्हणजे थोतांड असे तेव्हा मी मानीत हातो. पण, शाहूरावांचे भविष्य खरे ठरले. मराठी चित्रपटांना तेजस्विता देणारा आणि नवी परंपरा निर्माण करणारा नट म्हणूनच मी त्यांच्याकडे पाहत होतो. हे पुस्तक एका नटाचे किंवा साध्वीपुरते मर्यादित नाही. सहजीवनामध्ये सामंजस्याने वागले पाहिजे याचे सुरेख चित्रण त्यामध्ये आहे. ख्रिश्चन धर्माचे शाहूराव आणि जैन साध्वी असलेल्या प्रतिभाताई यांचा संसार म्हणजे सर्वधर्मसमभावाचे प्रतीक आहे.''

बेबी शकुंतला म्हणाल्या, ''अभिनयाबरोबरच शाहूरावांना ज्योतिष आणि अध्यात्मामध्ये गती होती. त्यांचा कृष्ण आणि ज्ञानेश्वर सदैव आठवणीत राहील. ते खरोखर देवमाणूस होते.''

* पहिले सम्यक साहित्य संमेलन

''अहंकार आणि फाजील आत्मविश्वासामुळे आंबेडकरी चळवळीच्या चिरफाळ्या उडाल्या आहेत. बेरजेऐवजी सातत्याने होणारी वजाबाकी चळवळीसाठी घातक आहे. सामुदायिक जाणिवा आणि व्यक्तिगत अस्मिता याचा मेळ घातला नाही, तर समाजपरिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य होणार नाही,'' असे मत केंद्रीय नियोजन मंडळाचे माजी सदस्य खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयोजित सम्यक साहित्य संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ विचारवंत डॉ. कांचा आयलया यांच्या हस्ते

झाले. ज्येष्ठ कादंबरीकार दीनानाथ मनोहर संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते.

ज्येष्ठ हिंदी साहित्यिक मोहनदास नैमिशराय, ऑल इंडिया दलित वूमन रायटर्स असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. विमल थोरात आणि स्वागताध्यक्ष परशुराम आठवले या वेळी उपस्थित होते.

डॉ. मुणगेकर म्हणाले, ''विकास असमतोलाचा असंतोष, दलितांवरील अत्याचार यातून दलित साहित्याचा जन्म झाला. दलित पँथरच्या स्थापनेपासून ते बरखास्तीपर्यंत अन्याला शह आणि शोषकांना जरब मिळाली. उपेक्षित समाजाचे जीवन मराठी साहित्यामध्ये प्रभावीपणे आले. त्याविषयी ललित साहित्याने ऋणी राहिले पाहिजे. भाषा जगविण्याचे काम दलित साहित्यच करीत आहे. आंबेडकरी विचारधारा केवळ आपल्यालाच समजली आणि आपणच भाष्यकार आहोत, हा अहंकार चळवळीमध्ये वाढला आहे. एक माणूस दुसऱ्याविषयी कृतज्ञतेने, आपलेपणाने आणि सहिष्णुतेने बोलत नाही. ते वास्तव बदलत नाही, तोपर्यंत शेकडो संमेलने भरवूनदेखील आपण एक इंचदेखील पुढे जाणार नाही.''

ते म्हणाले, ''जातीयवादाचा धोका कधी नव्हे तो वाढला आहे. मुक्त होणाऱ्या स्त्रियांवर अत्याचारांचे प्रमाण वाढते आहे, हे पुण्यनगरीतील उदाहरणांवरून दिसून येत आहे. या प्रश्नांना सामोरे जाताना नवे संदर्भ ध्यानात घेतले पाहिजे.''

डॉ. आयलया म्हणाले, ''जातिव्यवस्था ही भिंत नाही, तर ती ब्राह्मणांनी लादलेली रचना आहे. हाती हत्यार घेतलेले ब्रह्मा-विष्णू-महेश आणि समतेचा विचार देत रचनात्मक कार्य करणारे गौतम बुद्ध-फुले-आंबेडकर यांच्यात संघर्ष सुरू आहे. परिवर्तनाचा विचार देणारी पुस्तकेच शस्त्रावर विजय मिळवतील. सर्व लोक समान आहेत, हा विचार आचरणात आणला पाहिजे.''

रामदास आठवले म्हणाले, ''समाजपरिवर्तनासाठी साहित्याची निर्मिती झाली पाहिजे. साहित्याने आनंद दिला, तरी त्यामध्ये परिवर्तनाची शक्ती हवी. विद्रोही आणि दलित साहित्याने मराठी साहित्य समृद्ध केले आहे.''

मनोहर म्हणाले, ''साहित्यनिर्मिती आणि रसास्वादावर आता शहरांची मक्तेदारी राहिलेली नाही. ग्रामीण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर साहित्य निर्माण होत असून, त्यामुळेच भाषा टिकून राहील आणि तिचा विकासदेखील होईल. शुद्ध भाषेचा भाबडा आत्मकेंद्री आग्रह धरणे चुकीचे आहे. त्यामुळे भाषेचा विकास थांबला तर भाषा जिवंत कशी ठेवायची, हा प्रश्न उपस्थित होतो.''

डॉ. थोरात नैमिशराय, राजपाल यांनी मनोगत व्यक्त केले.

''व्यक्तिविकासाची संधी शेवटच्या माणसापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोकशाहीचे सामाजिकीकरण करायचे होते. सामाजिक दरी मिटली नाही, तर लोकशाहीचा डोलारा ढासळेल,'' अशी भीती साहित्यिक

अर्जुन डांगळे यांनी सम्यक साहित्य संमेलनातील परिसंवादात व्यक्त केली. यामध्ये डॉ. आनंद तेलतुंबडे, उदय नारकर, डॉ. माया पंडित आणि सुधाकर गायकवाड यांचा सहभाग होता.

डॉ. तेलतुंबडे म्हणाले, ''महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व विशद केले. त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या. डॉ. आंबेडकरांनी पुस्तकांना धर्मग्रंथ मानले. दोघांनी शोषितांना जोखडातून मुक्त करण्यासाठी संघटित केले.''

नारकर म्हणाले, ''जातीच्या आधारावर संमेलने भरविणे समाजासाठी घातक आहे. जातिअंतासाठी सर्वकष चळवळ उभारण्याची गरज आहे. भविष्यात या चळवळीला बळकटी येईल.''

डॉ. पंडित म्हणाल्या, ''शिवाजी महाराजांवरील फुले यांचा पोवाडा आणि सार्वजनिक सत्यधर्माचा विचार करायला हवा. बायकांचे मुंडण करणार नाही, यासाठी फुले यांनी त्यांच्या काळात नाभिकांचा संप घडवून आणला होता.''

*** व्यंकटेश चपळगावकर स्मृतीदिन**

सध्याच्या माध्यमांनी 'सेलिब्रेटी'पेक्षा आयुष्यातील खऱ्या 'न्यूजमेकर्स'ना अधिक स्थान देणे आवश्यक असल्याचे प्रदिपादन टाइम्स नाऊ वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक अर्णव गोस्वामी यांनी केले.

पत्रकार व्यंकटेश चपळगावकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त पुणे श्रमिक पत्रकार संघ आणि व्यंकटेशचा मित्र परिवाराने व्याख्यान आयोजित केले होते. पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश कुटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर सरचिटणीस सिद्धार्थ केळकर यांनी आभार मानले.

''आपल्या अनुभवांच्या आधारावर आपण पाच नियम तयार केले असून, त्याद्वारेच कोणतीही बातमी तपासून पाहतो,'' असे सांगून श्री. गोस्वामी म्हणाले, सध्या वृत्तवाहिन्यांवर दाखविण्यात येणाऱ्या बातम्या या प्रामुख्याने प्रसिद्ध व्यक्ती, गैरव्यवहार, क्रीडा क्षेत्र किंवा करमणूक यांच्याभोवतीच फिरताना दिसतात. या सर्व बातम्यांच्या गर्दीमध्ये आपल्या देशातील खरे 'हिरो' मात्र बाजूला राहतात. संजय दत्त यांची तुरुंगातून केली जाणारी सुटका ही आपल्या जवानांच्या बलिदानापेक्षा माध्यमांना श्रेष्ठ वाटते, ही शोकांतिका आहे. काळाच्या ओघात हे बदलणे आवश्यक आहे.''

ते म्हणाले, ''पत्रकारांनी समोरच्या व्यक्तीला जास्तीत जास्त प्रश्न विचारून सत्यापर्यंत पोचण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. कोणतीही बातमी एक-दोन दिवसांपुरती नसते. त्याबाबत सातत्याने विचारणा केली गेल, तरच त्याचा परिणाम राज्यकर्त्यांवर होतो. त्याप्रमाणे जेव्हा कोणत्याही बातमीबाबत कायदेशीर वा नैतिक असा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा नैतिकतेला अधिक महत्त्व दिले गेले पाहिजे.

कायद्यातील तरतुदी काहीही असल्या, तरी अन्याय हा अन्याय आहे याची खात्री पत्रकाराला वाटली तर नैतिक बाजूनेच ठामपणे उभे राहिले पाहिजे.

हे सगळे करताना लोकांच्या स्मृतीतून एखादी घटना लवकर बाजूला जात असली, तरीही पत्रकारांनी ती सातत्याने लोकांसमोर आणण्याची कामगिरी करणे आवश्यक आहे. हे सर्व करताना सर्वोच्च प्राधान्य देशहिताला असले पाहिजे,'' ते म्हणाले, ''बातमी देताना आपण नेहमी मध्यमार्गी विचार केला पाहिजे. आपले मत त्यामध्ये येता कामा नये, असे आवर्जून शिकविले जाते. पण बदलत्या काळानुसार ते बदलले पाहिजे. पुढील वीस वर्षांमध्ये दूरचित्रवाहिन्यांकडे येणारा प्रेक्षक हा प्रामुख्याने 'ब्रेकिंग न्यूज'बरोबरच त्याबाबतची मते ऐकण्यासाठी येणारा असणार आहे. त्यामुळे आपली मते योग्य पद्धतीने मांडणे आवश्यक आहे. त्याचा अतिरेक होणार नाही, याची काळजी घेऊन हे करणे शक्य आहे.''

* संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास ग्रंथरूपात

१ मे १९६० रोजी झालेली संयुक्त महाराष्ट्राची स्थापना ही प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात लालजी पेंडसे लिखित 'महाराष्ट्राचे महामंथन' या इतिहास ग्रंथाची नवी आवृत्ती लोकवाङ्मय गृहातर्फे ८ मे २०१० रोजी प्रकाशित होणार आहे.

या आवृत्तीला ज्येष्ठ नेते एन.डी. पाटील यांच्या प्रस्तावनेची जोड देण्यात आली आहे. त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सुमारे ५० महत्त्वाच्या नेत्यांची चित्रकार विजय मोहिते यांनी काढलेली रेखाचित्रेही पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहेत. मोठ्या आकाराची ६३० पाने असलेले पुठ्ठा बांधणीतील हे पुस्तक ६०० रु. किंमतीचे आहे.

* हजारो पुस्तके आणि कोटींची उलाढाल

एक लाख चौरस फुटांचा प्रशस्त मंडप, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील दोनशेवर प्रकाशक-विक्रेते आणि हजारो पुस्तकांच्या राशी... पुण्यातील 'विंदा करंदीकर साहित्यनगरी'तील '८३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'तील 'ग्रंथप्रदर्शना'ची ही वैशिष्ट्ये. विशेष म्हणजे या प्रदर्शनाला सर्व वयोगटांतील वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. प्रदर्शनाची उलाढाल घसघशीत चार-पाच कोटी रुपयांपर्यंत झाली असावी असा अंदाज आहे.

'राष्ट्रीय पुस्तक प्रदर्शना'च्या धर्तीवर महाराष्ट्रात पहिल्यांदाच चारही बाजूंनी बंदिस्त असलेले स्टॉल संमेलनात उभारण्यात आले होते. अशा स्टॉलमुळे ऊन, वारा, धूळ, पुस्तकांची चोरी यांपासून बचाव झाला. या 'ग्रंथप्रदर्शना'ला २५ ते ६० या वयोगटाचा उत्तम प्रतिसाद मिळाला. एक लाखांहून अधिक पुस्तकप्रेमींनी ग्रंथप्रदर्शनाला

भेट देऊन कथा, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र यांसह धार्मिक पुस्तकांची खरेदी केली. स्टॉल उभारण्यासाठी पीएनआर राजन, डॉ. विनय देशमुख, संजय जोशी यांनी भरपूर मेहनत घेतली.

तरुण वर्गाकडून निसर्ग, आरोग्य, सायन्स या पुस्तकांची मोठी मागणी होती. ऑनलाइन पुस्तकांबद्दल अनेक तरुणांनी चौकशी केल्याचे 'कॉन्टिनेंटल प्रकाशन'च्या देवयानी अभ्यंकर यांनी सांगितले.

मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले अशोक कामटे यांच्यावरील 'टु द लास्ट बुलेट' या पुस्तकाला मोठी मागणी होती. 'लूज युवर वेट', 'लहानमुलांवरील ताणतणाव', 'व्हाय नॉट आय?', 'बराक ओबामा', 'ड्रीम्स फ्रॉम माय फादर' इ. पुस्तकांना चांगली मागणी होती.

*** कथा हा खरोखरच गौण वाङ्मय प्रकार आहे?**

प्रसिद्ध लेखक भालचंद्र नेमाडे यांनी एका मुलाखतीत कथा हा गौण वाङ्मयीन प्रकार असल्याचे मत व्यक्त केले होते. त्या मताला साहित्य संमेलनातील परिसंवादात लेखकांनी आक्षेप घेतला. सर्वसमावेशक, समृद्ध असणारा हा साहित्यप्रकार क्षुद्र कसा असेल, असा प्रश्नही या वेळी उपस्थित करण्यात आला. नेमक्या आणि कमी शब्दात मोठा आशय सांगणाऱ्या अनेक कथा निर्माण झाल्या आहेत. विशेषत: दिवाळी अंकांतून एकाहून एक सरस कथा येतात; त्यांना कमी लेखून चालणार नाही, असा सूर परिसंवादातून निघाला. मात्र, अध्यक्षीय समारेप करताना गो. मा. पवार यांनी 'नेमाडेंचे हे मत उद्वेगातून आले असेल,' असे सांगत अलीकडच्या काळात मोठी साहित्यनिर्मिती झाली नसल्याची खंत त्यातून दिसते, असे मत व्यक्त केले.

प्रा. रा. रं. बोराडे - इतर सर्व वाङ्मय प्रकारांना कवेत घेणारा कथा हा प्रकार गौण कसा असू शकतो? नेमाडे यांनी व्यक्त केलेले मत गंभीर नसले, तरी या परिसंवादात गांभीर्याने चर्चा व्हावी, या हेतूने त्याची मांडणी करण्यात आली आहे. नेमाडेंनी कधीही कथा लिहिली नाही. प्रस्थापितांना धक्का देत जागा निर्माण करत मठाधिपती तयार होतात. नेमाडेसुद्धा मठाधिपती आहेत. माडगूळकर, श्याम मनोहर, जी. ए. कुलकर्णी यांच्या कथा त्यांना आवडतात; तर मग त्या कथांना क्षुद्र कसे म्हणता येईल? संमेलनात परिसंवाद घेऊन या मताला महत्त्व द्यायला नको होते.

ह. मो. मराठे - कथा हा लहान वाङ्मयीन प्रकार असल्याने, त्याला गौण समजणे न्याय्य नाही. वैशिष्ट्यपूर्ण, समृद्ध, ताकदवान आणि लवचिक पद्धतीने लघुकथा लिहिता येतात. इतर भाषांतही कथालेखन झाले आहे. पाश्चात्त्य देशांतही नामवंत लेखकांनी लघुकथा लिहिल्या आहेत. थोडक्यात लिहिला जाणारा, थोडक्यात वाचला जाणारा; पण खूप काही पदरात टाकणारा हा सशक्त वाङ्मयीन प्रकार आहे.

भारत सासणे - हा सैद्धांतिक नसून प्रासंगिक वाद आहे. त्यावर जास्त चर्चा करण्याची गरज नाही. कादंबरीच्या तुलनेने कथेवर चर्चा करता येत नाही. त्यावर नेमके उत्तर नाही. त्यामुळे निकालही लागणार नाही. हे जर गौण वाङ्मय असते, तर लोकमान्यता मिळाली नसती. हा वाङ्मय प्रकार जिवंत, परिवर्तनशील, प्रयोगक्षम असून, त्याचा आशय आकाशाला गवसणी घालणारा आहे. हा प्रकार गौण नाही.

सदानंद देशमुख - कथा हेच साहित्याचे उगमस्थान आहे. कथा उंबरठ्याचं काम करते. कवितेत जो आशय मावत नाही, तो कथेत दिला जातो आणि जो आशय कथेत मावत नाही, तो कादंबरीत सामील केला जातो. अनेक कविता या कथाच असतात. आशावादी दृष्टिकोन निर्माण करण्याचे काम संतवाङ्मय करते. कधी कधी संस्मरणीय अनुभूती देण्याचे काम कथा करतात.

गो. मा. पवार - नेमाडे यांचा विचार उद्वेगातून आला आहे. १९६० नंतर कथेला चालना मिळाली; पण दुर्दैवाने जीवनदर्शन घडविणारी कादंबरी निर्माण झाली नाही. कथेतून मोठे जीवनचरित्र, कृतीची प्रेरणा मिळत नाही. चांगली कथा लिहिणाऱ्या लेखकांनी विस्तृत साहित्यनिर्मिती न केल्याने मोठी हानी झाली आहे. तात्त्विक विचार केल्यास लघुकथेने मोठे वाङ्मयीन कार्य केले आहे.

मंजिरी धामणकर यांनी सूत्रसंचालन केले, तर मृणालिनी चितळे यांनी आभार मानले. तसेच प्रकाशक सुमतीताई कुलकर्णी, मंगला गोडबोले यांचा सत्कार करण्यात आला.

*** महाराष्ट्रात मराठी सक्तीचीच हवी**

'मराठी भाषेचा वापर करण्याची सक्ती करणे काळाची गजर आहे,' या विषयावरील परिसवांदाच्या अखेरीस रसिकांच्या भक्कम पाठिंब्यावर मराठीसक्तीची घोषणा देण्यात आली. माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ, लोकसभेचे माजी सभापती मनोहर जोशी, राज्याचे अर्थमंत्री सुनील तटकरे, रामदास फुटाणे, भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच सरचिटणीस शिरीष पारकर सहभागी झाले होते. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.

न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी - आपली मराठी भाषा फक्त अनुवादाचीच भाषा (उपपत्ती) बनली आहे. केवळ देवनागरीत पाट्या लिहिल्या, तर पुरेसे ठरेल का? महात्मा गांधी यांचा आदर्श ठेवून गेली पन्नास वर्षे मी सार्वजनिक ठिकाणी मराठी किंवा हिंदीतूनच बोललो आहे. अजूनही न्यायालयात मायबोलीत कारभार होत नाही. मराठीची सक्ती करावी लागेल; पण आमची भक्ती इंग्रजीवर असेल, तर फक्त सक्ती करून मराठी टिकेल का?

सुधीर रसाळ - मराठीची सक्ती करावी, अशी स्थिती महाराष्ट्रात का निर्माण झाली, याचा विचार केला पाहिजे. सलग भूभाग, भाषकांची बहुसंख्या आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील त्या भाषेचा वापर या भाषेच्या अस्तित्वाच्या कसोट्या आहेत.

मनोहर जोशी - मराठी सक्तीचा कायदा १९६४ मध्येच करण्यात आला आहे; परंतु त्याची अंमलबजावणी प्रशासनाकडून होत नाही, आणि त्यातील तरतुदीही अपुऱ्या आहेत. त्यामुळे यंदा साहित्य संमेलनात मराठी सक्तीचा ठराव करावा, आणि पुन्हा असा ठराव करण्याची वेळ येणार नाही, असा कठोर कायदा करण्यासाठी सरकारवर दबाव आणावा.

सुनील तटकरे - मराठी भाषा सक्तीची करण्याबाबत सरकारने वेळोवेळी निर्णय घेतले आहेत. एखादे राज्य विकसित होताना उद्योगधंद्याच्या निमित्ताने अन्य प्रांतांमधून नागरिक राज्यात येणे अपरिहार्य आहे. मात्र, त्यांनी मराठीचा वापर केला पाहिजे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

विनोद तावडे - मराठी भाषेच्या सक्तीला महाराष्ट्रात पर्याय नाही; पण फक्त सक्ती करणे पुरेसे ठरणार नाही. पण मराठी भाषेची चळवळ आणि मराठी भाषकांचे सध्याचे आंदोलन यात फरक आहे. मराठीच्या संवर्धनाचा निर्धार करून मराठी जनांची मानसिकता बदलण्याचे प्रयत्न करण्याची गरज आहे.

शिरीष पारकर - मराठीची सक्ती केलीच पाहिजे. आज पन्नास लाख मराठी तरुण बेरोजगार आहेत, अनेक ठिकाणी मराठी तरुणांना नोकऱ्या देण्यास टाळाटाळ करण्यात येते. काही गोष्टींमध्ये स्पष्ट निर्णय घेतले पाहिजेत.

रामदास फुटाणे - दिवंगत नेते यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात मराठी भाषा, साहित्य, कला-संस्कृतीच्या जतन व संवर्धनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. विलासराव देशमुख यांनी इंग्रजी शाळांमध्ये मराठी सक्तीची करण्यासाठी न्यायालयात लढा दिला. पण या विषयावर निवडणुका लढविणे, हा काँग्रेसचा उद्देश नाही.

प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी एकत्र आल्यावर साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर मराठी सक्तीच्या निमित्ताने राजकीय टोलेबाजीही चौफेर रंगली. प्रारंभीच मनोहर जोशी यांनी 'मराठीच्या मुद्द्यावर आम्ही आंदोलने करीतच आहोत, आणि सरकारने सावध राहावे,' असा इशारा दिला. तर 'जोशी सर कितीही म्हटले तरी मराठी पाट्या या राज ठाकरे यांच्यामुळेच लागल्या आहेत,' असा चिमटा मनसेचे शिरीष पारकर यांनी जोशी यांना काढला. अमिताभ बच्चन यांच्या उपस्थितीमुळे मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना मराठी साहित्य संमेलनातील उपस्थिती टाळावी लागते, असा टोला जोशी यांनी लगावला, आणि 'महाराष्ट्र स्वाभिमानी लोकांच्या हाती असावा,' अशी टिपण्णी केली; तर त्याला प्रत्युत्तर म्हणून 'मनोहर जोशी यांनी संसदेत किती वेळा मराठीत भाषण केले,' असा सवाल अर्थमंत्री सुनील तटकरे यांनी केला. भाजपचे

विनोद तावडे यांनी 'आयपीएल'ला करमाफी देण्यापेक्षा तो पैसा मराठी भाषेच्या संवर्धनासाठी वापरता आला असता, अशी टीका केली, तेव्हा तटकरे यांनी कर्नाटकसारख्या भाजपशासित राज्यात तरी आयपीएलवर कोठे कर आहे, असा प्रतिप्रश्न करीत 'मुळात कर नव्हताच, तो माफ करण्याचा प्रश्न नाही,' असे उत्तर दिले. पारकर यांनी बच्चन यांनाही लक्ष्य केले. 'काही काळ कोलकत्त्यात राहून बंगाली शिकणाऱ्या बच्चन यांना इतकी वर्षे महाराष्ट्रात राहूनही मराठी का येत नाही,' असा सवाल त्यांनी केला.

*** कविसंमेलन - १**

साहित्य संमेलनात पहिल्या दिवसाच्या अखेरच्या सत्रात अपेक्षेप्रमाणे रंगलेल्या निमंत्रित कवींच्या संमेलनात निरनिराळ्या प्रांतातून आलेल्या प्रतिभावंतांनी सादर केलेल्या रचनांमधून सर्वसाधारणपणे वर्तमानाबद्दल विषाद आणि भविष्याची चिंता प्रकर्षाने व्यक्त झाली. 'मी निराश होऊन माझ्या नकळत ही प्रार्थना म्हणताना मला श्रद्धेचं बळ लाभू दे' अशा प्रकारच्या भावना कवी सौमित्र यांनी 'प्रार्थना' या कवितेतून व्यक्त केल्या. गेल्या वर्षी फारसा पाऊस झाला नाही. यंदा तसे होऊ नये म्हणून कवी नलेश पाटील यांनी 'तुझ्या चोचीच्या सुईत ओव पावसाचा धागा माझ्या चातक मैतरा, शिव पावसाच्या जागा!' अशा शब्दांत थेट चातकालाच साद घातली.

पावसाळ्यात अतिवृष्टी तर उन्हाळ्यात पाण्यासाठी दाही दिशा फिरायला लावणारे डोंगरदऱ्यांमधली वाडी-वस्त्यांचे वास्तव 'साहेब, इथला पाऊस आम्हाला चार महिने झोडपून काढतो आणि मग उरलेले आठ महिने खडकावर वाळत घालतो' असे मत इगतपुरीच्या तुकाराम धांडे यांनी 'साहेब' या कवितेतून व्यक्त केले. त्या कवितेला रसिकांनी वन्समोअरची दाद दिली.

मंगळवेढ्याचे प्रा. सुरेश शिंदे यांच्या 'मतांचे पीक' या राजकीय व्यवस्थेतील दांभिकतेवर मार्मिक भाष्य करणाऱ्या कवितेसही वन्स मोअर मिळाला. 'कणसात दाणे भरू लागताच शंभर. शंभर. शंभर किंवा पाचशे पाचशे पाचशे गांधीछाप या रासायनिक खताची मात्रा देऊन पाण्याची पाळी द्यावी म्हणजे पीक छान येते आणि पुढील पाच वर्षात, जमीन पुन्हा भेंगाडत राहते' ही त्यांच्या मतांच्या मशागतीची थिअरी चांगलीच लक्षात राहिली. तशाच प्रकारची दाद इंद्रजीत भालेराव यांच्या 'आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या पोरासाठी' या कवितेलाही मिळाली.

'उंटावरून शेळ्या हाकी सरकार शहाणं
त्याच्यामुळे जीव तुझा पडला गहाणं
निवडून दिलेल्याला पाडायला शिक
कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक'

अशा प्रकारच्या नादमयी कडव्यांनी रसिकांनी टाळ्यांचा ठेका दिला.

महेश केळुस्करांनी 'पुढे पुढे दिवस आणखी कठीण होत जातील' या रचनेतून भविष्यात आपल्यापुढे नेमके काय वाढून ठेवले असेल, त्याचे स्पष्ट चित्र रेखाटले.

'एका सुरात कावळे मेजॉरिटीने जातील
राग येईल बैलांना आपल्याला साहित्यिक म्हटले म्हणून,
राजकारण पडले असेल एड्स होऊन
सरकारी हॉस्पिटलच्या जनरल वॉर्डात,
गरीबांना मनाई असेल पेडर रोडवरून चालायला
मद्यालयांची देवालये आणि न्यायालयांची प्रतीक्षालये होतील
विज्ञानाला प्रायोजक मिळवावे लागतील अज्ञानाचे' अशा प्रकारे एक मोठी यादीच केळुस्करांनी रसिकांपुढे ठेवली.

आजच्या पिढीचे लोकप्रिय कवी संदीप खरे यांनी सादर केलेल्या 'आज मी आयुष्य माझे चाचपायला लागलो' या गझललाही खूप छान दाद मिळाली.

'त्रस्त या जिण्यास झाला स्पर्श ओझरता तिचा
अन् नको म्हटले तरी मी जगाया लागलो.
किंवा
मी सुखाला पाळले बांधून दारी माझिया
ते सुखाने झोपले मी गस्त द्यायला लागलो.'

कवी ना. धों. महानोर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कवी संमेलनाची सुरुवात सतीश काळसेकरांच्या 'हाकेतून हद्दपार होत आई' या कवितेने झाली. आसावरी काकडे, वामन निंबाळकर, अपर्णा पाटील, जयश्री जोशी, रसिका देशमुख, शोभा रोकडे, अजीम वनाझ राही, प्रसन्नजीत गायकवाड, पी. विठ्ठल, प्रदीप पाटील, संगीता बर्वे, अशोक कोतवाल आणि कृष्णा चौधरी यांनी आपल्या रचना सादर केल्यानंतर वेळेअभावी हे संमेलन थांबवावे लागले. कवयित्री अरुणा ढेरे यांनी सूत्रसंचालनात नव्या-जुन्या अभिजात कवींच्या रचनांचा संदर्भ देत हे संमेलन आशयसंपन्न केले.

*** निमंत्रितांचे कविसंमेलन - २**

विविध अर्थांच्या, आशयाच्या, लयीच्या, छटांच्या कवितांनी निमंत्रितांचे कविसंमेलन रंगले. प्रसिद्ध कवी-वात्रटिकाकार रामदास फुटाणे आणि प्रा.फ.मुं. शिंदे यांनी आपल्या खास शैलीत सूत्रसंचालन केल्याने या कविसंमेलनात जान आली.

प्रसिद्ध कवी अशोक नायगावकर, अरुण म्हात्रे, प्रकाश होळकर, प्रवीण बांदेकर, नीरजा, अनिल कांबळे, रमण रणदिवे, हेमा लेले, अनुपमा उजगरे, अंजली

कुलकर्णी, मनोहर रणपिसे, स्वाती शिंदे-पवार, संजय घाटगे, रवींद्र भालेराव, चंद्रकांत वानखेडे, माधवराव कदम, शीला निपुणगे, माधवराव कदम, माणिक गेडाम, शिवाजी चाळक, टी. बी. जगतपुरिया, स्वप्नील पोरे, अभय दाणी, जयराम खेडेकर, मनीषा साधू, डॉ. ललित आधाणे, रंजन गंधारकर आदी कवींनी कविता सादर केल्या.

'या घाटावरती उभे इथे किरवंत, हे रडगाणे रोजचे कशाला खंत, ही राख चाळते यमुनेची चाळणी' आदी कविता सादर करून फुटाणे यांनी कविसंमेलनास प्रारंभ केला. फ. मुं.च्या भाषेत 'मिशीमग्न' कवी असलेल्या नायगावकरांनी विंदांना आदरांजली म्हणून आपली 'विंदा' याच शीर्षकाची कविता सादर केली. नीरजा यांनी 'महिला स्पेशल' या कवितेतून महानगरी स्त्रीची व्यथा मांडली. अरुण म्हात्रे यांनी 'बाजू' या कवितेतून मांडलेल्या पन्नाशीतल्या 'रोमान्स'ला रसिकांनी दाद दिली. 'एकाच पंख्याखाली झोपतो आम्ही; पण तिला जोरातला पंखा लागतो अन् मला तो चालत नाही'पासून ते 'पंखा तसाच फिरत असतो'पर्यंत संसारातले सर्व टप्पे म्हात्रेंनी सादर केले.

जालन्याचे जयराम खेडेकर यांनी म्हटलेल्या 'आंब्याची कोय' या ग्रामीण कवितेतील माय-लेकींच्या नातेसंबंधांना दाद मिळाली. स्वप्नील पोरे यांनी 'सिंध... पाहिलेला न पाहिलेला' ही कविता सादर केली. अंजली महागावकर यांनी 'पहाटेला धनी गेलं रानमाळावर' ही ग्रामीण प्रेमकविता ठसक्यात सादर केली, तेव्हा फुटाणे यांनी 'इंडिया'ची वेशभूषा आणि 'भारता'ची भाषा अशी टिप्पणी त्यांच्यावर केली. जगतपुरिया यांनी 'राजकारण... राजकारण खुर्चीसाठी अब्रू तारण' अशा शब्दांत राजकारणावर कोरडे ओढले. जुन्नरचे शिवाजी चाळक यांनी 'धरणासाठी झोपडीचे मोजमाप' या कवितेतून धरणग्रस्तांची व्यथा मांडली. पुण्याच्या हेमा लेले यांनी 'हातात हात दे सखी, गाऊ नव्याने ओवी' म्हणत सद्य:स्थिती उभी केली. स्वाती शिंदे-पवार यांच्या 'स्त्रीकोष' या रचनेलाही रसिकांची दाद मिळाली. रमण रणदिवे यांनी 'जन्माच्या ग्रंथात प्रीतीचा धडा मिळावा जसा अंगठीमध्ये हिऱ्याचा खडा मिळावा' ही गझल सादर केली. प्रवीण बांदेकर यांची 'आपलं काहीतरी हरवल्याचं स्वप्न' ही कविता लक्षवेधी होती. नंतर मराठी भाषेविषयीच्या परिसंवादासाठी निमंत्रितांचे कविसंमेलन थांबविण्यात आले. जेवणाच्या सुट्टीनंतर या संमेलनाचा उत्तरार्ध साजरा झाला. या वेळी प्रफुल्ल शिलेदार, डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी, दीपक करंदीकर, किरण सगर, मारुती कटकधोंड (सखी तू म्हणतेस तेही खरे आहे, कवितेने पोट भरत नाही?), धर्मराज निमसरकर (कुणासाठी जीव द्यायचा, कुणासाठी म्हणायची वंदना), दिवाकर इंगोले, देविदास कुलकर्णी (कुणीच कुणाचं नसतं, प्रेम म्हणजे प्रेम नसतं, तुमचं आमचं स्वप्न असतं), सूर्यकांत जाधव, विलास पाटील

या कवींनी आपल्या रचना सादर केल्या. रामदास फुटाणे यांनी दोन वात्रटिका सादर केल्यानंतर फ. मुं. शिंदे यांच्या 'आई' कवितेने सांगता झाली.

मीरा शिंदे, उद्धव कानडे, डॉ. भगवान ठाकूर, भास्कर बढे (लातूर), तुषार श्रोत्री (मुंबई), विठ्ठल वाघ या कवींनीही आपल्या रचना सादर केल्या.

*** पाडगावकरांनी जिंकली बालमने**

''माझ्यातले मूल अजूनही कायम आहे. त्यामुळे मी मुलांच्या कविता लिहू शकलो. या कवितांमुळे मुलांवर संस्कार व्हावे म्हणून नव्हे, तर त्यांना निव्वळ आनंद देण्यासाठीच माझ्या कविता आहेत,'' असे विचार ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांनी साहित्य संमेलनामध्ये व्यक्त केले.

'पाडगावकर यांच्याशी मुलांचा संवाद' या कार्यक्रमात पाडगावकर यांनी क्षणाक्षणाला टाळ्या घेतल्या आणि चिमुरड्यांना हलवूनही सोडले. केतकी करंदीकर, सक्षम कुलकर्णी, त्याचप्रमाणे महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थिनी प्राजक्ता मोरे, प्राजक्ता भातवले यांनी त्यांना प्रश्न विचारले.

राहुल सोलापूरकर यांनी निवेदन केले. मुलांनी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाला पाडगावकरांनी उत्स्फूर्तपणे उत्तरे दिली. मधुरा गोगटे व बालकलाकारांनी या वेळी पाडगावकरांची बालगीते सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

'सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल का,' या गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली व उत्तरोत्तर कार्यक्रम रंगत गेला. पुण्याबद्दल माझे विलक्षण योगायोग आहेत, असे सांगून पाडगावकर म्हणाले, की १९४९ मध्ये व्यासपीठावर पुण्यात पहिली कविता सादर केली. पुणे विद्यापीठाचे गीतही मी लिहिले व पत्नीही पुण्यातच मिळाली हा योगायोग सांगून त्यांनी 'इतकं दिलं तुम्ही मला, खरं सांगतो माणूस केलं तुम्ही मला' ही कविता सादर केली. बालगीतांबाबत ते म्हणाले, मी कधीकधी मूल होतो, त्यामुळे मुलांच्या कविता सुचतात, सद्‌गुणी होण्यासाठी आनंदी होणे गरजेचे आहे. त्यामुळे माझ्या कविता मुलांवरील संस्कारासाठी नव्हे, तर त्यांना आनंदी करण्यासाठी आहेत. शाळेतील आवडते शिक्षक, गणिताचा अवघड विषय, वयाच्या १४व्या वर्षी लिहिलेली पहिली कविता अशा आठवणी त्यांनी सांगितल्या. 'एकदा सचिन तेंडुलकर आमच्या घरी आला', 'यांचं असं का होतं कळत नाही', 'प्रेम म्हणजे प्रेम असतं' या कविताही त्यांनी सादर केल्या.

*** संतसाहित्याची उपयुक्तता कायम**

''माणसाला विचारांबरोबरच जगण्यासाठी शाश्वत मूल्य देण्याचे सामर्थ्य संतसाहित्यामध्ये आहे. त्यामुळेच एकविसाव्या शतकातही संतसाहित्याची उपयुक्तता कायम आहे,'' असा सूर 'एकविसावे शतक आणि संतसाहित्य' या विषयावरील

चर्चासत्रात व्यक्त झाला.

या चर्चासत्रात बिशप डॉ. फेलिक्स मिचॅडो, डॉ. किशोर सानप, फादर फ्रान्सिस दिब्रिटो आणि डॉ. सदानंद मोरे यांचा सहभाग होता. संमेलनाचे कार्याध्यक्ष उल्हास पवार चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. कल्याणी दिवेकर यांनी सूत्रसंचालन केले.

बिशप डॉ. फेलिक्स मिचॅडो - सध्याच्या काळात सांस्कृतिक लोकशाहीसाठी आपण सज्ज होत आहोत. तेव्हा 'ग्लोबल व्हिलेज' असे म्हणताना संतपरंपरेचा धागा नव्या रूपात उलगडू लागतो. संतविचारांचा अवलंब न केल्यामुळे पर्यावरणाचा प्रश्न, बिघडलेले नातेसंबंध, मोडकळीस आलेली कुटुंबव्यवस्था यासारखे प्रश्न निर्माण झाले. संतसाहित्य हा आत्म्याचा आविष्कार आहे. जगातील सर्व लोकांचा वारसा असल्याने संतसाहित्याचा प्रचार झाला पाहिजे. संतविचारांनीच माणसामाणसांतील अंतर कमी होईल.

डॉ. किशोर सानप - ज्ञानोबा-तुकोबांच्या अभंगवाणीशिवाय आमची पहाट होत नाही. त्यामुळे एकविसाव्या शतकातही संतसाहित्याचे प्रयोजन कायम राहील. विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती झाली, तरी माणूस स्वत:पासून दुरावला आहे. त्याला एकलेपण आले आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी संतविचारांकडेच वळावे लागते. दैनंदिन जगण्याच्या प्रश्नांमध्ये विज्ञाननिष्ठ आणि विवेकवादी संतसाहित्यापासून मानसिक समाधान लाभणे महत्वाचे आहे. भक्ती हाच माणसाच्या मुक्तीचा मार्ग आहे हे उमगलेल्या संतांनी शब्द या शस्त्राचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठी केला.

डॉ. सदानंद मोरे - मराठी भाषा घडविण्याचे काम करणाऱ्या संतसाहित्याने पुरोगामी, सत्यशोधक आणि परिवर्तनवादी चळवळींना प्रेरणा दिली आहे. त्यामुळे संतसाहित्यामध्ये वाङ्मयीन मूल्ये नाहीत असे म्हणणे चुकीचे ठरेल. नवसाहित्य पाश्चात्य प्रेरणांवर बेतलेले आहे. अभंग, लावणी आणि दलित साहित्य हे आपल्या मातीतील वेगळेपण आहे. समाजाच्या उतरंडीवर आधारलेले आणि कूळकथा चांगली नसल्याने दलित साहित्याविषयी अभिमान मिरवावा, अशी परिस्थिती नाही. सध्या भेडसावणाऱ्या दहशतवादाच्या मुळाशी असलेला मूलतत्त्ववाद नष्ट करून परस्परांमध्ये संवाद वाढविण्यासाठी संतसाहित्य हेच उपयोगी पडणारे आहे.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो - संतविचारांचे आचरण न केल्यामुळेच आजचे प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रगतीची शिखरे गाठताना माणूस आत्मभान हरवून बसला आहे. कुपोषणाची समस्या, शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न गंभीर झाला आहे. 'लातूर पॅटर्न'ची चर्चा होत असताना विद्यार्थ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या लातूरमध्येच झाल्या आहेत, हे वास्तव आहे. परधर्माविषयी आदरभाव बाळगून 'अदर इज माय ब्रदर' हे सूत्र जीवनात आणले पाहिजे. विकास साधताना माणूस आणि निसर्ग दोघांचेही नुकसान होत आहे. ओरबाडण्याची प्रवृत्ती वाढत आहे. त्यामुळे

संतसाहित्याची आणि धर्मग्रंथांची शास्त्रीय पद्धतीने चिकित्सा झाली पाहिजे. हे विश्लेषण न झाल्यास औषधाच्या गोळीऐवजी धर्म अफूची गोळी होईल.

*** मेघना पेठे यांची मुलाखत**

प्रत्येक लेखकाच्या लेखनाच्या प्रेरणा वेगवेगळ्या असतात. व्यवसाय, छंद, भडास, सूड, प्रबोधन या लिखाणाच्या विविध प्रेरणांवर त्याचा प्रामाणिकपणा आवलंबून असतो. पण लेखन हा धर्म आहे असे समजून तो लिहित असेल तर त्याने आपल्या लिखाणाशी प्रामाणिक असलेच पाहिजे...

कोणत्याही कलाकारावर एखाद्याचा प्रभाव असतोच. पण प्रभाव म्हणजे अनुकरण होता कामा नये. कमल देसाई, श्याम मनोहर यांना मी मानते. पण माझ्या लिखाणात त्यांच्या लिखाणाशी साधर्म्य साधणारे मुद्दे किंवा शैली दिसून येत नाही. मला माझ्यासारखे लिहायचे आहे; त्यामुळे 'सेकंड हॅण्ड' जगणे मला पटत नाही.

साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी प्रा. रूपाली शिंदे यांनी मेघना पेठे यांना मुलाखतीत अनेक प्रश्न विचारले. बंडखोर वृत्ती, आक्रमकता, प्रमाणिकपणा, स्त्रीपुरुष संबंधांचा वेगवगळ्या अंगानी शोध घेण्याचा प्रयास आणि स्वतंत्र लेखनशैलीशी बांधिलकी... मुलाखतीमध्ये अनेक मुद्दे ठासून मांडताना पेठे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे गुण प्रकर्षाने जाणवत गेले. नातिचरामि, आंधळ्याच्या गायी, हंस अकेला... या पुस्तकांतील स्त्री पुरुष संबंध, स्त्रीचे अस्तित्त्व, दोघांच्या स्वातंत्र्याच्या व्याख्या, मर्यादा, स्वायत्तता आणि लेखकाची लिहिण्याची प्रेरणा यावरची मते पेठे बिनधास्तपणे मांडत गेल्या.

जगण्याचा संबंध मी व्यक्त होण्याशी लावत असल्याने मला प्रामाणिकपणा महत्त्वाचा वाटतो. काहीतरी बंडखोर मांडल्यानंतर वाचकांची नाराजी पत्करावी लागते. याचा लेखकाने विचार करायचा नसतो, त्याने फक्त व्यक्त व्हायचे असते, असे मत पेठे यांनी परखडपणे मांडले. नवरा-बायको, त्यांचे नैतिक आणि शारीरिक संबंध, स्त्रीच्या मर्यादा... अशाच चौकटीत राहून कायम लिहित जाणार का असा प्रश्न समीक्षक किंवा वाचकांकडून होत असतो, यावर पेठे यांनी 'आय एम नॉट अ मॉल ऑर मिमिक,' जेथे सगळे काही उपलब्ध होईल. 'आय ॲम ॲन आर्टिस्ट' असे आक्रमक उत्तर दिले.

*** श्याम मनोहर यांची मुलाखत**

'निवांतपणे विचार करायचा. निवांतपणे लिहायचं. अख्ख्या आयुष्यात ५० प्रश्न कळले आणि त्यातील ४-५ प्रश्नांची उत्तरं शोधली तरी खूप झालं. एवीतेवी आयुष्य वायाच जाणार आहे. मग प्रश्नांची उत्तरं शोधत बसायचं...' ज्येष्ठ लेखक प्रा. श्याम मनोहर यांनी आपल्या विचार आणि लेखन प्रक्रियेचे सूत्र उलगडून दाखवलं.

साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी मुख्य मंडपात चंद्रशेखर जहागीरदार आणि डॉ. अरुणा दुभाषी यांनी श्यामरावांना आणि त्यांच्यातील लेखकाला बोलतं केलं. लिखाणामागील प्रेरणा, माणसाचं जगणं, त्यामागील विचार, निर्णय, तात्त्विकता, तत्त्वज्ञान, आध्यात्म अशा वेगवेगळ्या धाग्यांतून ही मुलाखत बांधली गेली. 'मी माझ्या प्रत्येक निर्णयामागील विचारप्रक्रिया बारकाईनं तपासून पाहतो. कुठल्या विचारांचा आपल्याला त्रास होतो, यावर लक्ष ठेवतो. त्यातील खरी किती आणि भासमान किती, याची पडताळणी करतो. ते विचार आणि त्यास लगडून असलेल्या इतर असंख्य गोष्टी लिखाणातून कुठेतरी दिसतात.' अशी मीमांसा श्याम मनोहर यांनी केली.

आपल्या लिखाणाचा अकडम-तिकडम बाजही श्यामरावांनी यावेळी सांगून टाकला. नुकतीच आलेली 'खेकसून सांगणे आय लव्ह यू' ही कादंबरी पूर्ण होण्यास आठ वर्षे लागली. त्या दरम्यान '१०० मी' लिहून झाली. त्या दरम्यान सात निबंध लिहून झाले. आपलं लिखाण बहुतांश वेळा असंच होत असतं, असं ते म्हणाले.

अमूक गोष्ट होते, हे कळणं म्हणजे ज्ञान नव्हे. ती कशी होते, ते कळणं म्हणजे ज्ञान, असं मत श्याम मनोहर यांनी मांडलं. रिक्षावाला, बिल्डर यांच्या कटकटी आपल्या मागे असतातच, मग ज्ञान म्हणजे काय, हे शोधण्याची कटकट करा की जरा, असा सल्लाही त्यांनी दिला. 'मी माणूस आहे. माझ्यात मत्सर आहे. सगळ्यांतच तो असतो. उगाच नाकारण्याचं ढोंग कशाला? तर हा मत्सर येतो कुठून? तो पूर्णत: नष्ट होऊ शकतो का? इतर षड्रिपूंबाबत असंच होऊ शकतं का, याचा शोध मी घेतो. प्रत्येकाला सुख, दु:ख, कटकटी, नातेसंबंध आहेत. ते सगळं निभावताना माणसाची मूळ प्रेरणा असते शोध घेणं. ते काम प्रत्येकाचं आहे. प्रत्येकानं ही उमेदवारी करायला हवी. त्यातल्या एखाद्याला शोध लागेल.' असं त्यांनी नमूद केलं.

तत्त्वज्ञानाचे प्रश्न प्रत्येकाच्या आयुष्यात येतात. व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर हे प्रश्न येतच असतात. मी ते माझ्या लिखाणातून कायम हाताळत आलो असं सांगत, भारतीय समाजात तत्त्वज्ञान बाजूला टाकून उत्सवी व्हायचं हे फार चाललंय, अशी टिप्पणी मनोहर यांनी केली. 'प्रश्न मेंदूत घट्ट धरणं हा एकांतवास. तो गर्दीतही मिळतो. प्रश्नांची उत्तरं शोधायची तर हा एकांतवास हवाच' अशा निरीक्षणानं मुलाखत संपली.

*** बालसाहित्यावरील परिसंवाद**

सध्याच्या मुलांचे भावविश्व कल्पनेपलीकडे विस्तारले आहे. त्यांच्या मनोरंजनाच्या आणि मूल्यांच्या कल्पनाही बदलल्या आहेत. निखळ मनोरंजन म्हणजे काय हे मुलांकडूनच समजून घेऊन, तसेच ज्ञान आणि मनोरंजनाचा मेळ साधून बालसाहित्य

लिहिले गेले तरच ते त्यांच्या मनाला भिडेल असे मत बालसाहित्यावरील परिसंवादात मांडले गेले.

'मनोरंजनाच्या नादात बालसाहित्यातील मूल्यभान हरवत चालले आहे' या विषयावर परिसंवादात रेणू गावस्कर, रेणू दांडेकर, डॉ. सुरेश सावंत, डॉ. केशव तुपे आदींनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी डॉ. न. म. जोशी होते. मूल्य बदलत राहतात, त्यांचे जीवनातील स्थान बदलत नाही. मूल्ये आजही तितकीच महत्त्वाची आहेत, पण ती मुलांपर्यंत कशी पोहोचवावी, हा खरा प्रश्न आहे. प्रबोधन किंवा संस्कार होत आहेत याचा पत्ताही लागणार नाही, अशा पद्धतीने बालसाहित्याने हे काम केले पाहिजे असे जोशी यांनी नमूद केले.

मुलांना त्यांच्या आजूबाजूला घडणाऱ्या वास्तवातील गोष्टी ऐकायला आवडतात. अशा गोष्टींशी त्यांना रिलेट होता येते. पण तसे साहित्य लिहिले जाते आहे का, या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देता येत नाही. मात्र तसे प्रयत्न नक्की होताहेत, असे मत गावस्कर यांनी मांडले. सध्याच्या पिढीला स्वप्न आणि सत्य दोन्हींची सांगड घातलेले लिखाण हवे आहे, पण मोठ्यांची रेडिमेड स्वप्ने नको आहेत, असे डॉ. सावंत म्हणाले. आपण साहित्याकडे संकुचित नजरेने पाहतो, पण मुलांचा दृष्टिकोन खुला असतो, त्यांना लिहिते करायला हवे, असे दांडेकर म्हणाल्या.

*** वसंत आठवले**

पुस्तकांच्या दुनियेत सगळ्यात महत्त्व मिळते ते लेखकाला! त्याच्या प्रतिभेतून एखादी कलाकृती निर्माण होते तेव्हा त्याचे सारे श्रेय त्या निर्मिती करणाऱ्या लेखकालाच मिळते. पुण्यात भरलेल्या ८३व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाने रस्त्यावर पुस्तक विक्री करणाऱ्या पुण्यातल्या एका ज्ञानभक्ताच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करून एक औचित्यपूर्ण पायंडा पाडला असेच म्हणावे लागेल. पुण्यातल्या बाजीराव रस्त्यावरील सरस्वती मंदिराच्या बाहेरच्या कट्ट्यावर गेली ४० वर्षे जुन्या पुस्तकांच्या विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या वसंत आठवले यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. पुस्तकांच्या दुनियेतील सर्वांत शेवटच्या पायरीवरचा हा पालखीचा भोई किती महत्त्वाचा आहे, याचे भान यानिमित्ताने साहित्य व्यवहारातल्या सगळ्यांनाच आले. त्यांचे वडील यशवंत नारायण आठवले यांना जुनी पुस्तके जमविण्याचा छंद होता. ते रंगभूमीवर छोट्या-मोठ्या भूमिका करत होते आणि त्यांचा गंधर्व संगीत नाटक मंडळींशी जवळचा संबंध होता. ('एकच प्याला'च्या शेवटच्या प्रयोगात त्यांनी बालगंधर्वांबरोबर 'सुधाकर'ची भूमिका केली होती) चित्रपटांच्या आगमनानंतर मराठी रंगभूमीची जवळजवळ वाताहत झाली. यशवंतरावांना त्यांचा छंद उपयोगी पडला. बालगंधर्व हे वसंतरावांचे दैवतच! बालगंधर्वावरील पुस्तकाच्या पंधराशे प्रती

त्यांनी विकल्या.

किर्लोस्कर ऑईल इंजिन्समधील ग्रंथालयातल्या नोकरीतून वसंत आठवले यांनी १९८५ मध्ये स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. त्यापूर्वीपासूनच म्हणजे ७१पासून त्यांनी जुन्या पुस्तकांच्या विक्रीचा व्यवसायही सुरू केला. डॉ.रा.चिं. ढेरे यांच्यासारख्या अनेक संशोधकांना आठवले यांनी पुस्तके पुरवली. जुनी पुस्तके ही केवळ त्यातील साहित्यमूल्यांमुळेच विक्रीयोग्य होतात, याचे उत्तम भान असल्याने पुस्तके मिळवणे आणि ती योग्य त्या व्यक्तींपर्यंत पोहोचवणे यात आनंद असतो. पुस्तकांच्या विक्रीतून मिळणारा पैसा यथातथाच असला, तरी त्यांना पुस्तकाचे मूल्य फार उत्तम रीतीने जाणवते, अस निर्वाळा अनेक ज्येष्ठ साहित्यिकांनी आणि संशोधकांनी दिला आहे. त्यांच्या दृष्टीने पुस्तकांचे प्रेम हेच खरे आणि टिकाऊ! गेली अनेक वर्षे सरस्वती मंदिराच्या कट्ट्यावर पुस्तके विकणाऱ्या या पुस्तक विक्रेत्यामुळेच शनिवारवाड्याचे १८१८ (म्हणजे ज्या वर्षी ब्रिटिशांनी याच वाड्यावर युनियन जॅक फडकवला) आणि १८२८ मधील नकाशे पुणे महानगरपालिकेला मिळाले, जुन्या पुस्तकांत रमणारा हा ज्ञानसाधक साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर विराजमान झाला हीच महत्त्वाची गोष्ट!

*** साहित्य संमेलनात गाडगेबाबा**

कोणाचेही आमंत्रण, निमंत्रण नाही. खिशात पैसेही नाहीत. मात्र, साहित्याची प्रचंड ओढ. साहित्य संमेलनाला जायचेच असा विचार मनाशी पक्का. मजल-दरमजल करीत शेकडो किलोमीटरचा प्रवास करायचा आणि संमेलनस्थळ गाठायचे. १९९३ पासून असा क्रम सुरू आहे. संमेलनात 'गाडगेबाबांची' वेशभूषा करून संमेलनस्थळाची साफसफाई करण्याचा पायंडा या 'मराठीच्या वारकऱ्याने' पाडला आहे.

विठूरायाची आर्त ओढ असणारे वारकरी कोणतेही आमंत्रण, निमंत्रण नसताना पंढरीच्या सोहळ्यात सहभागी होतात. अगदी तसेच सोलापूरमधील खैराव या खेड्यात शेती करणारे फुलचंद जरीचंद नागटिळक दरवर्षी साहित्य संमेलनात गाडगेबाबांप्रमाणे वेशभूषा करून वावरतात. केवळ वेशभूषाच नव्हे तर संमेलनस्थळाची साफसफाईही करतात; त्यामुळे ते लक्ष वेधून घेतात.

१९९३ च्या सातारा साहित्य संमेलनात ते प्रथम उपस्थित राहिले. त्यानंतर एकही संमेलन चुकवले नाही. पुण्यामध्ये सुरू असलेल्या साहित्य संमेलनासाठी नागटिळक यांनी सोलापूर ते पुणे असा २५० किलोमीटरचा पायी प्रवास चार दिवस मजल दरमजल करीत केला. संमेलनाच्या संयोजकांकडून चांगली वागणूक मिळते, असे त्यांनी सांगितले. खाण्याची, राहण्याची कोणत्याही ओळखपत्राशिवाय सोय केली जाते, असेही ते म्हणाले.

नागटिळक 'नटसम्राट' ही सादर करतात. आतापर्यंत विविध महाविद्यालयांमध्ये त्यांनी नटसम्राट सादर केले आहे. ग्रामीण भागामध्ये 'नटसम्राट' पोहोचवा, असे पत्रही त्यांना कुसुमाग्रजांनी दिले आहे. वयाची चाळीशी पार केलेल्या नागटिळक यांनी गेल्यावर्षी महाबळेश्वरला झालेल्या साहित्य संमेलनाला हजेरी लावली होती. संमेलनालाही आलेले रसिक गाडगेबाबांचा पोशाख पाहून आस्थेने चौकशी करतात.

*** परदेशी साहित्यिकांच्या प्रतिक्रिया**

८३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अमेरिका, कॅनडा, सौदी अरेबिया, सिंगापूर येथील मराठी साहित्यिकही आवर्जून उपस्थित होते. मराठीभाषक या नात्याने सहभागी होऊन महाराष्ट्रात होणाऱ्या या संमेलनातूनच साहित्याची अधिक चांगली ओळख होते असे त्यांनी सांगितले.

खास साहित्य संमेलनासाठी आठ वर्षांनी अमरिकेतून भारतात आलेल्या मुग्धा येवलेकर-अलूरकर म्हणाल्या, या संमेलनात विचारांची मोठी देवाण-घेवाण होत आहे. अनेक मान्यवर साहित्यिक, रसिक वाचक भेटत आहेत. एवढेच नव्हे, तर वाचन संस्कृतीसाठी अमेरिकेत आम्ही करत असलेले प्रयोग व येथील वाचक करत असलेले प्रयोग यासदंर्भातील कल्पना एकमेकांना सांगता येत आहेत. संमेलनाचे आयोजन उत्कृष्ट असून, परिसंवादातून अनेक तज्ज्ञांची मते ऐकायला मिळत आहेत.

*** साहित्यपंढरीचा अनोखा वारकरी**

जेव्हा जेव्हा फुलांना बहर येतो, तेव्हा तेव्हा
साहित्य संमेलनाची आठवण येते...
विसरा विसरा पण साहित्य संमेलनाच्या
जुन्या व नवीन आठवणींना विसरू नका.
त्यातील स्वारस्य व आठवणी निवळून निवळून ज्ञानाची शिदोरी वेचित जा...

यंदाच्या ८३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात एका रसिक कवीने सादर केलेली ही एक उत्स्फूर्त कविता आहे. अशा असंख्य कवितांनी ८३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा कवी कट्टा चांगलाच रंगला. 'साहित्यपंढरी'च्या अनोख्या वारकऱ्यांचे दर्शन यावेळी उपस्थितांना घडले.

गेल्या ३५ वर्षांपासून साहित्य संमेलनाला स्वखर्चाने आवर्जून हजेरी लावणारा ६८ वर्षांचा 'अनोखा कवी' नारायणसा परशुरामसा हबीब! एका ओळीवर उत्स्फूर्तपणे संपूर्ण कविता सादर करणे. साहित्य आणि कविता जिवंत ठेवण्यासाठी धडपडणाऱ्या संस्था व संघटनांच्या विनामूल्य कार्यक्रमांना उपस्थित राहणे ही त्यांची खासियत. 'वस्त्रे मळलेली असली तरी मुखातून बाहेर येणारी शुद्ध भाषा', गावाकडचा असूनही 'इंग्रजी'चे उच्चारण करणारी शुद्ध वाणी यामुळे हबीब यांची उपस्थिती लक्षवेधक

ठरली. अध्यात्माचा स्पर्श लाभलेले नारायणसा हबीब यांनी आपल्या खास वैशिष्ट्यपूर्ण शैलीत कविता सादर करून उपस्थितांना 'उन्हाच्या तडाख्यात' तृप्तीची अनुभूती दिली.

*** रेचल पॉल - मुंबईच्या इतिहासावर डॉक्टरेट**

अमेरिकेतील बोस्टन विद्यापीठात 'मुंबईचा इतिहास' या विषयावर पीएच.डी. करणाऱ्या रेचल पॉल या युवतीने साहित्य संमेलनाला हजेरी लावली. मुंबईचा इतिहास आणि तेथील जीवनाचा अभ्यास करण्यासाठी मराठी अत्यावश्यक असून, पु.ल., विजय तेंडुलकर यांचे साहित्य वाचल्याशिवाय आपले संशोधन अपूर्ण राहील, असे मत तिने व्यक्त केले. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने तिने पुस्तक प्रदर्शनाला भेट दिली आणि अनेक लेखकांची पुस्तके विकत घेतली. साहित्य संमेलनाची ही प्रथा खूपच प्रेरणादायी असल्याची भावना तिने व्यक्त केली.

जॉर्डन बोर्कमन ही युवतीही मराठी शिकत आहे. मराठी वाङ्मयाच्या आवडीतूनच मराठी शिकत असल्याचे तिने सांगितले.

*** उत्कृष्ट साहित्य पुरस्कारासाठी आवाहन**

सृजनशक्ती श्रमिक फौंडेशन कोल्हापूर, चिंचवाड, ता. करवीर संचालित सृजनशक्ती साहित्य विचार मंच यांच्या विद्यमाने मराठी उत्कृष्ट साहित्य कृतीस पुरस्कार देण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्राची मराठी लेखक व प्रकाशक यांनी समीक्षणासाठी (परीक्षण) फक्त कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा विचार होणार असल्याने पुस्तकांच्या तीन प्रती व लेखकाचा अल्पपरिचय १५ जून २०१० पर्यंत पाठवावे असे आवाहन सृजनशक्ती श्रमिक फौंडेशन कोल्हापूर, चिंचवाड ता. करवीर यांच्या वतीने करण्यात आले आहे. सदरचा पुरस्कार ग्रामीण कथाकार व कांदबरीकार शंकर पाटील उत्कृष्टसृजन साहित्य निर्मिती पुरस्कार या नावाने देण्यात येणार आहे. प्रत्येक वर्षी एका वाङ्मय प्रकाराला पुरस्कार दिला जाईल. यामध्ये प्रामुख्याने कादंबरी, कथा, कविता, वैचारिक आणि संकीर्ण या वाङ्मय प्रकाराचा समावेश आहे या वर्षी 'कादंबरी' या वाङ्मय प्रकारासाठी पुरस्कार दिला जाणार आहे. १ जानेवारी २००३ ते ३१ मार्च २०१० या कालावधीत प्रकाशित झालेल्या कादंबरीचा प्रामुख्याने विचार करण्यात येईल. या पुरस्काराचे स्वरूप रोख रुपये दहा हजार, गौरव चिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे आहे. संपर्क - अध्यक्ष सृजनशक्ती श्रमिक फौंडेशन, कोल्हापूर 'आत्मीयता निवास' चिंचवाड, ता. करवीर, जि. कोल्हापूर ४१६ ११९.

हा पुरस्कार वि.स. खांडेकर जन्मजयंती सप्ताहाच्या निमित्ताने जानेवारी २०११ मध्ये ग्रामीण युवा मराठी साहित्य संमेलनात' देण्यात येणार आहे.

❐

दखल

वाङ्मयकृतीची अलौकिकता

मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या भाषणातील महत्त्वपूर्ण भाग

'साहित्याची भाषा' ही एक वेगळी गुहा आहे. म्हणताना आपण म्हणतोच, 'ही मराठी कादंबरी', 'हे इंग्रजी नाटक', 'ही रशियन कथा'. आपले हे बोलणे खरेच असते; परंतु तिथे आपण साहित्यकृतीसंबंधी बोलत नसतो तर तिचे भाषिक वर्णन करीत असतो. साहित्यकृतीची दर्शनी भाषा अशी देशकालवाचकच असते. साहित्यकृतीचा आस्वाद घेताना तिचे हे दर्शन अस्तित्व आकळावेच लागते. ते न कळताही साहित्यकृतीचा आस्वाद घेता आला असता तर मग आणखी काय हवे होते? कुठल्याही भाषेतील साहित्यकृती ती भाषा न शिकता आपण अनुभवू शकलो असतो! साहित्यकला आणि साहित्येतर ललितकला यांच्यातील हा भेद निर्णायक आहे.

जर्मन संगीतकाराचे संगीत, रशियन नर्तिकेचा बॅले, फ्रेंच चित्रकाराचे चित्र आपण जसे आस्वादू शकतो, तशा त्यांच्या त्यांच्या भाषेतील साहित्यकृती आस्वादू शकतो, असे का होते? संगीत-नृत्य-चित्र या संवेदनानिष्ठ कला आहेत. संवेदना सार्वत्रिक असतात, निसर्गदत्त असतात, याच्या उलट साहित्यकला संवेदनानिष्ठ कला नाही, ती भाषा (सामग्री) आणि अनुभूती (माध्यम) यांनी घडलेली असते.

भाषा संस्था निसर्गदत्त नसते; ती मानवनिर्मित, समाजनिर्मित संस्था आहे. जर ती निसर्गनिर्मित असती, तर संवेदनांप्रमाणे ती सार्वत्रिक झाली असती, जगात सर्वत्र एकच भाषा असती. आपणा सर्वांची मग किती सोय झाली असती! पण असे नाही रे बाबा! त्या त्या भाषेतील साहित्यकृती अनुभवण्यासाठी त्या त्या भाषेचे ज्ञान अपरिहार्य असते. कवीला आणि आस्वादकालाही. दुर्बोध समजल्या जाणाऱ्या वाङ्मयकृतीच्या संदर्भात कवीचे किंवा रसिकांचे भाषाज्ञानच तर तोकडे पडत असते.

कवितेच्या व्याख्या अनेक आहेत. त्यापैकी, 'पोएट्री इज लँग्वेज चार्ज्ड विथ मिनिंग टू इट्स अटमोस्ट पॉसिबल डिग्री.' कमाल अर्थवत्तेने भारलेली भाषा म्हणजे कविता - हे जर खरे असेल तर दुर्बोध कविता ही कविताच नव्हे - कवीच्या वा

वाचकाच्या अंगाने– कारण ती भाषिक कृतीच नसते, तो केवळ भाषाभास असतो. ज्या कवितेला दर्शनी अर्थच नाही, तिला कविता काय, भाषा तरी कसे म्हणायचे? आणि कवितेची व्याख्या तर 'कमाल अर्थवत्तेने भरलेली भाषा' अशी...! काय? भारतीय साहित्यशास्त्राने अर्थाचे काय उगाच इतके प्रकार सांगितले?

१) वाच्यार्थ ऊर्फ संकेतित अर्थ उर्फ मुख्यार्थ.

२) तात्पर्यार्थ ऊर्फ वाक्यार्थ

३) लक्ष्यार्थ ऊर्फ अर्पितार्थ

४) व्यंग्यार्थ ऊर्फ ध्वन्यर्थ ऊर्फ प्रतीयमान अर्थ.

परिभाषेत निर्भेळ वाच्यार्थ असतो, व्यावहारिक भाषा ही वाच्यार्थप्रधानच असते. शास्त्रीय लेखात अत्यावश्यक प्रसंगीच लक्षणा वापरायची असते. ज्यांना आपण वाकप्रचार, म्हणी, अलंकार म्हणतो ते सर्व लक्ष्यार्थाचे प्रकार असतात. अनेकदा समाजात म्हणींचा लाक्षणिक अर्थ लक्षात न घेता, केवळ वाच्यार्थ लक्षात घेऊन त्यावर रण माजवले जाते, त्याचे कारण लक्ष्यार्थ अज्ञान हेच होय.

वाङ्मयामध्ये वाच्यार्थ असतो, लक्ष्यार्थ असतो; शिवाय या दोन अर्थांतून निर्माण होणारा अर्थाचा अर्थ असा, व्यंग्यार्थ असतो.

व्यवहारात अगदी पुसटपणे आणि अपवादाने व्यंग्यार्थ आविष्कृत होतो पणवाङ्मयकृती व्यंग्यार्थप्रधानच असते. व्यंग्यार्थहीन काव्य हे काव्यच नसते. त्याला आनंदवर्धनाने 'अधमकाव्य' म्हटले आहे. तेव्हा त्याचे विरोधक म्हणाले, ''व्यंग्यार्थहीन काव्य जर काव्यच नसते, तर त्याला तुम्ही अधम 'काव्य' तरी का म्हणतात?'' बिनतोड वाटतो ना प्रश्न? पण आनंदवर्धनाचे उत्तर त्याहूनही बिनतोड आहे. तो म्हणतो, ''तुम्ही म्हणता ते खरे आहे. व्यंग्यार्थहीन काव्य काव्यच नसते. तरीही आम्ही त्याला अधम काव्य म्हणतो, त्यामागची कवीची काव्यनिर्मितीची इच्छा लक्षात घेऊन!''

व्यंग्यार्थ हा अर्थझंकार असतो, तो अर्थसंस्कार असतो. त्याच्या आकलनासाठी वाचकापाशी प्रतिभा असावी लागते - नुसती रसिकता नाही. म्हणून तर मम्मटाने रसिकाला 'प्रतिभाजुष' म्हटले आहे, 'सहृदय' म्हटले आहे. ज्याला कवितेचे हृद्‌गत कळते तो सहृदय.

वाङ्मयकृतीमध्ये शब्द, वाक्य, अर्थ, अर्थाचा अर्थ हे सारे असतेच - असावेतच; परंतु हे अर्थ स्थिर नसतात; फिरते, गतिमान, चैतन्यपूर्ण असतात. या जिवंतपणातून त्या अर्थपुंजाला लाभत असते. या लयधर्मातून विविध अर्थांचे विविध बंध तयार होतात. संगीतकलेच्या जाणकाराला ही प्रक्रिया सहज लक्षात येईल. या लयबद्ध अर्थपुंजांनाच मी लयव्यूह असे म्हणतो.

वाङ्मयकृतीची खरी भाषा लयव्यूहाची भाषा असते. ती कालची नसते, आजची

नसते, ती मराठी नसते, अमराठी नसते; ती लयाची-चैतन्याची-सौंदर्याची-रसाची चिरकालिक भाषा असते.

ती समजायची नसते, आस्वादायची असते. ती आस्वादण्यासाठी तिच्याप्रमाणे आपल्यालाही देशकालपरिस्थिती या सीमेपासून मुक्त व्हावे लागते.

आपले व्यक्तिबंधन असे सुटले, की आपला आस्वाद स्वसापेक्ष न राहता मूल्यसापेक्ष होतो.

भाषाशुद्धी आणि भाषासमृद्धी

भाषाशुद्धीसंबंधीची आपली भूमिका जोखून घेतली पाहिजे. पारतंत्र्याच्या काळात भाषाशुद्धी हे स्वातंत्र्यलढ्याचेच एक हत्यार होते. परभाषिक शब्द अव्हेरल्याने स्वातंत्र्याची चाड धारदार होत होती, परकीयांबद्दलची चीड चेतवली जात होती. आता स्वांतत्र्यकाळात भाषाशुद्धीचा विचार भाषा संस्था आणि सांस्कृतिक सातत्य या अंगाने केला पाहिजे. परभाषेतील शब्द घेऊच नयेत अथवा परभाषेतील शब्द बिनदिक्कत वापरत जावेत, या दोन्ही भूमिका एकांगी आहेत.

अहो, परकीय शब्दांनी भाषा विटाळत नाही, परकीय प्रत्यय आणि क्रियापदे यांनी भाषा विटाळते. परकीय शब्दही घ्यायचे. अर्थभेद आणि भावभेद लक्षात घेऊन तसे आपण नकळत करीतही असतो. जसे - वैद्य-डॉक्टर, मेज-टेबल, लेखणी-पेन इ. परंतु नेहमीच असा विवेक आपण बाळगतो असे नाही. आपल्या भाषेतील रूढ, रूचकर आणि स्वादिष्ट शब्द हुसकावून त्यांच्या जागी सांस्कृतिक सातत्य नसलेले मड्डमी शब्द वापरणे म्हणजे खचितच आपली भाषा भ्रष्ट करणे होय; परंतु आपला मूळ शब्द कायम ठेवून त्यापेक्षा किंचित वेगळी अर्थच्छटा किंवा भावच्छटा दाखविणारा परभाषिक शब्द वापरणे, यात गैर काहीच नाही - नव्हे, हे भाषासमृद्धीचे लक्षण आहे. आंग्ल भाषेने घी, पक्का, तिपाई, बंदोबस्त असे कितीतरी भारतीय शब्द अंगीकारले आहेत, त्यामुळे इंग्रजी भाषेची शब्दसंपत्ती वृद्धिंगत झाली आहे. परकीय शब्दांना भिऊ या नको. अशा भीरूतेमागे सांस्कृतिक अभिमान थोडा आणि सांस्कृतिक न्यूनगंड जाडा असतो.

भाषाशुद्धीबरोबरच भाषासमृद्धीकडेही आपण लक्ष दिले पाहिजे. ही भाषासमृद्धी कशी येते? केवळ परभाषेतील भिन्न अर्थच्छटा असलेले शब्द स्वीकारल्याने नव्हे - ती चिंचोळी पायवाट आहे. तिच्याच जोडीला बोलीतील शब्द स्वीकारले पाहिजेत. आपल्या भाग्याने प्रमाण मराठीला अनेक बोली लाभल्या आहेत; वऱ्हाडी, खानदेशी, दखणी, मावळी इ.

अहो, बोली हेच भाषा संस्थेचे आद्य रूप असते. कुठलीही बोली ऐका - तिच्यात तालबद्धता, नादमधुरता, भावपूर्णता हे गुण ओतप्रोत असतात. कालांतराने

तिच्यातील तालबद्धता आणि नादपूर्णता यांचा विकास होऊन पद्यभाषा जन्मास येते, तर तिच्यातील सुप्त वैचारिकता पल्लवित होऊन गद्य भाषा अवतीर्ण होते.

बोली, भाषा आणि परिभाषा यांच्यातील भेद-प्रभेद आकळले म्हणजे त्यांच्यात उच्चनीचता नसून प्रयोजनभेद आहे, हे लक्षात येते.

परिभाषा फक्त शास्त्रातच नसते; प्रत्येक जीवनव्यवहारात, तो व्यवहार सुलभ करण्यासाठी, अलिखित परिभाषा असतेच. कास्तकाराची परिभाषा वेगळी आणि गृहिणीची परिभाषा वेगळी. माझ्या बालपणी खेड्यातल्या माझ्या मावश्या पातेलं - भगुलं- ओगराळं - पळी - डाव - चाटू - सराटा - उलथणं - घंगाळं -हंडा - गुंड... अशी माजघरातली परिभाषा हमेशा वापरत, ती काय आपलं पांडित्य दाखवायला? नाही, व्यवहार सुकर आणि अचूक व्हायला.

शास्त्रातील परिभाषासुद्धा याच हेतूने, पण अधिक प्रगल्भतेने निर्माण होत असते. आपल्या अज्ञानामुळे अथवा आलस्यामुळे ती आपणास अवघड वाटत असते. खरेतर तिच्यामुळे विषय अचूक आणि आकलनक्षम होत असतो.

एखादे नवे शास्त्र जेव्हा परदेशातून आपल्या प्रदेशात येते, तेव्हा स्वाभाविकच परभाषेतील परिभाषा जशीच्या तशी वापरावी लागते किंवा ती भाषांतरित करावी लागते.

बोली, भाषा व परिभाषा यांच्या संदर्भात हा विवेक आपण नेहमी अंत:करणात बाळगला पाहिजे.

❐

सर्व वाचक, सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधा

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी
मंडपाजवळ, कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९ ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

भा. रा. भागवत यांची जन्मशताब्दी

३१ मे १९१० हा मराठीतील एक अग्रगण्य बालसाहित्यकार भा. रा. भागवत यांचा जन्मदिवस. या दिवशी या वर्षी (२०१०) त्यांची जन्मशताब्दी पूर्ण होईल.

'फास्टर फेणे' चे जनक म्हणून भागवतांना भारतीय पातळीवर प्रसिद्धी लाभली. फास्टर फेणेच्या साहसकथा रविवार पुरवण्या आणि मासिकात प्रसिद्ध होत राहिल्या. त्यांच्याच डोळ्यादेखत 'फास्टर फेणे' हा त्यांचा मानसपुत्र हिंदी-इंग्लिशमध्ये गेला. त्याच्यावरची चित्रकथा निरनिराळ्या हिंदी, मराठी, इंग्लिश वृत्तपत्रात नियमितपणे येत राहिली. तीही बालवाचकांना प्रिय झाली. विविध माध्यमांमधून अशा प्रकारे मिरवण्याचे भाग्य भा. रा. भागवतांच्या फास्टर फेणेला लाभले. तसे ते इतर कुठल्या मराठी बालसाहित्यकाराला गत शतकात तरी लाभले नाही. आता हे शतक तर प्रिंट मिडिया - मुद्रित पुस्तकापासून इंटरनेट, ई-बुक, मल्टिमिडिया, डीव्हीडी, ग्राफिक नॉव्हेल, कॉमिक्स, दूरचित्रवाणी मालिका यांच्याकडे वेगाने झेपावत आहे. त्यामुळे या पुढच्या काळात एखादी यशस्वी साहित्यकृती ही छापील पुस्तकाप्रमाणेच या सर्व माध्यमांद्वारेही सहजपणे उपलब्ध होणे यात फारशी नवलाई उरणार नाही. परंतु फास्टर फेणे ज्या काळात प्रथम अवतरला त्या काळात म्हणजे १९६२ ते १९७५ या काळात रविवार पुरवण्या, मासिके, दिवाळी अंक आणि पुस्तके या मुद्रित माध्यमांविना अन्य पर्यायच उपलब्ध नव्हता. त्यामुळे फास्टर फेणेचे त्या काळात हिंदी-इंग्रजीत अनुवाद होणे, कॉमिक्स-चित्रकथेच्या रूपात प्रकटीकरण होणे, पुढे दूरदर्शन मालिका तयार होणे हे सर्व कल्पनेपलीकडचेच होते. हे दुर्मिळ भाग्य भा. रा. भागवतांना लाभले. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात बालकुमार साहित्यक्षेत्रातले बिनीचे शिलेदार म्हणून वा. गो. आपटे (मंगळावर स्वारी, आनंद मासिक) ना. धों. ताम्हणकर (गोट्या, चिंगीचे जनक), सानेगुरुजी (श्यामची आई, गोड गोष्टी १० भाग, अमोल गोष्टी, बापूजींच्या गोड गोष्टी), मालतीबाई दांडेकर (सोनेरी नदीचा राजा, गुलाबकळी, सुलेमानचा खजिना) यांना मान दिला जातो, तसा उत्तरार्धात भा. रा. भागवत यांना दिला जाणे स्वाभाविक वाटते. पं. महादेवशास्त्री जोशी, गो. नी. दांडेकर, अमरेंद्र गाडगीळ, रत्नाकर मतकरी, यदुनाथ थत्ते, सुधाकर प्रभू, सुमती पायगावकर, राजा मंगळवेढेकर, लीलावती भागवत, शांता शेळके, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, वामनराव चोरघडे, शं. रा. देवळे, श्री. बा. रानडे वगैरे लेखकांनीही बालसाहित्यात मोलाची भर या काळात घातली आहे हे खरं आहे. पण त्या सर्वांत भा. रा. भागवतांचे योगदान विशेष लक्षवेधक ठरते. बालनायक 'फास्टर फेणे'चे वीस भाग अजूनही कुमार वाचकांचे रंजन करतात आणि त्यांना साहसाची प्रेरणा देतात. आपल्या बुद्धीचा, युक्तिचातुर्याचा, कल्पकतेचा वापर करून संकटातून, अडीअडचणीतून मार्ग काढण्याचा वस्तुपाठ फास्टर फेणेच्या दीडदोनशे कथा देतात.

बालकुमारांना विज्ञानक्षेत्रातील विविधांगी प्रगतीची भावी दिशा दाखवणाऱ्या ज्युल व्हर्न या फ्रेंच लेखकाच्या विश्वख्यात वीस विज्ञानकथांची संक्षिप्त भाषांतरे किंवा रूपांतरे करूनही भा. रा. भागवत यांनी मराठी बालकुमार वाचकांसाठी एक बहुमोल खजिनाच खुला करून दिला आहे. चंद्रावर स्वारी, ८० दिवसात पृथ्वी प्रदक्षिणा (झपाटलेला प्रवासी), पाताळ लोकची अद्‌भुत यात्रा, पृथ्वीच्या मध्याचा शोध, उत्तर ध्रुवावरील मोहीम, धूमकेतूच्या शेपटावर, हिम प्रदेशातील संचार, बलूनमधून फेरफटका यासारखे विषय कथात्मक स्वरूपात पेश करण्यातील ज्युल व्हर्नची प्रतिभा विलक्षणच होती. १८६३ ते १९०५ या काळात ज्युल व्हर्नने लिहिलेल्या या विज्ञानाधिष्ठित कादंबऱ्या युरोपमध्ये अत्यंत गाजत राहिल्या, त्यांचे अनुवाद युरोपियन भाषांमध्ये लगोलग होत राहिले. फ्रान्समधला सर्वांत श्रीमंत लेखक म्हणून ज्युल व्हर्नचा निर्देश त्या काळात होई. भविष्यात विज्ञानाद्वारे माणूस काय काय करू शकेल, मानवाला स्थळ-काळावर विजय मिळवणे कसे शक्य होईल, तो अंतरिक्षयानाने अंतरिक्षात जाऊ शकेल, परग्रहावर वस्ती करू शकेल, समुद्राच्या तळाचा शोध घेऊ शकेल, जमिनीप्रमाणेच पाण्यावर चालणाऱ्या वाहनाचा शोध त्याला लागू शकेल वगैरे, त्या काळात केवळ कविकल्पनाच वाटणाऱ्या शक्यता गृहीत धरून त्याने त्या कादंबऱ्यांतून रंगवल्या. पाणबुडी, अंतरिक्षयान, अग्निबाण, टीव्ही, रेडिओ, यंत्रमानव वगैरे कल्पना त्याने त्या कादंबऱ्यांमध्ये वापरल्या. त्या कल्पना पुढे प्रत्यक्षात आणण्यासाठी युरोप-अमेरिकेतले शास्त्रज्ञ प्रयोगशाळांमध्ये वर्षानुवर्षे प्रयोग करीत राहिले. भा. रा. भागवत यांनी हा सगळा खजिना मराठीत आणला. हेही कार्य फार महत्त्वाचे आहे. 'फास्टर फेणे' ही भा. रा. भागवतांची स्वतंत्र निर्मिती आहे तर ज्युल व्हर्नच्या विज्ञानकथांची रूपांतरे ही अनुवादाच्या माध्यमातून विज्ञानयुगाच्या शक्यतांची व्यापक जाणीव देण्यासाठी केलेली पेशकश मानावी लागेल. 'ॲलिस इन वंडरलँड'चे 'जाईची नवलकहाणी' हे रूपांतर अफलातून आहे. भा. रा. भागवतांनी टालस्टॉय, मोपासां, ओ. हेन्री वगैरे लेखकांच्या कुमारोपयोगी कथा निवडून त्याही बिपिन बुकलवार (बुक लव्हर) याच्या माध्यमातून संक्षिप्तपणे कथन केल्या आहेत.

या त्यांच्या विपुल लेखनामुळे भा. रा. भागवत आणि लीलावती भागवत या दांपत्याला मराठी बालकुमार साहित्य क्षेत्रातले मानाचे अग्रस्थान लाभणे क्रमप्राप्तच आहे. बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद दोघांनीही भूषविले. पति-पत्नी अध्यक्ष असणारे हे एकमेव दांपत्य.

आणखी एका कारणामुळे भागवतांचे बालकुमार साहित्यातील मोठेपण मान्य करावे लागते. ते कारण म्हणजे त्यांनी काढलेले 'बालमित्र' मासिक. २६ जानेवारी १९५१ रोजी 'बालमित्र'चा पहिला अंक निघाला आणि १९५६ मध्ये त्याचा

शेवटचा अंक निघाला. पण या सहा वर्षात 'बालमित्र'ने बालसाहित्यातले एक नवे चैतन्यपर्वच सुरू केले. बालसाहित्याबद्दलच्या रूढ कल्पनाच त्या मासिकामुळे बदलल्या. अगदी लहान मुलांसाठी बडबडगाणी त्यात होती. पहिल्याच काही अंकात बंबवाला, घोडा चाललाय टपटप यासारखी बालसुलभ कल्पनांनी नटलेली गाणी होती. (त्या संग्रहांना पुढे केंद्र सरकारचे बालसाहित्याचे पुरस्कार मिळाले.) आणि एका परीने ते बालमित्रच्या श्रेष्ठत्वावरचे शिक्कामोर्तब ठरले. बालकथा, रंजक चरित्र लेख, माहितीपूर्ण लेख, बाळांचे बोबडे बोल, चित्रकोडी, चुटके याच्याच जोडीने भा. रा. भागवत यांची ज्युल व्हर्नच्या 'चंद्रावर स्वारी'ची प्रकरणे क्रमश: प्रसिद्ध करायला आरंभ केला. चंद्रावर जायचे झाले तर काय काय तयारी करावी लागेल याची ही कहाणी वाचताना विज्ञानाचे एक नवेच दर्शन मराठी मुलांना घडले आणि हे सर्व वेगळेच काहीतरी आहे असा साक्षात्कार झाला. 'बालमित्र'च्या अगदी पहिल्या अंकापासून मी वाचक-वर्गणीदार होतो आणि त्यावेळी आठवीत होतो. 'बालमित्र'च्या बाललेखांकात माझे साहित्यही त्यावेळी प्रसिद्ध होत असे. झपाटलेला प्रवासी (अराउंड द वर्ल्ड इन एटी डेज्), जाईची नवल कहाणी (ॲलिस इन वंडरलँड), अदृश्य माणूस (दि इनव्हिजिबल मॅन), समुद्र सैतान, मायापूरचे रंगेल राक्षस ही इंग्रजीत गाजलेली पुस्तके मराठीत वाचायला मिळाली. त्यामुळे विश्वसाहित्याची ओळख झाली. नवनव्या कल्पनांची आणि जगांची ओळख झाली. ठाणे-मुंबई रेल्वेच्या शताब्दीनिमित्त 'बालमित्र' चा एक खास अंक काढण्यात आला होता. या पहिल्या रेल्वेचे स्वागत त्यावेळच्या लोकांनी कसे केले, इंग्रजांच्या या चमत्काराने सगळेजण कसे हतबुद्ध झाले याचे किस्से खूपच मजेदार होते. बालमित्राची सजावट आणि मांडणी कल्पकतापूर्ण असे. चित्रकार दलाल, प्रभाकर गोरे आणि द. ग. गोडसे यांच्या कुंचल्यातून उतरलेली चित्रे मूळ मजकुराची वाचनीयता वाढवणारी असत. मौज मुद्रणालयाची छपाईही देखणी असे. त्यावेळच्या इतर बालमासिकांपेक्षा 'बालमित्र'चे एकूणच व्यक्तिमत्त्व अधिक बाळसेदार आणि नीटनेटके वाटे. प्रत्येक अंक काहीतरी नावीन्यपूर्ण साहित्य घेऊन येई. अंकाची त्यामुळे चातकासारखी बालवाचक प्रतीक्षा करीत. 'बालमित्र'चे आर्थिक गणित मात्र जमले नाही. त्यामुळे भरपूर कर्जाचा बोजा घेऊन हे मासिक १९५६ साली बंद करावे लागले. तीस-चाळीस वर्षे झाली तरी फास्टर फेणे बारा-तेरा या वयोगटातच कायम राहतो आणि नाना पराक्रम करतो. कधी गावात बैलगाडीची शर्यत लावतो, कधी नेफा आघाडीवर जाऊन चिनी सैनिकांची फजिती उडवतो, कधी चक्रीवादळात घुसून लोकांना सोडवतो, कधी पानशेतच्या पुरात उडी मारून बुडवणाऱ्यांना वाचवतो, कधी गुंडांना हिकमतीने जाळ्यात अडकवतो, कधी दरोडेखोरांना पळवून लावतो. या साहसवीराला जणू प्रत्येक घटना आव्हानात्मक वाटते. तो स्वत: कुठल्याही अडीअडचणीत सापडला

तरी डगमगत नाही. आपल्या अक्कलहुशारीने बरोबर मार्ग काढतो. 'फास्टर फेणे' हा गेल्या दोन-तीन पिढ्यांचा बालनायक होता. आजच्या मोबाईल, इंटरनेट, ब्लॉग्ज, फेसबुक, ऑर्कुट, आयपॉड यांना सरावलेल्या कुमारांना फास्टर फेणेचा नवा समकालीन अवतार व्हावा असे वाटत राहील. परंतु नव्या तंत्रज्ञानाचे हे मायाजाल सोडले तरी त्याची कल्पकता, प्रसंगावधान, साहसीपणा, हुशारी ही सर्वांनाच प्रिय राहील यात शंका नाही.

फास्टर फेणे हा कुमारनायक, ज्युल व्हर्न प्रभृतीच्या कादंबऱ्यांचे अनुवाद आणि बालमित्र या वैशिष्ट्यपूर्ण बालमासिकाचे संपादन या तिन्ही कारणांनी भा. रा. भागवत यांचे स्मरण मराठी वाचकांना सतत होत राहील.

भा. रा. भागवत यांची आणि माझी ओळख झाली ती १९४८-४९ साली. खेळगडी मासिकाचे पुनरुज्जीवन करायचे म्हणून केशव भिकाजी ढवळे यांनी ते मासिक आपल्या हाती घेतले. त्याचे संपादक म्हणून भा. रा. भागवत हे काम पाहू लागले. खेळगडीच्या बाललेखांकासाठी मी एक कथा पाठवली. त्यावेळी मी महाबळेश्वरच्या मराठी शाळेत सहावीत होतो. बऱ्याच बालमासिकातून माझे साहित्य त्यावेळी छापून येत असे. 'खेळगडी'च्या बाललेखांकात माझी गोष्ट छापून आली. त्यामुळे माझा-त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. परंतु पुढे 'खेळगडी' बंद पडले. त्यामुळे वाईट वाटले. तसे मी त्यांना कळवले.

त्यानंतर त्यांचे पत्र १९५१ मध्ये आले. 'बालमित्र' या नावाने ते नवीन मासिक काढणार होते. त्याची वर्गणी भरावी असे त्यांनी लिहिले. त्याप्रमाणे मी वर्गणी पाठवली. 'बालमित्र'च्या पहिल्या अंकाने आपले वेगळेपण प्रकट केले. त्याची आकर्षक सजावट, वाचनीय मजकूर, नावीन्यपूर्ण सदरे, 'चंद्रावरील स्वारी' या कादंबरीची प्रकरणे. एका नव्याच जगात गेल्यासारखे वाटले. 'बालांचा बगीचा' या सदरात मुलांचे लेखन प्रसिद्ध होई. मी त्यासाठी मजकूर पाठवत असे. 'बालांचे बोल' या सदरात मुले कधी गंमतीदार बोलतात ते प्रसंग छापण्यात येत. त्यातही माझा मजकूर छापून आला. ऑगस्टचा अंक हा बालकुमारांच्या लेखकवितांनी भरलेला असे. त्यात माझी एक कविता प्रसिद्ध झाली. 'बालमित्र'चे आणि माझे चांगले नाते जुळले. त्याचवेळी माझी पुस्तके छापली गेली. एक बाललेखक म्हणून माझा उल्लेख होऊ लागला. पुढे बालमित्र १९५६ साली बंद पडले. भागवतांची पुस्तके मात्र निघत राहिली. वाचनात येत राहिली. साधना साप्ताहिकात मी त्यावेळी संपादनाचे धडे घेऊ लागलो. साधनेच्या कुमार अंकासाठी भारांचे साहित्य मागवू लागलो.

१९५९ मध्ये मी मुंबईला एम.ए. साठी गेलो. त्यावेळी भा. रा. भागवत यांच्या घरी जाण्याचा योग आला. केनेडी ब्रिजजवळच्या नवे सोमण सदन या बिल्डिंगमध्ये

ते राहात. भा. रा. भागवतांनी माझे कौतुक केले. मी खूष झालो. मी त्यांना दादा म्हणू लागलो.

१९६२मध्ये महाराष्ट्र टाइम्स सुरू झाला. माझ्याकडे रविवार पुरवणीच्या संपादनाचे काम होते. रविवारी बालविभाग 'नवलनगरी'या नावाने देण्यात येई. त्यात कथा, बालगीत, कोडी, हस्तकला अशी विविधता असे.

एकदा दादा आपली एक कथा घेऊन मटाच्या कार्यालयात आले. त्यांची ती कथा छापण्यात काहीच अडचण नव्हती. मी ती कथा स्वीकारल्याचे सांगितले. पण मी त्यांना म्हटले, ''माझी एक सूचना आहे. गोट्या, चिंगी, वसंत वगैरे बालनायक आता कालबाह्य वाटतात. आजच्या मुलामुलींच्या करामती यायला हव्यात. तुम्ही असा एखादा बालनायक निर्माण करून त्यावर आधारित कथा लिहाव्या अशी माझी सूचना आहे. दरमहा एकदा कथा त्या छापू शकेन.'' ही कल्पना कशी वाटली ते त्यावेळी त्यांनी सांगितले नाही. पण एकाच आठवड्याने ते मला भेटायला आले. म्हणाले, ''सारडा, तुझ्या सूचनेवर मी विचार केला. ही कथा बघ. फास्टर फेणे असे नाव मी या बालनायकाला दिले आहे. फुरसुंगी गावचा हा मुलगा फास्ट पळतो म्हणून त्याला 'फास्टर फेणे' हे नाव शोभून दिसेल. मूळ नाव बनेश असे असले तरी फास्टर फेणे हे नाव मुलांनाही आवडेल.'' ही फुरसंगी पुण्याच्या उपनगरातली आहे.

फास्टर फेणेची ती कथा पुढच्याच रविवारी मी महाराष्ट्र टाइम्स मध्ये छापली. फास्टर फेणेचे चित्र चित्रकार मुकुंद तळवलकर यांजकडून काढून घेतले. ते दादांना दाखवले. त्यांनाही ते पसंत पडले. मुलांचा प्रतिसाद चांगला मिळाला.

दर महिन्याला फास्टर फेणेचा एकेक नवा पराक्रम म.टा.मध्ये प्रसिद्ध होऊ लागला.

ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. संपूर्ण देशात हलकल्लोळ माजला.

त्याच आठवड्यात दादा फास्टर फेणेची नवी गोष्ट घेऊन आले. 'नेफा आघाडीवर फास्टर फेणे'. नेफाला जाऊन चिनी सैनिकांना फास्टर फेणे कसा आपला इंगा दाखवतो याची ती कथा बालवाचकांप्रमाणेच प्रौढ वाचकांचीही भरभरून दाद मिळवणारी ठरली.

...फास्टर फेणे हा बालनायक काही आठवड्यातच महाराष्ट्रात घरोघर परिचित झाला.

त्याच्या कथांचे पुस्तक काढावे म्हणून प्रकाशक आग्रह धरू लागले.

दादा आमच्या ऑफिसमध्ये आले, मला म्हणाले, ''फास्टर फेणेच्या कथांचे पुस्तक काढायचे ठरले आहे. ते मी तुला अर्पण करणार आहे. तूच त्याचा खरा जनक आहेस. तू सांगितले म्हणून त्याचा जन्म झाला. म.टा.सारखे माध्यम मिळाले

म्हणून तो सर्वदूर पोचला.''

मी म्हटले, ''मला तुम्ही पुस्तक अर्पण करणार - मला अवघडल्यासारखे वाटतेय. मी निमित्तमात्र असलो तरी खरे श्रेय तुमचेच आहे. तुम्ही फार चांगल्या रीतीने फास्टर फेणेच्या साहसांना समयोचित वळण दिले आहे.''

पुस्तकाच्या प्रस्तावनेत भा. रा. भागवतांनी माझ्या नावाचा उल्लेख केला आहे.

फास्टर फेणेच्या कथांची एकूण २० पुस्तके आज उपलब्ध आहेत. (उत्कर्ष प्रकाशन, पुणे)

ज्युल व्हर्नच्या २० कादंबऱ्याही चार संचात बाजारात आहेत. (राजा प्रकाशन, मुंबई).

मी १९६९ मध्ये 'महाराष्ट्र टाइम्स' सोडून सातारला स्थायिक झालो. तरीही दादांच्या गाठीभेटी चालू राहिल्या. १९७५नंतर अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. पुढेही प्रत्येक बालकुमार साहित्य संमेलनातही त्यांच्या मुलाखती होत राहिल्या.

पुढे भागवतांनी पुण्याला स्थलांतर केले. आनंदनगर येथे 'बालमित्र' बंगला बांधला. अनेक कार्यक्रमांमध्ये त्यांचे दर्शन घडे.

१९९४ मध्ये सातारला आम्ही अभिजात साहित्य संमेलन घेतले. त्यावेळी भा. रा. भागवत यांचा सत्कार केला. त्यांचे भाषण छान झाले.

सावंतवाडी येथे त्याचवर्षी होणाऱ्या बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी माझी निवड झाली. पुणे येथे प्राचार्य राम शेवाळकर यांच्या हस्ते माझा सत्कार झाला. त्यावेळी भा. रा. भागवतही उपस्थित होते. त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. फास्टर फेणेच्या निर्मितीची कहाणी सांगून त्याचे श्रेय सारडांकडे जाते असे म्हटले. सुधाकर प्रभू वगैरे त्यावेळी उपस्थित होते.

महाराष्ट्र फाउंडेशनने आपल्या पुरस्कारांना प्रारंभ केला तेव्हा पहिल्याच वर्षी भा. रा. भागवत यांना विशेष पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. (१९९६)

२७ ऑक्टोबर २००१ रोजी यांचे वयाच्या ९०व्या वर्षी निधन झाले. त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी पाखर बागेतील त्यांच्या निवासस्थानी गेलो. तेव्हाही पन्नास वर्षातला सगळा घटनापट समोर उभा राहिला.

त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन.

शंकर सारडा
ई १० पाटील रिजन्सी, हॉटेल कलिंगामागे,
१५ एरंडवणे, पुणे ४११ ००४.

राज्य पुरस्कार

ललितगद्य विभागात 'नॉट गॉन विथ द विंड' या पुस्तकासाठी
राज्य पुरस्कार स्वीकारताना श्री. विश्वास पाटील

चरित्र विभागात 'भोगले जे दुःख त्याला..' या पुस्तकासाठी
राज्य पुरस्कार स्वीकारताना आशा आपराद

राज्य पुरस्कार



ललितगद्य विभागात 'पॉपकॉर्न' या पुस्तकासाठी राज्य पुरस्कार
स्वीकारताना सुप्रिया वकील



परीकथा/लोककथा विभागात 'छत्रीची जादू आणि इतर कथा' या पुस्तकासाठी
राज्य पुरस्कार स्वीकारताना श्री. राजीव तांबे

पुस्तक परिचय

वैद्यकीय हलगर्जीपणाबद्दलचा खटला आणि मृत व्यक्तीच्या शवाच्या तपासणीची मागणी यातून बाहेर आलेले अनपेक्षित सत्य

क्रायसिस



रॉबिन कुक अनु.डॉ. प्रमोद जोगळेकर

डॉ. रॉबिन कुक यांच्या वैद्यकीय पार्श्वभूमीवर थरारकथांना जगभर लोकप्रियता लाभलेली आहे. वैद्यकीय क्षेत्रात सध्या विविध पातळ्यांवर संशोधन चाललेले आहे. अवयवारोपण, अवयवदान, स्टेम सेल्स, जैवअभियांत्रिकी जनक्षमता, औषधांचे संशोधन आणि विविध लशींचे मानवसमूहावरील परिणाम, औषध व विमा कंपन्यांचा नफेखोरपणा, मानवी अस्तित्वाला हानिकारक असणाऱ्या औषधांचे आणि रसायनांचे सार्वत्रिक वितरण, वैद्यकीय व्यवसायातील अनिष्ट पद्धती आणि गैरव्यवहार, बर्ड फ्ल्यू, स्वाइन फ्ल्यू यासारख्या रोगांचा फैलाव, संशोधन केंद्रात ठेवलेल्या प्लेगच्या जंतूंच्या नमुन्यांचे अपहरण, पेशीबदल, डीएनएमधील संशोधन, अशा बाबींतील काही समस्या केंद्रे हेरून त्यांच्यामुळे उद्‌भवणाऱ्या पेचप्रसंगांचा कथावस्तूत वापर करण्याचे कौशल्य डॉ. रॉबिन कुक यांनी गेली दोन दशके पुन:पुन्हा प्रकट केलेले आहे. कोमा, कंटेजन, टॉक्सिन, सीजर, क्रोमोसोस-६ वगैरे त्यांच्या थरारकथा मराठीत आल्या असून वाचकांचे लक्ष वेधून घेण्यात यशस्वी ठरलेल्या आहेत. या थरारकथा म्हणजे एका अर्थाने वैद्यक व्यवसायातील संशोधनाच्या व कार्यपद्धतीच्या त्रुटी किंवा धोके दाखवणाऱ्या घंटाच आहेत. संशोधन जर स्वार्थप्रेरित आणि पक्षपातीपणे होऊ लागले तर ते मानवी जीवनाला विनाशकारक ठरेल याकडे डॉ. रॉबिन कुक प्रत्येक कादंबरीद्वारे लक्ष वेधत असतात. गुंतागुंतीचे कथानक रंजक पद्धतीने मांडत आपल्या मूळ प्रतिपादनावरचे लक्ष ते जराही ढळू देत नाहीत.

'क्रायसिस' या नव्या थरारकथेत डॉ. कुक यांनी वैद्यकीय क्षेत्रात नव्याने सुरू झालेल्या कन्सियर्स मेडिसिन किंवा रिटेनर मेडिसिन या पद्धतीची उपयुक्तता आणि मर्यादा दाखवली आहे; वार्षिक फी एकदा दिली की पेशंटला सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा (तपासण्या, प्रतिबंधात्मक उपाय योजना, आहार विषयक सल्ला, पेशंटला चपखल लागू पडेल असा आरोग्य कार्यक्रम, तातडीची सेवा) बिनबोभाट सदासर्वकाळ मिळू शकतात. प्रत्येक डॉक्टर मोजक्याच पेशंटांची जबाबदारी.... पुस्तकाच्या प्रास्ताविकात या पद्धतीच्या गुणदोषांची चर्चा केलेली आहे. दहा माणसांना अपुरी सेवा देण्यापेक्षा एका माणसाला चांगली सेवा देणे श्रेयस्कर या विचाराने कन्सियर्स मेडिसिन प्रणालीला पसंती मिळते. 'क्रायसिस' या थरारकथेत डॉ. हर्मन ब्राऊन फिर्यादी पक्षाच्या बाजूने साक्ष देताना कन्सियर्स पद्धतीने सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला हरताळ फासला जातो असा मुद्दा मांडतो.

प्रास्ताविकात लेखकाने या मुद्द्यावर भर दिलेला असला तरी हा विषय कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे असे वाटत नाही.

वैद्यकीय उपचारात हलगर्जीपणा केल्याने रुग्णाच्या मृत्यूला कारणीभूत झाल्याबद्दल डॉ. क्रेग बोमन याच्यावर तिच्या भावाकडून खटला भरण्यात येतो. त्या खटल्याचे संपूर्ण कामकाज, ज्युरीची पद्धत, ज्युरीची निवड, ज्युरीपुढचा युक्तिवाद या थरारकथेमध्ये

वाचायला मिळतो.

परंतु या खटल्याबरोबर आणखी काही उपकथानके आणि गुंतागुंती याचीही जोड मिळालेली आहे.

या खटल्यात डॉ. क्रेग बोमन यांच्या मदतीसाठी वैद्यकीय तपासनीस डॉ. जॅक स्टेपलटन हा पुढे सरसावतो. क्रेगची पत्नी म्हणजे त्याची बहीण मेहुण्याला मदत करण्यामागे त्याची कर्तव्यभावना दिसते.

या कथानकात रंग भरण्यासाठी या जॅक स्टेपलटनचे लग्न चार दिवसांनी न्यूयॉर्कमध्ये व्हायचे असते, पण हा तर बॉस्टनमध्ये या खटल्यामुळे अडकून पडलेला, असे दाखवून नाट्य आणले आहे.

हे नाट्य विश्वासार्ह वाटावे म्हणून त्यात जिचा मृत्यू झाला त्या पेशन्स स्टॅनहोपचे शव शवपेटिकेतून काढून त्याची उत्तरीय तपासणी करण्याची मागणी जॅक स्टेपलटन करतो. परंतु टोनी फसानो आणि त्याचे गुंड या तपासणीला प्रचंड विरोध करतात. जॅकला मारण्याचा प्रयत्न करतात. तथापि त्यासाठी पेशन्सच्या भावाची परवानगी जॅक मिळवतो. फ्युनरल होम मधून शवपेटिका बाहेर काढणे त्याची उत्तरीय तपासणी करणे, त्या तपासणीचे निष्कर्ष बघून मृत्यूचे कारण शोधणे ह्या प्रत्येक टप्प्यावर अडथळ्यांची शर्यत पार करावी लागते.

उत्तरीय तपासणीचा निष्कर्ष धक्कादायक ठरतो कारण मृत पेशन्सचे हृदय नॉर्मल आढळते. डावीकडची तसेच उजवीकडची रक्तवाहिनी उत्तम स्थितीत आढळते.

आता पेशन्सचा मृत्यू जर हृदयविकाराच्या झटक्याने झाला होता... तर आतड्याच्या कर्करोगाशिवाय आणखी काहीतरी बिघाड दिसायला हवा. प्रिंझमटेल अंजायनामध्ये कॉरोनरी रक्तवाहिन्या एकदम वेगाने आकुंचन पावतात... पण येथे तसेही काही दिसत नाही. कोणीतरी पेशन्स स्टॅनहोपला हृदयविकाराचा झटका आणला आणि ते उघड होऊ नये म्हणून शवविच्छेदनाला विरोध केला असा याचा अर्थ होतो असे जॅकला वाटते.

तेव्हा लताशा ही तज्ज्ञ संशोधक म्हणते, ''हे नमुने आमच्या प्रयोगशाळेत नेऊ व सूक्ष्मदर्शकाखाली तपासून बघू.''

पेशन्स स्टॅनहोपला हृदयविकाराचा झटका आल्यावर ज्या हॉस्पिटलमध्ये आणले, त्या हॉस्पिटलमध्ये त्यावेळी उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी जॅक पुन्हा बोलतो. तेव्हा ते डॉक्टर्स सांगतात, ''पेशंटला इथं आणलं तेव्हा परिस्थिती अगदी हाताबाहेर गेलेली होती. आम्ही तिचं हृदय पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला. तिच्या हृदयाचा एकही ठोका पडत नव्हता. तिचं हृदय कशालाच प्रतिसाद देत नव्हतं. पेशंटच्या घरी बायोमार्करची चाचणी केली होती. तिचे निष्कर्ष होकारार्थी होते.'' तेव्हा टॉक्सिकॉलॉजीत काय आढळते याबद्दल सर्वांनाच उत्सुकता वाटते.

पेशन्सला हवेत तरंगण्याचा भास होत होता हे तिच्या केसपेपरवरून जॅकच्या लक्षात येते.

पेशन्सच्या मृत्यूला टेट्रोडोटॉक्सिन हे विष कारणीभूत झाले असे डॉ. अलन स्मिथ यांना आढळते.

या विषाचा उपयोग चेतापेशी आणि स्नायू यांच्यातील सोडियम चॅनेलच्या अभ्यासासाठी होतो. डॉ. क्रेन बोमन यांचे त्यावर संशोधन चालू होते. हे विष काही काळानंतर शरीरातून नष्ट होते. त्यामुळे पेशन्सच्या शव तपासणीत ते विष सापडले नव्हते.

न्यायमूर्ती जॅकचे म्हणणे ऐकल्यावर हा खटलाच रद्द करतात. ''हा खटला हलगर्जीपणाचा दिवाणी खटला राहिलेला नाही. तो फौजदारी गुन्हा असणारा प्रकार आहे. तो मी रद्दबातल करतो. डॉ. बोमन यांच्यावर हवे तर नव्याने खटला भरू शकता. डॉ. स्टेपलटन, तुमची ही कामगिरी प्रशंसनीय आहे.''

त्यानंतर जॅक विमानाने न्यूयॉर्कला जातो. थेट चर्चमध्ये टॅक्सी नेतो. लॉरीशी त्याचे लग्न होते. तेथून हनीमूनसाठी नवदांपत्य क्युबाला प्रयाण करते.

८ सप्टेंबर २००५ ते १२ जून २००६ पर्यंत घडलेला हा घटनापट. खरे म्हणजे ५ जून ते १२ जून या आठवड्यात घटनांना खरा वेग येतो.

हॉस्पिटलमधील तसेच प्रयोगशाळेतील वातावरण डॉ. रॉबिन कुक उत्तम रंगवतात. गुंड टोनी फसानोची इरसाल गुंडगिरी पेश करतात. ज्युरींचे नखरे व अडवणुकीचे धोरण स्पष्ट करतात. विषाच्या वेगवेगळ्या प्रकारांची माहिती देतात. एकाच कथानकात वेगवेगळ्या उपकथानकांची योजना चपखलपणे करतात. त्यामुळे एकदा हाती घेतल्यावर 'क्रायसिस'मध्ये पुढे काय याचे औत्सुक्य अखेरपर्यंत कायम राहते.

किंमत : ३५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.

नवीन पुस्तकांची माहिती, नवीन योजना कळविण्यासाठी आपला **Email ID** आमच्याकडे हवाच!

info@mehtapublishinghouse.com

पुस्तक परिचय

आपल्याला वाट दिसते; पण ती कुठे पोचवणार हे कळत नाही. वाट दिसत नसतानाही आपण चालू लागतो - हा क्षण म्हणजे नव्या दिशेनं प्रस्थान

प्रस्थान

रेखा बैजल

'प्रस्थान' ही रेखा बैजल यांची नवी कादंबरी.

या कादंबरीचा नायक प्रणव उपाध्ये. एम.बी.ए. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एका कंपनीतील वरिष्ठ अधिकारी. त्याच्या जीवनातील काही घटना. अमेरिकेत त्याच्या मुख्य कार्यालयात काम करण्यासाठी त्याची झालेली निवड. तेथे त्याला दिसलेली अमेरिकन जीवनाची झलक. तेथून पुन्हा भारतात परतल्यावर त्याला करावी लागणारी आपल्या आयुष्याची पुनर्मांडणी. त्यामुळे त्याच्या मूळच्याच आध्यात्मिक मनोधारणेला मिळालेली नवी चेतना. नजरेच्या टप्प्यात येऊ घातलेली.

आपलं शरीर, आपल्या भावना यांच्यापलीकडे जाणाऱ्या अध्यात्माची दिशा. या नव्या दिशेला प्रणवनं प्रस्थान ठेवावं असा अंत:प्रेरणेचा आवाज त्याला ऐकू येतो.

त्याच्या आयुष्याचा आजवरचा घटनाक्रमही त्याला या अटळ परिणतीकडे रेटत असतो. ही वाट त्याला दिसते, पण ती नेमकी कुठे पोचवणार हे त्याला स्पष्ट उमगत नाही. पण वाट नसतानाही आपण कुठेतरी जातच असतो. हा क्षण म्हणजे एका नव्या दिशेनं प्रस्थान असे लेखिका मानते. हा 'प्रस्थान'चा विचार प्रणवच्या आयुष्याच्या दृष्टीने अपरिहार्य आहे. पण हे प्रस्थान आहे का याबद्दल आपली खात्री पटेलच असे नाही. या कथावस्तूचा शेवट करण्यासाठी हा शॉर्ट कट सोयीस्कर वाटला असावा.

मार्थामध्ये गुंतलेल्या प्रणवला आधी स्मिताबद्दल आणि नंतर अनूबद्दल ओढ वाटते. त्याचे गुरू त्याला सुचवतात, ''आत्मभान असणाऱ्या व्यक्तीने सर्वसामान्य जीवन जगणे, त्यासाठी जगाचे नियम स्वत:वर, मनावर, वर्तनावर लादून घेणे म्हणजे जीवन अवघड करणे. त्यातली सहजता गमावणे; पण हे आवश्यक आहे.'' असा सल्ला प्रणवला मिळतो. गुरूकडून आणि आपल्या स्वत:च्या अंतर्मनातून.

गुरू म्हणजे एका अर्थाने आपली विवेकप्रणालीच!

प्रणवच्या आयुष्यातील घटनाक्रम हा त्याच्या अस्तित्वविषयक आकलनाला वेगवेगळी परिमाणे देतो.

प्रणव हा एका मध्यमवर्गीय सच्छील सत्त्वशील कुटुंबातील मुलगा. बुद्धिमान. इंजिनियरच्या, एम.बीए.च्या पदवीबरोबर अमेरिकन आयटी कंपनीच्या भारतीय शाखेत त्याला अधिकारपद मिळते. अनेक व्यावसायिकांशी त्याचा संबंध येतो. अनेकांचे प्रोजेक्ट तो तयार करून देतो. अनेक उद्योजकांना तो आपला खरा मार्गदर्शक वाटतो.

प्रणव-मेघना यांच्या लग्नाला चार वर्षे होऊनही मूलबाळ नसते. एकूण दोघांचे नीट जमत नाही. संबंध तणावाचे असतात. पत्नी मेघना सुंदर, फॅशनेबल, लाइफ एन्जॉय करण्यासाठी पार्ट्यांमध्ये रंगणारी. मित्रमैत्रिणींच्या घोळक्यात रमणारी, मिडल क्लास मेंटॅलिटीचा तिरस्कार करणारी. स्वत:वर, स्वत:च्या सौंदर्यावर खूष असणारी. आपल्या कटाक्षांनी आणि विभ्रमांनी पुरुषांना घायाळ करण्यात तरबेज आणि तसे

करण्यात शिकारीचा आनंद घेणारी. प्रणववर ती नाराज आहे.

''मी लाइफ एन्जॉय करते. तुला ते जमत नाही. तुझे माझे छत्तीस गुण जमले असावेत. पत्रिकेत एकमेकांकडे पाठ फिरवलेले.'' असा प्रणवचा पदोपदी पाणउतारा करणारी. ''ब्राह्मणासारखा आशीर्वाद देऊन मुलं होत नसतात. त्यासाठी अंगात पुरुषार्थ लागतो'' म्हणून त्याला हिणवणारी. खरंतर दोष तिच्यात, पण तिला वाईट वाटू नये म्हणून प्रणव स्वत:कडे दोष घेऊन तिची स्वप्रतिमा जपू पाहणारा. तिच्या वर्तनाकडे कानाडोळा करणारा. पण असा एकतर्फी चांगुलपणा कधी ना कधी टाकावा लागतोच. मेघना भार्गवशी संबंध ठेवू पाहते तेव्हा स्फोट होतोच.

स्मिता-भार्गव, शाह-पुष्पा वगैरे दांपत्यांशी त्यांची मैत्री. पार्ट्यांमध्ये नेहमी होणाऱ्या भेटी... गप्पाटप्पा.

...दुसऱ्या एका पार्टीत मेघना आणि भार्गव यांना प्रणव रेडहँडेड पकडतो. भार्गव हा प्रणवचा खरे तर मित्र. त्याची पत्नी स्मिता. स्मितालाही आपल्या नवऱ्याचा हा लंपटपणा, बाहेरख्यालीपणा धक्कादायक वाटतो.

-आणि मेघनाच्या प्रतारणेचा प्रणवला भयंकर संताप येतो.

तो अमेरिकेला एकटाच तडकाफडकी निघून जाण्याचा निर्णय घेतो. देवगडला जाऊन आपल्या आईवडिलांना भेटून येतो. वडिलांना दहा लाख रुपये देतो. आपला मित्र शाह याला त्याच्या व्यवसायाच्या स्थैर्यासाठी पाच लाख रुपये देतो. मेघनाला सांगतो, ''व्यभिचार हा व्यभिचार असतो. एकदा असेल किंवा अनेकदा... म्हणून मी तुझ्यापासून दूर जातोय. तुझ्या प्राथमिक निकडीपुरते पैसे ठेवून मी माझा बँक अकाऊंट ट्रान्सफर केलाय. हे घर माझं आहे. तुझ्या मनाला, तुझ्या सदसद्विवेकबुद्धीला जोपर्यंत टोचणी लागत नाही, शरम वाटत नाही तोवर तू ह्या घरात राहू शकतेस... तू मला नेहमी सर्वांमध्ये हिणवून बोलायचीस. मी ऐकायचो, कारण तू माझी आहेस असा माझा समज होता. आता तो दूर झालाय. तू माझी पत्नी होतीस म्हणून मी बरंच काही सहन केलं. आपल्या साथीदाराच्या सुखदु:खाची जबाबदारी आपल्यावर असते असे समजून... पण तू ते समजू शकली नाहीस. तुझ्यात अपत्यनिर्मितीची क्षमता नाही हे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले असूनही तुला मानसिक धक्का बसू नये म्हणून तसे तुला न सांगण्याची विनंती मी डॉक्टरांना केली. तुला आता डायव्होर्स घेऊन दुसरं लग्न करायचं असेल तर सत्य तुला ठाऊक असावं म्हणून मी सांगतोय... आता माफी वगैरे मागून काही उपयोग नाही. मी आता अमेरिकेला निघतो आहे. गुड बाय.''

प्रणव उपाध्ये याच्या स्वागतासाठी अमेरिकेतील त्याचा कनिष्ठ सहकारी श्रीकांत विमानतळावर उपस्थित असतो. त्याच्याकडेच प्रणव पेइंग गेस्ट म्हणून राहतो. पूर्वी शिक्षणासाठी प्रणवचे अमेरिकेत वास्तव्य झालेले असते त्यामुळे त्याला अमेरिकन

जीवनाची कल्पना असते. त्याला तेथे जमवून घेणे अवघड जात नाही. श्रीकांत व त्याची पत्नी अनू दोघेही सॉफ्टवेअर इंजिनियर. त्यांच्यात सतत वादावादी, भांडणे चालू असतात. अनूला मूल हवे पण श्रीकांतला ते नको असते. तिने फक्त नोकरी चालू ठेवावी असे त्याचे मत असते. प्रणव अनूला घरकामातही मदत करतो. तिचे दु:ख जाणून घेतो. ती शेवटी भारतात जॉब मागून घेते ''मी हा अन्याय सहन करणार नाही. मी श्रीबरोबर राहू शकत नाही. स्त्री म्हणून माझ्या असलेल्या गरजा तो समजू शकत नाही. असं धुमसत भांडत राहण्यापेक्षा दूर गेलेलं बरं. त्याच्या जगण्याचा उद्देश केवळ पैशाशी निगडित आहे. मला त्या पलीकडे जायचं आहे. माझं मातृत्व, माझं प्रेम, माझं वात्सल्य हे सगळं जाणून घ्यायचंय, मला आयुष्य जगायचंय. पैसे मिळवणारं यंत्र होऊन रहायचं नाही.''

प्रणव श्रीजवळ हा विषय काढतो. पण श्री त्याला प्रतिसाद देत नाही.

अनू भारतात गेल्यावर दोन-तीन महिन्यातच श्री जेनीबरोबर लग्न करून तिला घरी आणतो.

जेनीच्या अमेरिकन जीवनशैलीत प्रणवचे इंडियनपण खपणे अवघडच.

तो त्या घरातून निघतो.

एका ब्लॅक-कृष्णवर्णीय कुटुंबात पेइंग गेस्ट म्हणून जागा घेतो. रॉबर्ट हा कुटुंबप्रमुख. त्याच्या दोन मुली. मोठी मार्था, धाकटी केली. मुलगा परगावी, नोकरदार. मार्था कृष्णवर्णीयांचं प्रबोधन करणाऱ्या संघटनेमध्ये काम करते. वृत्तपत्रात लेख लिहिते, भाषणे देते, कायद्याने समान हक्क असले तरी मानसिक पातळीवर सूक्ष्म दरी उरतेच. काळ्यांच्या मनातही न्यूनगंड लपलेला असतो. वर्ण लपू शकत नाही. मार्था प्रणवशी याविषयी मोकळेपणाने चर्चा करते.

प्रणव तिला आपल्याकडील दलित चळवळीची माहिती देतो.

''पहिला लढा अस्तित्वाचा, दुसरा विकासाचा आणि मग स्वत:साठीचा विचार... जिंकल्या गेलेल्यांना ह्याच क्रमानं आयुष्याचा विचार करावा लागतो.'' असे मार्था म्हणते. कृष्णवर्णीयांचा नेता मार्टिन ल्युथर किंग याला ब्लॅक पॉवर किंवा व्हाइटपॉवर ही कल्पनाच मान्य नव्हती. त्याला हवी होती ह्युमन पॉवर. 'त्वचेचा वर्ण कुठला यावरून माणसाची पारख करू नका. त्याच्या चारित्र्याच्या गुणवत्तेवर पारख करा.' हा त्याचा आग्रह होता. तेव्हा महात्मा गांधींचा संदर्भ येणेही क्रमप्राप्तच!

मार्था आणि प्रणव यांच्यातील वैचारिक सुसंवाद, त्यांच्यातील भावनिक जवळीक दृढ करतो.

मार्था प्रणवकडे आकृष्ट होत आहे हे तिच्या वडिलांच्या ध्यानात येते. त्याच सुमारास एका भाषणाच्या वेळी मार्थावर गोळी झाडली जाते. तिला रुग्णालयात दाखल केले जाते. प्रणवचा रक्तगट तिच्या रक्तगुणाशी मिळणारा असतो. त्याचे रक्त

मार्थाला दिले जाते. मार्थावर एक अमेरिकन गोरा तरुण जेम्स याचा जीव जडतो. कृष्णवर्णीय आणि गौरवर्णीय यांच्यातील हा संबंध चळवळीला पोषक ठरेल असे मार्थाच्या वडिलांना वाटते... मार्थालाही एक कार्यकर्ती म्हणून या विचारात तथ्य वाटते. मात्र तिला मूल हवे असते, तेही प्रणवकडून... ती तसा बनाव जुळवून आणते. प्रणव भारतात परतण्यास सिद्ध होतो. तो कंपनीकडे तसे सांगून बदली करून घेतो.

भारतात परतल्यावर काय होते?

पत्नी मेघना त्याचे घर सोडून अन्यत्र स्वतंत्रपणे राहत असते.

भार्गवची पत्नी स्मिता ही आपल्या नवऱ्याचे घर सोडून समाजकार्यात पडते. कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी त्यांना वेळीच मदत देण्याची गरज ओळखून त्यासाठी संघटनेच्या मार्फत काम करू लागते. त्या कामात गुंतत जाते. जगण्याचा एक मोठा परीघ तिला सापडतो. प्रणवला घ्यायला ती विमानतळावर येते. ती त्याला आपल्या खोलीवजा घरी घेऊन जाते. ती म्हणते, ''प्रतारणा सहन करीत, मन मारत जगणं किती अवघड असतं हे आपण दोघांनीही अनुभवलं आहे... मग मी जगायला सुरुवात केली. मी अनेक आयुष्यांमध्ये जगू लागले. २८ वर्षे जगणं विसरले होते ते भरभरून मिळायला लागले... आता लोकांच्या आनंदानं आनंदी होते. दु:खानं भिजून जाते... आता द्यावं वाटतं.. जे माझंसं असेल ते... एक थेंबभर सूर्य... एक ओंजळभर नदी... माझ्या मनात सहानुभूतीच्या किनाऱ्यावर झुळझुळणारी आणि एक मूठभर आकाश... प्रेमाचं आकाश. याहून अधिक माझ्याजवळ आहेच काय?'' (१३५)

प्रणव त्यावर म्हणतो, ''मी स्वत:ला शोधायचा प्रयत्न करतोय... इतरांमध्ये हरवत गेलो. आता ना इतर... ना आपण... अशी अधांतर अवस्था.''

प्रणव आपल्या घरी जातो तेव्हा शाह दांपत्य भेटायला येते. वर्षा त्याच्यासाठी रोज रात्री डबा पाठवण्याची जबाबदारी आपल्यावर घेते. शाह प्रणवने दिलेले पाच लाख रुपये त्याला परत करतो. शाहचा फर्निचरचा व्यवसाय आता जोरात चाललेला असतो. तो आभार मानू लागतो तेव्हा प्रणव त्याला थांबवतो, ''अरे, आपलं नातं शब्दांपलिकडंच आहे. ते तसंच राहू दे... मला माणूस हवंय... नातं हवंय.'' (१३७)

अनू आणि प्रणव यांचीही गाठ पडते. श्रीकांतच्या आडमुठेपणामुळे अमेरिका सोडून ती भारतात परतलेली असते. श्रीकांतने जेनीशी केलेल लग्न, मार्था आणि प्रणव यांचे प्रेमप्रकरण यांचीही अनूला कल्पना असते. अनू प्रणवला आपल्या घरी नेते. मातृत्वाची हौस भागवण्यासाठी तिने कृत्रिम गर्भधारणेच्या मार्गाने एका मुलीला जन्म दिलेला असतो. एक वर्ष वयाची रांगत रांगत घरभर फिरणारी तिची 'खुशी' ही चिमुरडी मुलगी पाहून प्रणव तिला विचारतो, ''तुला लग्न करावं असं नाही

वाटलं?'' ती नकारार्थी उत्तर देऊन म्हणते, ''मी ज्या अनुभवातून गेले होते त्या अनुभवामुळे माझा विश्वास उडून गेला होता... मी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहे. मग मी पुन्हा एका दुष्टचक्रातून का जावं? समाजाचे नियम सांभाळता सांभाळता आपण आपलं आयुष्य अधिक अवघड करून घेत असतो. सध्या मी, खुशी आणि माझा जॉब एवढी कारणं जगण्यासाठी पुरेशी आहेत.''

अनू बोलता बोलता लाइफ पार्टनरची कल्पनाही विशद करते.

''आपण लहान व्हावंसं प्रत्येकाला वाटतं. पण त्यासाठी आपली काळजी करणारं कुणीतरी माणूस हवं असतं. अमेरिकेत माझी काळजी घेणारा, तुझ्यासारखा लाइफ पार्टनर... पण असं माणूस भेटलं नाही तर एक पर्याय उरतो. आपण मोठं व्हायचं. खुशीमुळं ते जमलं... सध्या गाडं बरं चाललंय. मोठी मोठी स्वप्नं शेवटी इथवर येऊन पोचतात... कधी कधी कंटाळा येतो एकटेपणाचा... मी तशी सेंटिमेंटल आहे.''

प्रणवकडे आईवडील मुक्कामाला येतात. आई त्याचे उदासपण बघते.

आई त्याला विचारते, ''स्मिता नेहमी येते जाते. चांगली मुलगी आहे. समंजस आहे...''

प्रणव तिला सांगतो, ''आई... स्मिता आणि मी फक्त मित्र आहोत. आमच्यात तशी भावना नाही.''

''मैत्री प्रेमात बदलू शकते... आमच्या पिढीत तर न पाहताच लग्न व्हायची. प्रेम हळूहळू निर्माण व्हायचं. मैत्री तर दूरची गोष्ट. नवरा मित्र होऊ शकतो हे आमच्या पिढीला माहीत नव्हतं... आधी मैत्री, नंतर प्रेम... हे नातं जास्त पक्कं असेल असं मला वाटतं.'' आई सल्ला देते.

''आयुष्यात कधी कधी पोकळी निर्माण होते. ती भरून काढण्यासाठी कुठलं नातं असण्याची गरज नाही. स्मितासारखी मैत्रीण अशी पोकळी भरून काढू शकते.'' प्रणव आपली भूमिका स्पष्ट करतो.

स्मिताला तो 'ए पार्ट ऑफ लाइफ' मानतो. तिच्याबरोबर शेतकऱ्याच्या एका कर्ज प्रकरणाच्या केसची सेटलमेंट करण्यासाठी तो मराठवाड्यातील एका खेड्यात जातो. गेल्यावर कळते की त्या शेतकऱ्याने दोन दिवसांपूर्वीच आत्महत्या केलेली असते. आणखीही काही समाजवास्तव कळते. मुलीला १२ हजार हुंडा देऊन लग्न केलेले असते. हा हुंडा कमी म्हणून सासरच्या लोकांनी तिला परत पाठवून त्या मुलाचं दुसरं लग्न लावून दिलेलं असतं.

इकडे मार्थाचे पत्र येते. ''मी आज आई झाले आहे. तू बाप झाला आहेस.''

त्याचे गुरू त्याला सांगतात, ''तुमचं प्रेम भावना आणि शरीर यांच्या पलीकडे जाऊन अध्यात्मापर्यंत गेलं आहे... हेच जीवन आहे. हेच आयुष्याचं फलित. हा क्षण

पुन्हा एका नव्या दिशेचं प्रस्थान तुला ठेवायला सांगतोय.''

पत्नीच्या प्रतारणेमुळे व्यथितचित्त प्रणव, त्याच्या जीवनात आलेल्या स्मिता, पुष्पा शाह, श्रीकांतची पत्नी अनू, अमेरिकेतील गौरवर्णीय जेनी आणि कृष्णवर्णीय मार्था यांनी आपापल्या जीवनाची केलेली व्यवस्था आणि शोधलेली साफल्य क्षेत्रे - यातून प्रणवला जाणवलेले जीवनाचे श्रेय - असा एक आंतरराष्ट्रीय पट या कादंबरीत मांडला गेला आहे.

प्रणवसारखीच अवस्था अनेकांची होत असते. तसेच प्रश्न प्रत्येकाला पडत असतात. त्यांची उत्तरे प्रत्येकाला स्वयंप्रयासाने मिळवावी लागतात. पर्याय अनेक असतात. निवड स्वत:ला करावी लागते.

रेखा बैजल या आपल्या कादंबरीत खांडेकरांच्या पद्धतीने अनेक विचार, निरीक्षणे, सूत्रे पेरत जातात. त्यांची व्यापक जीवनदृष्टी त्यामुळे लक्षात येते.

* माणूस अंतापर्यंत स्वत:लाच शोधत असतो. आपल्या ओळखीशिवाय माणूस जगू शकत नाही. (२५)
* गुरू एक अस्पष्ट मार्ग दाखवत असतो. त्या मार्गावरून जात हळूहळू स्वत:च स्वत:चा गुरू व्हायचं. त्यासाठी फक्त सुखदु:ख, संकटसमयी स्वत:पासून दूर व्हायचं. दुरून आयुष्याकडं बघायचं (२६)
* गरीब माणसाचं मूल्यमापन पैसा आणि पैसेवाल्याचं मूल्यमापन त्याचं साधेपण... (२७)
* पैशाखेरीज इतर मूल्यांचं मोजमाप करता येत नाही. असणं किंवा नसणं अशा दोनच अवस्था त्याबाबत असतात. प्रामाणिक आहे किंवा नाही. १० टक्के प्रामाणिक अशी गणितं तिथे नसतात. एखादी स्त्री ९५ टक्के पतिव्रता आहे असे म्हणता येत नाही. (२७)
* माणसाची सगळी धडपड भूक आणि विषयसुख यासाठी असते. एकदा गरजा भागल्या की स्युडोपीडिया असलेल्या गरजा पुढे येऊ लागतात. हे हवं, ते हवं... घराचं म्युझियम होतं. माणूस हरवतो. मूळ गरजा लक्षात ठेवायच्या. पोटाची भूक आणि विषयसुख पण ते नीतीच्या चौकटीत बसवलेलं. अगदीच वेगळेपणाची चटक अनावर झाली तर बायकांचेही बाजार आहेत... पण मित्राची बायको टाळावी. (२०)
* आयुष्यात अनेक माणसं येतात. काही काळ सोबत चालतात. हळूहळू दूर जातात. रक्ताच्या संबंधातले नातलगही तसेच. एक आईवडील सोडले तर सर्व रक्त पाणी मिसळलेलं. (२९)
* प्रत्येक माणसाच्या भोवती त्याच्याच आयुष्याच्या भिंतीच्या तुरुंग असतो. 'त्याच्या' आयुष्यात त्याच्या जोडीदाराचाही समावेश होतो. (३१)

* करुणा हे मूल्य माणसाला वेळ आली तर फार मोठी उंची देतं. (३२)
* आपल्याला गतिमान करते ती आपल्या मनातली ऊर्जा. (३२)
* काही वादळं माणसाला घडवतात. त्याच्या क्षमतांना जोखतात. काही वादळं माणसाला तोडू पाहतात. कणाहीन करू पाहतात. असली वादळं स्वीकारायची नसतात. (३३)
* लोकांच्या डोळ्यात आपली ओळख असते. त्या ओळखीपासून दूर जायचं. कोरी पाटी समोर ठेवायची आणि अक्षरं लिहायची. सोबतीला फक्त आजवर मिळवलेलं ज्ञान. (३३)
* ज्ञान तरी कशाला म्हणायचं? नवीन शोध, नवीन उपकरणं. ती उपकरणं कशी चालवायची याची माहिती म्हणजे ज्ञान. तांत्रिक ज्ञान. उद्या ते उपकरण कालबाह्य होईल. त्याचा वापर संपेल म्हणजे आपण झालो ज्ञानहीन. मग पुन्हा नव्यानं खेळ सुरू? (३३)
* ''सगळ्यात महत्त्वाचं असतं आपलं आयुष्य. सर्व विचारांपेक्षा, कृतीपेक्षा मोठं. कोणताही विचार आयुष्यापेक्षा मोठा असत नाही, कुठलीही कृती आयुष्या-बाहेरची असत नाही. खूप प्रयत्न केले गेले आयुष्याचे अर्थ शोधायचे. कितीतरी विचारवंत ज्ञानी, प्रेषित त्यांनी काही विचार आपल्याला दिले; पण मी सांगतो... अनुभवावरून सांगतो, कोणताही विचार आपण आयुष्यावर पांघरावा... आणि नंतर पाहावं तर त्या विचाराच्या बाहेर आयुष्य गवतासारखं वाढून आलेलं असतं. विचार तोकडा ठरतो. खूपदा विचारांना विशिष्ट काळाची मर्यादा असते... तत्त्वज्ञान कधी गरजेतून निर्माण होतं... समस्येतून निर्माण होतं... समाजाच्या एखाद्या वर्गापुरतं निर्माण होतं; पण प्रत्येक वेळी आपल्या आयुष्यानं तत्त्वज्ञानाला हरवलंय, म्हणून कोणत्याही प्रणालीचं, शैलीचं सांगणं न मानता आयुष्याला आयुष्य म्हणून स्वीकार. मुक्त मनानं त्याला कवेत घे. ते दु:ख देईल तेव्हा अश्रू ढाळ, आनंद देईल तेव्हा हसून घे, गाऊन घे. आपली अनेक रूपं ते तुला दाखवील. ती जगून घे. पाऊस लागू नाही म्हणून छत्री वापरायची, रेनकोट वापरायचा आणि पावसात भिजण्याच्या आनंदाला मुकायचं, तसं जगताना सारखा कोणत्यातरी विचारांचा अडसर घ्यायचा आणि जगण्याचे शिंतोडे अंगावर येऊ नयेत म्हणून जपायचं, असा करंटेपणा करू नकोस.'' (६)
* माणसं दूर असूनही जवळ असतात आणि खूपदा जवळ असून दूर. आपण किती जवळ जात राहायचं हे तू ठरव... आणि आपण किती दूर जायचं हे ती ठरवेल. कुठेतरी एक बिंदू असा येईल की जिथे दोघांच्या रेषा छेदतील. तो निर्णय घेण्याचा क्षण असेल. (६)

* आजची तरुण पिढी एका स्थित्यंतराच्या, संक्रमणाच्या काळात आहे. विश्व की देश? समाज की व्यक्ती? मन की बुद्धी? पैसा की समाधान? नात्यांचं बंधन की स्वातंत्र्य? ह्या सगळ्यांची उत्तरं आधीच्या पिढीकडे थोडीफार होती, पण तुम्ही ती हरवलीत. ती उत्तरं तुम्हाला शोधायची आहेत. (७)
* फिलॉसॉफी करायला एम.ए. करावं लागत नाही, फक्त जाणीवपूर्वक जगावं लागतं. फिलॉसॉफी ही जीवनाकडे पाहायची आणि जीवन समजून घ्यायची एक वृत्ती असते. (१५)
* माणूस इतरांना फसवतो, पण स्वत:ला फसवू शकत नाही आणि काही मूल्य जपणारा माणूस आपण 'स्वत:' आणि 'इतर' हे भेद पाळू शकत नाही. त्याचा स्वत्वाचा परीघ लोकांनाही सामावून घेणारा असू शकतो. (१६)
* प्रसन्नता ही एक वृत्ती असते. वृत्तीला वय नसतं. ती डोळ्यांत उभी राहिली की तुमच्या वयाला बाजूला सारते. (१८)
* दु:खालाही जातकुळी असते. काही दु:खं अत्यंत अटळ, असीम असतात. त्यांच्यावर उपाय नसतो, पण काही दु:खं मानसिक दृष्ट्या स्वीकारता किंवा दूर टाकता येतात. काही दु:खांशी दोन हात करावे लागतात. (२३)
* आपलं दु:ख कुठल्या जातकुळीतलं आहे हे लक्षात आलं तर त्यातून बाहेर पडायचा मार्ग मिळू शकतो (२३)
* फसवणूक कोण करतं ह्यावर त्या फसवणुकीच्या दु:खाची तीव्रता ठरत असते. पण ह्यात आपण त्या माणसाला काही ना काही शिक्षा देऊ शकतो. कठोर होऊन किंवा अत्यंत मृदू होत त्या फसवणुकीला शासन करणं किंवा माफ करणं हे आपल्या हाती असतं. (२३)
* काही दु:खं अन्यायातून निर्माण होतात. काही दु:खं परिस्थितीतून निर्माण होतात. विशिष्ट जातीत जन्मल्यानं किंवा विशिष्ट परिस्थितीत जन्मल्यानं काही दु:खं निर्माण होतात. त्या दु:खाशी झगडून ती कमी होऊ शकतात.
* निसर्गाचे नीतिनियम प्रजननापुरते आहेत म्हणून शारीरिक आहेत, पण माणसाजवळ मन आहे म्हणून माणसाचे नीतिनियम मनाशी निगडित आहेत. पण हे नीतिनियमही प्रत्येक काळात वेगळे होते; माणसाचं मन तेच असूनही. बहुपतीत्व, बहुपत्नीत्व, द्विभार्या, नियोगाला मान्यता, नंतरची अमान्यता... आताचं एकपत्नीत्व, एकपतीत्व... घटस्फोटाची सोय... प्रत्येक वेळी माणूस नकळत आपल्या नैसर्गिकतेकडे वळतो. काही माणसं मनाला आवर घालतात, काही घालू शकत नाहीत, मग प्रतारणा घडते.
* एकमेकांना वचनं देत, शपथा घेत, दहाजणांसमोर 'नातिचरामि' म्हणत आपण सहजीवन सुरू करतो. प्रत्येक माणूस अखेर अख्खाच्या अख्खा एक

निसर्ग असतो. एकमेकाहून फार वेगळा. आपण नीती, नियम बनवून ह्या वेगवेगळ्या माणसांना एकसारखं घडवण्याचा निष्फळ प्रयत्न करत असतो. केवळ बाह्य वर्तन एकमेकांसारखं होऊ शकतं, अंतरंग नाही. (२४)

* माणूस समाजप्रिय प्राणी आहे. तो समाजाला सोडून राहू शकत नाही. कितीही त्रास झाला तरी तो समाजात राहाणं पसंत करतो. (४४)
* नक्की काय हवंय माणसाला? सुख, सोयी, जिभेची चटक, भडक कामजीवन? आणि जे जीवनातलं शाश्वत आहे तेच नको? प्रेम, वात्सल्य, मूल, त्या पाठचं समाधान, हे सगळं नको आहे? जे प्राण्याला कळतं ते माणसाला कळू नये? जी होतेय ती प्रगती आहे की अधोगती? निसर्गापासून दूर जाण्याला प्रगती म्हणायचं? चालणं, धावणं विसरून चार चाकांवर जाणं ही प्रगती की क्षमतांना मारणं? (४९)
* आयुष्याच्या प्रश्नाचं उत्तर आयुष्यच देतं. आपण स्वत:, दैव, प्रयत्न, नियती, आपल्या सोबतची माणसं, त्यांची स्वप्नं, आपली स्वप्नं, इच्छा ह्या सर्वांसकट आयुष्य घडतं. ते आयुष्य घट्ट रुजलेलं असतं एका समाजव्यवस्थेत. आपल्याच आयुष्यात आपण असतो एक घटक. माणूस फार तोकडा असतो ते उत्तर द्यायला. (५२)
* माणूस आयुष्यात खोलवर रुजू का शकत नाही? भावना, विचार, प्रेम, आकर्षण हे सर्व माणसाला आयुष्याच्या खोल गाभ्यात पोहोचवतं, पण आता माणसानं ह्या सर्वच गोष्टी झुगारून दिल्या आहेत. त्याच्या लेखी आहे केवळ त्याचं स्वत:चं विश्व. त्याची मौजमजा. दिनचर्या. या पलीकडे काही नाही. त्याची गुंतवणूक ना व्यक्तीशी आहे, ना देशाशी, ना नात्यांशी, ना भूत-भविष्याशी. आपण... आपल्या नंतरची पिढी... हा विचार त्याच्या मनाला शिवतही नाहीये. (५७)
* दु:खातले अश्रू माणसाला अधिक प्रगल्भ करतात, नात्यासोबत येणारी बंधनं, जबाबदाऱ्या त्याचं मनोविश्व संपन्न करतात (५८)
* माणूस माणसासाठी जगतो. केवळ भौतिक सुखासाठी नाही. (५८)
* प्रत्येक माणूस केवढा एकटा आहे! कुणीही कुणाचं दु:ख वाटून घेऊ शकत नाही. इतकंच काय, विजयी झाल्यावर सुख वाटायलाही पांडवांजवळ कुणी उरलं नाही. (५८)
* मनाचा आधार नेहमी 'विश्वास' असतो. अविश्वास नाही. (५९)
* नीतिकल्पना काळानुरूप बदलते. स्थलाप्रमाणेही बदलते. अत्यंत उदार नीती शेवटी आपलीशी करावी लागते. जी स्वत:ला सुख देईल आणि दुसऱ्याला दु:ख होणार नाही तीच योग्य नीती. (५९)

* देश ही संकल्पना संकुचित वाटायला लावणारं हे वैश्विकीकरण. ही गती एवढी जबरदस्त आहे की माणसं गतीत फेकल्यासारखी एकमेकांजवळ येतात, पुन्हा दूर होतात. गती हीच नवी नीती आहे का? ही गतीही कितपत खरी आहे? ज्या गतीत प्रगती नसेल, नुसती भोवंड असेल, तर ती गती काय कामाची? (५९)
* माणसानं नुसतं विचारानं ग्रेट असून पुरेसं नाही. माणसानं कृतीतही ग्रेट असावं. तर ते खरं ग्रेटनेस. (७२)
* प्रचारक कधी आग्रही होतात, कधी हिंसक, कधी आक्रमकही. पण विचारवंत द्रष्टा असतो. तो विचार आणि आचार यांच्यातील समतोल साधतो. (७१)
* प्रत्येक महात्म्याची भाषा शेवटी एकच असते. कितीही भेदात, पारतंत्र्यात ते जगत असले तरी ते मनानं मुक्ततेचं स्वप्न पाहात असतात. मुक्ततेचं स्वप्न प्रत्येकाचं स्वातंत्र्य, जबाबदाऱ्या ह्यातून साकारणार आहे हे त्यांना ठाऊक असते. प्रत्येक महात्मा एकात्मतेचाच उपाय सांगतो. (७१)
* जात लपू शकते पण वर्ण नाही. (६६)
* पहिला लढा अस्तित्वाचा, मग विकासाचा आणि नंतर स्वत:साठीचा विचार. जिंकल्या गेलेल्यांना ह्याच क्रमाने आयुष्याचा विचार करावा लागतो. (६७)
* शरीराला तगवायला हवा, प्रकाश, अन्न, पाणी... अशा बाह्यचेतना लागतात. मनाला तगवणारं असतं प्रेम. (६८)
* विचार, भावना, व्यक्ती असं वेगळं कसं करता येईल? ह्या सगळ्यांनी शरीर समृद्ध होतं. (६८)
* प्रेम ही एक अमूल्य भावना आहे. प्रेशियस. मनात, जाणिवेत त्या भावनेला सतत ठेवणं हे प्रेमाचं शाश्वतत्व. लग्न, एकत्र राहणं, एकत्र येणं एवढ्या व्यवहारी पातळीवर प्रेमाला ओढून आणू नये. त्याला सहजपणे वाहतं होऊ दे. आपोआप ते कसकशी वळणं घेतं ते पाहा आणि तसं स्वीकार करा. (६९)
* प्रेमाशिवाय माणूस अपूर्ण आहे. दोन अपूर्ण व्यक्ती एकमेकांना प्रेम देतात, पूर्ण होतात. एकमेकांशिवाय अपूर्ण असणाऱ्या ह्या व्यक्ती एकमेकांच्या पूर्णतेची काळजी घेतात. प्रेम समोरच्या व्यक्तीला एक उंची देऊ पाहातं. (७९)
* दिवा मार्गावर स्थिर असतो. त्या प्रकाशात चालणारा पुढे चालत जातो. प्रकाश साथीला असला तरी दिव्यात आणि चालणाऱ्यात अंतर पडत जातं.
* निर्विकल्पपणे देण्यासारखं असतं ते केवळ प्रेम आणि वात्सल्य. देणारा आणि घेणारा ते निर्विकल्पपणे देऊ घेऊ शकतो. (८०)

* गरज असेल तर त्याला प्रेम का म्हणावं? (८०)
* जीवन आपलं परिपूर्णत्व शोधत असतं. मनाला प्रेमाची तहान असते, शरीराला शरीराची ओढ असते. आत्म्याला आत्मिक ओढ असते. मानसिक, शारीरिक गरज भागल्यावरही ती आत्मिक ओढ कायम राहाते. तिला अंत नसतो. (८१)

किंमत : १५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.

नवे कोरे

सर्कल ऑफ लाइट



किरणजीत अहलुवालिया
राहिला गुप्ता

अनु. उषा महाजन

३५०रु. पोस्टेज ३०रु.

किरणजीत अहलुवालियाची कहाणी ही खूपच भयानक व धक्कादायक असली तरी तिचा शेवट मात्र आश्वासक आहे.

अतिशय कठीण परिस्थितीतही जगण्याची दुर्दम्य इच्छा व आशावाद यांचं ज्वलंत उदाहरण म्हणजेच ही जीवनगाथा!

पुस्तक परिचय

एका मनस्वी, स्वाभिमानी लेखकाबरोबर घालवलेल्या नऊ-दहा वर्षांच्या वैवाहिक जीवनातील ताणतणाव

"मी अनीता राकेश सांगतेय..."

अनीता राकेश अनु. रजनी भागवत

'मी अनीता राकेश सांगतेय' हे अनुवादित आत्मकथन हिंदी साहित्यकार मोहन राकेश यांच्याबरोबर घालवलेल्या दहा वर्षांच्या सहजीवनावर प्रकाश टाकणारे आहे.

अनीता औलक या मोहन राकेश यांच्या तिसऱ्या पत्नी. २२ जुलै १९६३ रोजी त्यांचे लग्न झाले तेव्हा त्या २० वर्षांच्या होत्या आणि मोहन राकेश हे ३८ वर्षांचे. १९७३च्या जानेवारीत मोहन राकेश यांचे निधन झाले. पूर्वा ही मुलगी आणि शैली हा मुलगा अशी दोन अपत्ये अनीता राकेश यांना झाली. हा उणापुरा एका दशकाचा वैवाहिक काळ मोठा वादळी ठरला.

'आधेअधुरे' हे हिंदी नाटक विजय तेंडुलकर यांनी मराठीत आणले. १९६८ मध्ये भक्ती बर्वे वगैरेंच्या भूमिका असलेले हे नाटक अमोल पालेकरांनी मराठी रंगभूमीवर सादर केले. त्यामुळे मोहन राकेश हे नाव मराठी रसिकांना परिचित व प्रिय झाले. हिंदीतील नवकथेच्या आद्य प्रवर्तकांमध्ये अग्रभागी असणारे राकेशजी 'सारिका' या कथांना प्राधान्य देणाऱ्या टाइम्स ग्रुपतर्फे निघणाऱ्या मासिकाचे संपादक म्हणूनही काही काळ कार्यरत होते आणि कथांप्रमाणेच कादंबऱ्या आणि नाटके लिहिण्यातही त्याचा हातखंड होता. साहित्यक्षेत्रात नवनवे प्रयोग करू पाहणाऱ्या प्रतिभावंत लेखककवींचा तो बहारदार काळ होता. बंगाली, मराठी, हिंदी आणि कानडी नाट्यक्षेत्राला त्यावेळी नव्या प्रयोगशील रंगकर्मींनी रसिकांना आकृष्ट केलेले होते आणि त्या रंगभूमीशी संबंधित रंगकर्मींच्या परस्पर संवादाने व सहकार्याने भारतीय नाट्यसृष्टीचे चैतन्य बहरलेले होते. वसंतराव कानेटकर, विजय तेंडुलकर, शंभू मित्रा, मोहन राकेश, गिरीश कर्नाड, आद्य रंगाचार्य हे त्या काळातले अग्रेसर नाटककार.

मोहन राकेश यांच्या आधेअधुरे या नाटकाची पुढे १९६६ ते १९७३ या काळातील सर्वोत्कृष्ट नाटक म्हणून संगीत नाटक अकादमीने निवड केली आणि १२ भारतीय भाषांत त्याच्या अनुवादाची व्यवस्था करण्यात आली. दहा हजार रुपयांचा हा पुरस्कार होता. परंतु दुर्दैव एवढेच की हा पुरस्कार त्यांच्या मृत्यूनंतर काही महिन्यांनी जाहीर झाला. त्यामुळे तो स्वीकारण्याची संधी त्यांना मिळाली नाही. भारतीय पातळीवरचा हा पुरस्कार जाहीर होण्याच्या आधीच हे नाटक मराठीत आले, त्याचे प्रयोगही महाराष्ट्रात रसिकांचा प्रतिसाद मिळवत राहिले हे विशेष!

मोहन राकेश यांच्याबरोबर अनीता औलक यांनी दहा वर्षांचे सहजीवन व्यतीत केले. या काळातही मोहन राकेश यांचे जीवन बरेचसे अस्थिरच होते. जालंधर, दिल्ली, मुंबई, सिमला, मसुरी अशी भ्रमंती चालूच होती. स्थिर नोकरी नव्हती. कथा-कादंबऱ्या-नाटकांचे लेखन यातून जी प्राप्ती होई ती प्रपंच रेटायला पुरेशी होती असेही दिसत नाही. वेगवेगळ्या कमिट्यांवर ते सदस्य म्हणून, सल्लागार म्हणून काम करीत होते. समित्यांच्या बैठकांसाठी दौरे होत. नाटकांच्या प्रयोगाचे मानधन

मिळे. त्यांची पहिली पत्नी शीला ढोबाल. तिच्यापासून झालेला मुलगा नवनीत. तो आईजवळच राहत असे. घटस्फोटानंतर शीला ढोबाल डेहराडून येथे कॉलेजमध्ये लेक्चरर झाल्या. पुढे प्राचार्यपदही त्यांना मिळाले. दुसरी पत्नी पुष्पा. त्या दोघींचाही मोहन राकेश यांच्याबरोबर तीन तीन वर्षे संसार झाला. पहिल्या पत्नीच्या मुलीने आपल्या वडिलांना जाणतेपणी बघितलेच नव्हते. मोहन राकेश पुढे पुढे अनीताला म्हणत, ''तू माझं रेकॉर्ड खराब केलं आहेस. मी कुठल्याही बाईबरोबर दोन वर्षांपेक्षा जास्त राहिलो नाही. पहिल्यांदा मला वाटलं, तू दोन वर्षांत निघून जाशील. पण सहा वर्षं झाली. तुझी जायची लक्षणं दिसत नाहीत. पहिल्यांदा एक मुलगी झाली... मग मुलगा... आता तिसऱ्याचा बेत नाही ना?'' (पृष्ठ ८२)

''माझे पहिले प्रेम लेखन, दुसरे माझे मित्र, त्यानंतर तुझे स्थान. तिसरे.'' असे ते पत्नीला पुन:पुन्हा बजावत.

मोहन राकेश यांचे खरे नाव मदनमोहन गुगलानी. अमृतसर येथे जन्म. इंग्लिश आणि हिंदी घेऊन पंजाब युनिव्हर्सिटी (लाहोर) मधून एम. ए.

मोहन राकेश यांच्या हयातीत अंधेरे बंद कमरें, न आनेवाला कल आणि अंतराल या तीन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या.

मृच्छकटिक आणि शाकुंतल या दोन नाटकांचे हिंदी अनुवाद त्यांनी केले. त्यावेळी ते शाळेत संस्कृतचे अध्यापन करीत होते. आषाढका एक दिन (१९५८), आधेअधुरे (१९५९), लहरोंके राजहंस ही तीन नाटके रंगभूमीवर आली.

उसकी रोटी या कथेवर मणी कौल यांनी काढलेला चित्रपट १९७१ मध्ये प्रदर्शित झाला.

कथांचे लेखनही सातत्याने चालू राहिले.

हिंदीतील 'नई कहानी' या (मराठीतील नवकथासदृश) नव्या प्रवाहाचे मोहन राकेश हे एक प्रवर्तक मानले जातात. अस्तित्ववादाचा त्यांच्या जीवनदृष्टीवर प्रभाव आरंभापासूनच जाणवतो. जालंधर आकाशवाणीवर त्यांच्या नाटिकांचे प्रयोग सातत्याने होत. ओम शिवपुरी, श्यामानंद जालान, अरविंद गौर, रामगोपाल बजाज हे त्यांच्या नाटकांचे दिग्दर्शक होते. रातकी बाहों में, नये बादल, मेरी प्रिय कहानियाँ, दस प्रतिनिधी कहानिया वगैरे त्यांच्या कथासंग्रहांनाही मोठा वाचकवर्ग लाभला.

आरंभी मसुरीला एका कॉनव्हेंटमध्ये संस्कृतचे शिक्षक म्हणून मोहन राकेश यांनी काम केले. एके दिवशी अचानक त्यांनी राजीनामा दिला. 'न आनेवाला कल' या कादंबरीतील मनोज सक्सेना हा नायक मोहन राकेश यांच्यासारखाच अचानक शाळेचा राजीनामा देतो. त्याचीही पत्नी त्याला सोडून माहेरी जाते. अचानक लग्न झाले. अचानक नोकरी मिळाली. अचानक नोकरी सोडून दिली. तोही लेखनावर उपजीविका करायचे ठरवतो. या कादंबरीतले वातावरण बरेचसे वास्तव आहे. पुढे

१९५८ मध्ये मोहन राकेश डीएव्ही कॉलेज जालंधरमधील हिंदीच्या प्राध्यापकाची नोकरी सोडून दिल्लीतील कीर्तिनगर भागात द्वितीय पत्नी पुष्पा यांच्यासह राहू लागले. दोन-तीन वर्षांत त्यांचे बिनसले. ते पुन्हा जालंधरला गेले.

अनीता औलक यांची आई चंद्रा औलक साहित्यात रस घेणारी. स्वत:ही लेखन करणारी. अज्ञेय, जैनेंद्रकुमार, महावीर अधिकारी, दीनानाथ मलहोत्रा यांचे प्रोत्साहन तिला होते. त्यावेळी आई दिल्ली क्लॉथ मिलमध्ये नोकरी करत होती. अनीता आठ वर्षांची असल्यापासून मोहन राकेश या नावाशी परिचित होती. 'नई कहानियाँ' मध्ये आलेल्या मोहन राकेश यांच्या कथा ती छोट्या अनीताला सांगत असे. पुढे मम्मी आणि मोहन राकेश यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. गंमत म्हणजे मम्मी पत्रे लिहिताना अनीता या नावाने लिहीत असे. १९५८ मध्ये आईने दिल्लीत मोहन राकेश यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. दुसऱ्या दिवशी मोहन राकेश हे पत्नी पुष्पासह मम्मीला भेटायला तिचा मुक्काम असलेल्या गोयल अंकलच्या घरी आले. अनीताला मोहन राकेश म्हणाले, ''तुझ्या नावाशी माझी ओळख फार जुनी आहे.'' अठरा वर्षांची अनीता कॉन्व्हेंटमध्ये शिकलेली असूनही हिंदी साहित्याची चांगली जाणकार आहे हे राकेशजींच्या लक्षात आले. लेखक या जमातीबद्दलची अनीताची भाबड्या भक्तीची भावना त्यांना स्पर्शून गेली. अनीताच्या मम्मीने लेखकपत्नीला जवळ बसवून ''तुमची पत्नी खूप गोड आहे... खूप स्वीट आहे''चा पाढा सतत सुरू ठेवला. लेखकपत्नीला अनीता बीएला बसते आहे ऐकून तिच्याविषयी कुतूहल वाटले.

नंतर ग्वाल्हेरला चंद्रा औलक यांना भेटायला मोहन राकेश आले. लेखकाच्या स्वागतासाठी सारे घर सज्ज होते. रात्री अनीताने कॉफीचा आग्रह केला. ''म्हणजे मला आज रात्री झोप येऊ नये असा तुझा डाव दिसतो.'' राकेशजींच्या चिंतनात अनीताला रात्रभर झोप आली नाही. अनीताची एक कथा राकेशजी दुरुस्त करणार होते. ''माझी कथा कधी दुरुस्त करून देणार?'' असे अनीताने विचारले. ते म्हणाले, ''रात्री.'' संध्याकाळी दिल एक मंदिर हा चित्रपट बघतानाही अनीताचे लक्ष शेजारी बसलेल्या राकेशजींकडेच जास्त होते. रात्री कथेच्या रूपरेषेबद्दल त्यांनी विवेचन करून म्हटले, ''जोपर्यंत स्वत:च आपण आपली कथा सुधारत नाही तोपर्यंत कथा कशी लिहावी हे शिकू शकणार नाहीस.'' त्यावेळी अनीताला तिने न विचारलेल्या दुसऱ्या एका प्रश्नाचे उत्तरही मिळाले. मोहन राकेश यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून गेलेल्या अनीताने त्यांच्या डोळ्यांत विश्वासाने बघितले.

मोहन राकेश दिल्लीला गेल्यावर अनीताने त्यांना पत्र लिहिले, ''तुमचं पत्र मिळालं. मी स्वत: अगदी संकटात सापडले आहे. हे सर्व काय आहे हे मलाच आजवर कळलेलं नाही. तुम्हालाही हे हवं आहे का? की मी ते माझ्या तोंडाने सगळे सांगायला हवे? मनातली गोष्ट व्यक्त केली तर माणूस क्षुद्र होतो असा कदाचित

तुमचा समज असावा. पत्र लिहाल?''

राकेशजींनी उत्तर पाठवले. ''तुझं पत्र आल्याचा आनंद झाला. कमलेश्वर आणि ओमप्रकाश या दोघांशी बोलून मोकळा झालो... 'लहरों के राजहंस' लिहून पूर्ण झाले. अर्पणपत्रिका अशी आहे, ''मनातली गोष्ट सांगितली तर व्यक्ती छोटी होऊन जाते असे जिला वाटतं, तिला''

तशात अनीताला न्यूमोनिया झाला. हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागले. राकेशजींना हे कळले. ते तिला भेटायला आले. मम्मी चहा करण्यासाठी साठी बाहेर गेल्या, तेव्हा राकेशजी अनीताच्या ओठांचे चुंबन घेऊन म्हणाले, ''आय लव्ह यू.''

संध्याकाळी ती एकटी असताना राकेशजी म्हणाले, ''मी एक फारच कमनशिबी माणूस आहे अन्ना. तुला माझ्या सावलीपासूनही दूर रहायला हवे. मी एक अशक्य (डिफिकल्ट) माणूस आहे असे लोक म्हणतात. पण मी एक प्रामाणिक माणूस आहे हेही लक्षात घ्यायला हवे. एखाद्या व्यक्तीला एका अशक्य माणसाबरोबर एक प्रामाणिक माणूस पंसत पडला तर चूक कोणाची? तू खूप लहान आहेस. भोळीही आहेस. तुला जी गोष्ट समजावून सांगावी असं मला वाटतं ती तुला कळणारच नाही. हे एका परीने ठीकच आहे असे वाटते. कारण समजणारे लोक कधीच सुखी होत नाहीत.''

अनीताने त्यावर आपले भाष्य केले. ''मी आत्तातरी कुठं सुखी आहे? त्यामुळे तुमच्याबरोबर किमान दु:खाची सीमा तरी ओलांडावी अशी माझी तीव्र इच्छा आहे.''

राकेशजी मित्राबरोबर बाहेर गेल्यावर अनीताने आपल्या आईला सांगितले, ''मला राकेशजींशी लग्न करायचं आहे.''

त्यावर मम्मी तिच्या थोबाडीत देऊन म्हणाली, ''थांब. तुझ्या डॅडींना बोलावून आणते.''

ते दोघे अनीताला चांगलं झोडपतात. मारून मारून थकतात. अनीता मम्मीला म्हणते, ''तुला माझा हेवा वाटतोय? तू माझ्यावर जळतेस!''

मम्मी स्वयंपाकघरातून मुसळ आणते. ''हेच ऐकण्यासाठी मी आयुष्यात एवढा संघर्ष केला का? म्हणे मी तुझ्यावर जळतेय.''

रात्री मोहन राकेश अनीताला सर्वांसमक्ष सांगतात, ''हे बघ अनीता. आम्ही काही निर्णय घेतले आहेत... तुला तुझं शिक्षण पूर्ण करायला हवं. मग एखादी नोकरी पकडायला हवी. तोपर्यंत पुष्पाचा आणि माझा घटस्फोट झालेला असेल... त्यानंतर बघू पुढं काय करायचं ते.''

त्यावर अनीता राकेशजींना ते एकटे असताना म्हणते, ''कुठलं शिक्षण? कसली नोकरी? कुठले निर्णय? माझा तर नुसत्या जगण्यावरही विश्वास नाही. माझा विश्वास फक्त तुमच्या बोलण्यावर, तुमच्या अस्तित्वावर आहे.''

व्यावसायिक अडचणींमुळे मम्मी डॅडींना ग्वाल्हेर सोडावे लागते. तेव्हा मोहन राकेश दिल्लीमध्ये राजकमल प्रकाशनच्या गेस्ट हाऊसमध्ये या कुटुंबाची राहण्याची व्यवस्था करतात... तिथं पुन्हा मम्मी अनीताला राकेशजींच्या समक्ष इलेक्ट्रिक वायरने आणि काठीने यथेच्छ बडवते. अनीता बेशुद्ध पडते. राकेशजी संधी पाहून तिला विचारतात, ''आता या क्षणी तू माझ्याबरोबर येऊ शकतेस? तू फक्त एकदा हो म्हण. पुढचं सगळं मी बघून घेईन.'' पण अनीता नाही म्हणते.

ते गेस्ट हाऊस सोडण्याची सूचना मग ओमप्रकाशजी करतात. मम्मी सर्वांना घेऊन माहेरी मुक्कामाला जाते.

राकेशजी अनीताला चिठ्ठी पाठवतात, ''प्रिय अनीता, मला विसरून जा. म्हणजे तुला पुढच्या आयुष्यात कसलाही त्रास भोगावा लागणार नाही. सस्नेह. राकेश.''

दिल्लीतील मुक्कामाचा फायदा घेऊन अनीताने बीएची परीक्षा द्यावी असे तिचा भाऊ सुचवतो. कॉलेजची ॲडमिशन घेऊन देतो. रोज सकाळी ७ ते ११ कॉलेज... रोज सकाळी मोहन राकेश तिला कॉलेजजवळ भेटायला यायचे...

'सारिका'च्या एका कार्यक्रमात अनीताची कमलेश्वरांशी ओळख होते. मन्नू भंडारीचीही भेट होते. राकेशजींना मन्नू भंडारी म्हणतात, ''राकेशजी, इतकी लहान आणि भाबडी मुलगी तुम्हाला कसं समजावून घेऊ शकेल?''

२२ जुलै १९६३ रोजी रविवारच्या ट्युटोरियलसाठी अनीता घराबाहेर पडते. राकेशजी तिला आपल्या निवासस्थानी नेतात. टेबलावर दोन हार आणि मिठाईचा बॉक्स... एकमेकांना हार घालून ते दोघे विवाहबद्ध होतात.

कमलेश्वर आणि राकेशजींची आई या दोघांनाच या लग्नाची कल्पना असते.

लग्नानंतर अनीता परत आपल्या घरी जाते. नेहमीप्रमाणे तिचा दिनक्रम चालू असतो.

दोन दिवसांनी अनीताची मम्मी तिच्यासाठी एक स्थळ आणते. मुलगा मॉडर्न असतो. काबूलमधील अमेरिकन दूतावासात नोकरीला असतो. तो तिला म्हणतो, ''कथालेखन करायला, लेखकांना भेटायला माझी हरकत नाही. काबूलमधून सुटीत येथे आल्यावर त्यांना जरूर भेटत जा. काही आडकाठी असणार नाही.''

मुलाची आई लग्नाची तयारी करा म्हणते.

अनीता राकेशजींना दुसऱ्या दिवशी भेटते. त्यावेळी राकेशजींबरोबर कमलेश्वर असतात. आदल्या दिवशी मोहन राकेश यांच्यावर सुरी हल्ला झालेला असतो. त्यांच्या संरक्षणासाठी पोलीस बरोबर असतात. राकेशनी दिल्ली सोडून काही काळ दूर जावे असा त्यांना सल्ला देण्यात येतो. कमलेश्वर अनीताला म्हणतात, 'तो गेला तर तुझ्याबरोबरच जाईल. एकटा जाणार नाही. उद्या मला फोन कर.'

अनीता घरी जाते. मम्मी म्हणते, ''राकेजींवर सुरी हल्ला झाला.'' ती म्हणते,

''कॉलेजवर सर्वत्र यावरच चर्चा चालू होती.''

मम्मी नंतर बातमी देते, ''साखरपुडा आणि लग्न मंगळवारी करा असा मुलाकडचा निरोप आहे.''

ती म्हणते, ''ठीक आहे.''

कमलेश्वरांचा निरोप येतो, ''रविवारी फ्लाइट आहे. तू सकाळी ठरलेल्या वेळी ठरलेल्या ठिकाणी ये.''

२९ जुलै १९६३ रोजी सकाळच्या फ्लाइटने अनीता व राकेशजी मुंबईला पोहचतात.

'सन अँड सँड' मध्ये त्यांच्यासाठी खोली रिझर्व्ह केलेली असते.

राकेशजी रात्रभर अनीताला एकच गोष्ट सांगत राहतात, ''मला घर पाहिजे. अन्ना, मला आयुष्यात सर्व काही मिळालं. पण घर मिळालं नाही. तू माझ्यासाठी असं घर कर की जे मला अनुकूल असेल. अन्ना, मी खूप थकलोय. निराश झालोय. मला तू आधार दे. मला आणि माझ्या घराला.''

राकेश मुंबईला आल्याची बातमी सर्व मित्रांना कळते.

धर्मवीर भारती, गिरिधारीलाल बैद, बासू भट्टाचार्य व रिंकी, कृष्णचंद्र इ. इ. मित्र भेटायला येतात.

३ ऑगस्टला अनीताचा वाढदिवस. वय २१ पूर्ण. त्याची पार्टी देण्यात येते.

कमलेश्वर दिल्लीहून येतात. सांगतात, ''तुझ्या मम्मीने पोलिसात तक्रार केली होती पण तू १८ वर्षापेक्षा मोठी म्हणून पोलिसांनी तक्रार घेतली नाही.''

मित्रांच्या गराड्यातून राकेशजींना बाहेर पडता येत नाही. रात्री उशिरापर्यंत गप्पागोष्टी चालू.

अनीताजी लिहितात, ''जो काही थोडा वेळ मिळायचा तो एकमेकांशी भांडणातच जायचा... एकमेकांची उणीदुणीच निघत राहायची. असल्या अनाकलनीय माणसाबरोबर माझा कसा निभाव लागणार असाच प्रश्न प्रत्येकाला पडायचा. राकेशजींच्या स्वभावातील गुणदोषांबद्दल त्यांचे मित्र माझ्याशी बोलत; पण अनीताची बाजू राकेशजींजवळ मांडणारे कोणीच नव्हते.''

दिवाळी माथेरानला साजरी झाली. करवाचौथला राकेशच्या मातोश्रींनी, अम्माजींनी अलाहाबादहून लाल साडी, सिंदूर व शगुन पाठवला.

लग्नाला सहा महिने झाल्यावर अनीताजींना वाटले, ''या सहा महिन्यात आम्ही एकमेकांना जास्तच परके, जास्तच अनोळखी झालो. आमच्यातलं अंतर इतकं वाढलं की माझ्याशी आत्मीयतेनं बोलायचा त्यांचा प्रयत्न फसला.''

नंतर अम्माजींजवळ काही दिवस हे दोघे अलाहाबादला राहिले.

तेथून दिल्लीला ते आले. कमलेश्वरजींच्या घरच्या गच्चीमध्ये, बरसातीत

अम्माजींसह राकेश दांपत्य राहू लागले. बीएच्या परीक्षेत अनीताजींना कसेबसे यश मिळाले. 'काँपता हुआ दरिया' या कादंबरीचे लेखन राकेशजींनी पूर्ण केले.

मन्नू भंडारी -राजेंद्र यादव, जवाहर चौधरी, ओमप्रकाश, सुरेश अवस्थी, बन्सीलाल कपूर, भीष्म सहानी, रमेश बक्षी, दूधनाथ, भारत भूषण आग्रवाल, ओमशिवपुरी, राजेंद्र पॉल, राजिंदर नाथ, सत्यदेव दुबे, श्यामानंद जालान असे मोठे मित्रांचे वर्तुळ दिल्लीमध्ये होते. ते मित्र कधीही घरी येत. रात्री उशिराही येत. राकेशजी फोन करीत, आम्ही सहाजण जेवायला येतोय. अनीता सर्व काही करील असा सर्वांना भरवसा होता.

...एका मनस्वी, स्वाभिमानी लेखकाबरोबर नऊ-दहा वर्षांचा जो वैवाहिक काळ घालवला त्यातले ताणतणाव अनीताजींनी 'सतरे और सतरे' या पुस्तकाद्वारे प्रकट केले. पुढे त्यानंतरचा काळ कसा गेला तेही लिहिले. या दोहोंचा समावेश 'मी अनीता राकेश सांगतेय' मध्ये झाला आहे. १९७३ नंतरचे डीडीएमध्ये स्वत:चे छोटे घर त्यांनी उभे केले. शिक्षिकेची नोकरी करून प्रपंच चालवला. मुलांना पदवीधर केले. दुसऱ्या लग्नाचाही अनुभव घेतला. पुरुषी लंपटपणालाही तोंड दिले.

हे आत्मकथन खूप काही सांगते. खूप काही सूचित करते.

काही अवतरणांवरून त्याची कल्पना येईल.

* राकेशजींना अंतर्बाह्य समजून घेणं ही एक दीर्घ तपश्चर्याच होती. वरवर पाहता ते जितके साधे आणि सरळ वाटायचे, तितके प्रत्यक्षात नव्हते. ते बाहेरून जितके औपचारिक होते त्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने मनानं औपचारिक होते. जवळचे मित्रही त्यांना नीट ओळखू शकले नाहीत. कारण राकेशजी स्वत:पुरतेच कुठंतरी एकसंध होते. स्वत: सोडून इतरांसाठी त्यांची वेगवेगळी रूपं दिसून यायची. 'प्रत्येक माणसाची स्वत:ची अशी एक भूक असते. मी प्रत्येक माणसाशी वेगळा वागतो. सर्वच माणसे एकाच समान पातळीवर नसतात' असे ते म्हणत. (८०)

* खरे राकेश एखाद्या नंग्या फकिराप्रमाणे होते. त्याच तऱ्हेनं ते स्वत:ला आरशात बघायचे आणि खूष व्हायचे. तसं बघायला त्यांना आवडायचं कारण त्यांच्या मते तेच त्यांचं खरं रूप होतं (८१)

* राकेशजींचे वागणे घरात वेगळे असायचे. बाहेर वेगळे असायचे. या दोहोंचा ताळमेळ बसवण्यासाठी मला बराच काळ घालवावा लागला. (८१)

* आम्ही एकमेकांबरोबर असलो की भांडायचो आणि वेगवेगळे झालो की रडायचो. हा एक विचित्र विरोधाभासही होता. (८१)

* राकेशजी कधी कधी फारच थोर व्यक्ती वाटत. कधी हळुवार, निरागस, अबोध. कुणाबद्दल प्रेम वाटलं तर त्याच्यावरून जीव ओवाळून टाकणार. राग आला तर त्याला तोडून टाकणार. वडिलांकडून बुद्धिमत्तेचा तर आईकडून प्रेमळपणाचा

वारसा त्यांनी घेतला होता. या दोहोतला संघर्ष नाट्यपूर्ण असायचा. (८३)

* राकेशजींचा सर्वांत मोठा गुण म्हणजे त्यांचा स्वाभिमान. त्यांनी स्वाभिमानाशी कधी तडजोड केली नाही (८३)

* राकेशजींचा धाकटा भाऊ वीरेन याला वाटायचे की राकेशजींनी आपल्या मित्रांचे जेवढे हित पाहिले, जपले, तेवढे आपल्या भावाचे कधीच केले नाही. (८८)

* राकेशजींच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल काहीही लिहिणं किंवा बोलणं हे एक मोठं आव्हान आहे. मी स्वत: त्यांच्याविषयी काहीही सांगायला स्वत:ला हतबल आणि असमर्थ समजते. (९१)

* त्यांच्या जीवनातला बराचसा भाग त्यांच्यापुरताच सीमित होता. त्यात कोणालाही प्रवेश नव्हता. त्यात कोणालाही त्यांनी सहभागी करून घेतले नाही. (९१)

* मोहन राकेश हॉटेल आणि डाकबंगल्यातच राहणं म्हणजे आयुष्य अशा मताचा दिसतो - कमलेश्वर (४०)

* मी एक अतिशय दुर्दैवी माणूस आहे. अन्ना (अनीता), तुला माझ्या सावलीपासूनही दूर राहायला हवं. मी एक कठीण (डिफिकल्ट) माणूस म्हणून ओळखला जातो, पण खरं तर मी प्रामाणिक माणूस आहे. एखाद्या व्यक्तीला कठीण आणि प्रामाणिक असा दोहोंचा मेळ असलेला माणूस पसंत पडला तर चूक कोणाची? –मोहन राकेश (५०)

* २२ जुलै १९६३ रोजी मोहन राकेश आणि अनीता औलक यांचे लग्न झाले. ही गोष्ट राकेशजींची आई आणि कमलेश्वर यांनाच ठाऊक होती. २९ जुलै रोजी कॉलेजला जाण्यासाठी अनीता घरातून नेहमीप्रमाणे सकाळी बाहेर पडली. राकेशजींबरोबर टॅक्सीतून गोल मार्केटला मदन गुप्ता यांच्या घरी गेली. तेथून मदन गुप्ता यांनी त्या दोघांना विमानतळावर पोचवले. नंतर कमलेश्वर राकेशजींची सुटकेस घेऊन आले. ''आता मागं नाही पहायचं. पुढंच जायचं.'' कमलेश्वर अनीताला म्हणाले. (६७)

* मला घर पाहिजे घर. मला आयुष्यात बाकी सगळं मिळालं. फक्त एक घर नाही मिळालं. मी त्यासाठी काय कमी वणवण केली? कमी कष्ट केले? पण का कोण जाणे, घर नावाची वस्तू माझ्यावर रुसूनच राहिली. दोन वेळा ते मिळाल्याचा आभास झाला खरा, पण दोन्ही वेळा मला त्यापासून लांब पळून जावं लागलं... माझ्यासाठी एक असं घर कर की मला ते आपलं वाटेल. अन्ना, मी फार थकलेला माणूस आहे. निराश आहे. मला तू सांभाळायला हवंस. मला आणि माझ्या घराला... (६८)

* राकेशजींशी नातं जोडून मला सहा महिने झाले होते. पण या सहा महिन्यात आम्ही एकमेकांना जास्तच परके, जास्तच अनोळखी झालो होतो. (७३)

* दररोज मला वाटायचं की आज राकेशजी मला समजले आहेत. आता

कसलीही अडचण येणार नाही. पण दुसऱ्याच दिवशी वाटायचं की आता ही एवढी गोष्ट समजायला हवी. ती समजली म्हणजे सारं काही सुरळीत होईल. प्रत्येक नवा दिवस असाच वाटायचा. (७५)

* मी आयुष्यात जर कुणाचा आगाऊपणा सहन केला असेल तर तो एक तुझा नाहीतर कमलेश्वरचा. (७८)

* राकेशजी मित्रांच्या घोळक्यात असत. त्या प्रत्येक मित्राबरोबर त्यांचे नाते काहीतरी खास असायचे. मी ते नाते समजून घेण्याचा प्रयत्न करायचे. (७८)

* मी त्यांच्या मित्रांना आपलं मानलं होतं. हळूहळू ते छोटंसं घर एक खूप मोठं कुटुंब झालं होतं. तिथं काही लोक फक्त हसण्या-हसवण्यासाठी यायचे तर काही फक्त रडगाणं ऐकविण्यासाठी. (७९)

किंमत : १६०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.

वि ज्ञा ना ती ल
सरस आणि सुरस

डॉ. राहुल गोखले



१८०रु. पोस्टेज २५रु.

विज्ञानइतिहासाची पाने ही शास्त्रज्ञांच्या जीवनकथांनी आणि शोधांच्या रंजक कथांनी नटली आहेत. साध्या सेफ्टी पिनपासून अणुबाँबपर्यंत जे अनेकविध शोध लागले, ते संशोधक-शास्त्रज्ञांच्या परिश्रमांची, चिकाटीची आणि मुख्यत: त्यांच्या प्रतिमेची साक्ष पुरवितात. विज्ञानइतिहासातील अशीच काही पाने उलगडून दाखविण्याचा हा प्रयत्न. या पुस्तकात लिओनार्दो द विंची या प्रख्यात चित्रकारातील संशोधक भेटेल, नोबेल, पॉलिंग, साखारॉव्ह, भटनागर हे संशोधक-शास्त्रज्ञ भेटतील, तसेच ॲस्पिरीनपासून विजेच्या दिव्यांपर्यंत अनेक शोधांच्या रंजक कथा वाचायला मिळतील.

विज्ञानातील हे सारे 'सरस' तितकेच 'सुरस'ही आहेत.

ते तितक्याच रंजक पद्धतीने मांडलेले या पुस्तकात आढळतील.

पुस्तक परिचय

ताटातूट झालेल्या मायलेकरांचे पुनर्मीलन घडवून आणणारी, त्यासाठी वाटेल ते धोके पत्करणारी धैर्यशील नायिका

हिरॉईन ऑफ द डेझर्ट



डोन्या अल्-नहि अनु. शोभना शिकनीस

डोन्या टेपेन या केंब्रिजशायर येथे जन्मलेल्या ब्रिटिश तरुणीने लग्नानंतर इस्लाम धर्म स्वीकारला आणि 'डोन्या अल नहि' हे नाव धारण केले.

वयाच्या १५व्या वर्षी डोन्या घरून पळून गेली. वडील एअरक्राफ्ट इंजिनिअर, आई कर्तव्यदक्ष गृहिणी. पण तिची शिस्त कडक. आपल्या तीन मुलींवर सतत शिस्तीचा आणि रागीटपणाचा बडगा उगारण्यात तिला आपल्या मातृत्वाचे सार्थक वाटे. डोन्या ही मधली मुलगी. मोठी सँड्रा, धाकटी ट्रेसी. आई-वडील यांची वादावादी आणि आईचा कडक स्वभाव यामुळे डोन्या आणि तिच्या बहिणी नेहमी तणावग्रस्त असत. डोन्या सात वर्षांची असताना आई चक्क घर सोडून गेली आणि दुसऱ्या एका तरुणाबरोबर वर्षभर राहिली. त्यांचे नंतर फिसकटले तेव्हा आई पुन्हा घरी आली आणि डोन्यांच्या वडिलांनी तिला घरात घेतले. पण त्यांच्यातील संवाद मात्र संपला.

''आमचं घर म्हणजे प्रत्येकाचे तोंड वेगळ्या दिशेला असलेले एक दु:खद ठिकाण'' असे डोन्याने म्हटले आहे. पंधरा वर्षाच्या डोन्याला एका हिमवर्षावाच्या संध्याकाळी आईने क्षुल्लक कारणावरून बेदम मारले, तिच्या कपाळाला इजा केली. त्यावेळी तिचे बाबाही तिच्या बाजूने चकार शब्द बोलले नाहीत तेव्हा ती तावातावाने घराबाहेर पडली आणि पुन्हा कधी घरी परतली नाही.

रात्री एका चर्चच्या अंगणात आश्रय घेतला. सकाळी एका रेस्टॉरंटमध्ये काम मिळवले. ब्रेकफास्ट घेतल्यावर तरतरी आली. एका मैत्रिणीकडे राहण्याची सोय केली. आठवड्याने पगार मिळाल्यावर बरेच प्रश्न सुटले.

बॅटफर्ड विद्यापीठात अध्ययन करणाऱ्या करीम या अरब तरुणाची आणि तिची ओळख झाली. १९७०-८०च्या दरम्यान बरेच अरब विद्यार्थी इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी येत. इंग्लिश मुलींशी विवाह न करताही संबंध ठेवता येते हे कळल्यावर प्रणयाराधन करण्यात पुरुषार्थ मानत. आपल्या इस्लामी देशात मुलींना मोकळेपणाने भेटणे कधी शक्य नसे. येथे मात्र सुंदर आकर्षक तरुणी पावलोपावली दिसत. इंग्लिश मुलीशी मैत्री करण्यात त्यांना मोठे भूषण वाटे. इंग्लिश पत्नी केल्याने त्यांचा कुटुंबातही भाव वाढे. एखाद्या मुलीबरोबर शरीरसंबंध ठेवले वा तिला दिवस गेले तर तिच्याशी लग्न करणे आवश्यक अशी मानसिकता या अरबी तरुणांची असे. त्यामुळे अरब मुले आणि इंग्लिश मुली असे विवाह होत. पण एकमेकांशी लग्न केल्यावर दोन्ही जीवनशैलीतील आणि संस्कृतीतील फरक लक्षात आल्यावर हा विवाह म्हणजे आपल्या आयुष्यातील मोठी चूक झाली ही जाणीव होत असे. पण तोपर्यंत मुलेही झालेली असत आणि एकूणच गुंता वाढत असे.

डोन्याला करीम हा जॉर्डनमधला तरुण आवडला, तो तिला जॉर्डनमधल्या आपल्या कुटुंबात घेऊन गेला. करीमच्या कुटुंबातील माणसांचे डोन्याबरोबरचे वागणे सौजन्यपूर्ण, स्वागतशील होते. इस्लाम धर्माचा तिने अभ्यास केला. इस्लामचा

जीवनविषयक दृष्टिकोन ख्रिस्ती धर्मापेक्षा वेगळा आहे, अधिक निरोगी आणि दयाळू आहे असे तिला जाणवले. करीमच्या कुटुंबाचा भाग होऊन एक पूर्णपणे आनंदी, तृप्त जीवन जगण्याची, एका सुंदर देशात एकत्र कुटुंबात आपली मुले वाढविण्याची कल्पना तिला आकर्षक वाटू लागली. वर्षभर जॉर्डनमध्ये डोन्या करीमच्या कुटुंबात राहिली. करीमचा मोठा भाऊ त्याच्या इंग्लिश पत्नीसह भेटीला आला तेव्हा त्याची बायको तिला कष्टी व दु:खी दिसली. तिचं नवऱ्याबरोबरचं नातं देखील सुखद नसावं असं डोन्याला जाणवलं.

''आपलं लग्न झाल्यावर आपल्याबाबतीतही असंच घडेल का?'' असा प्रश्न तिला पडला.

''आपण करीमची बायको झालो तर त्याची आपल्याशी वागण्याची पद्धत बदलेल का? आपणही त्याच्या भावाच्या बायकोप्रमाणे दु:खीकष्टी, बापुडवाण्या होऊन जाऊ का?'' असा प्रश्न तिला पडला.

लग्नासारखा महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या दृष्टीने आपण अजून लहान आहोत, सतरा वर्षे हे वयही लग्नाचे नाही, लग्नानंतर आपल्याला धर्म बदलावा लागेल, आपल्याला होणाऱ्या मुलाचा धर्मही तोच असेल. नवऱ्याची गुलाम होऊन जॉर्डनमध्ये राहावं लागेल... आताच निर्णय घेऊ नये, असा विचार करून जॉर्डनमधील एका वर्षाच्या वास्तव्यानंतर डोन्या इंग्लंडला परत आली. इंग्लंडला परतल्यावर ती करीमला म्हणाली, ''लग्नाचा विचार तूर्त नको.''

तो समजूदारपणे नकार स्वीकारतो. तिला मित्र म्हणून भेटत राहतो.

एकोणिसाव्या वर्षी डोन्या कतारमधल्या अहमदला ट्युनिशियात भेटते. त्याची बीएमडब्ल्यू कार, त्याची श्रीमंती, त्याचे देखणेपण त्यांच्यामुळे डोन्याच्या आईला हवा तसा जावई मिळाल्यासारखे वाटते.

पण ऐन विवाहाच्यावेळी डोन्या वधू वेषात पळ काढते. इंग्लंडला जाते.

कुवेतमध्ये भेटलेला मोहमद गर्भश्रीमंत असतो. तो तिला लंडनमध्ये घर घेऊन देतो. तिला क्रेडिटकार्ड देतो. सौदी अरेबियातला हा तरुण. त्याला ती क्रेडिट कार्डवर साडेसात लाख डॉलर्सच्या खरेदीने चक्रावून सोडते.

सायप्रसमधील थिओ या पुरुषाची तिची गाठ पडते. त्याची आई फ्लोरा अगत्यशील, प्रेमळ असते.

डोन्या गरोदर राहते. तेव्हा ती थिओशी लग्न करते.

मुलाला जन्म देण्यासाठी मात्र लंडनला येते. मार्लनचा जन्म होतो.

लंडनमधल्या माएदा वेल येथील आपल्या फ्लॅटमध्येच डोन्या राहते.

सायप्रसमध्ये ती थिओच्या आग्रहामुळे परत जाते. मार्लनला तेथील शिशुवर्गात टाकते.

एक दिवस संधी बघून डोन्या मार्लनला आणि आया ॲना यांना घेऊन लंडनला

परत येते.

थिओ मार्लनचा ताबा घ्यायला येतो पण डोन्या त्याला दाद देत नाही.

अरे बरेच काही घडते.

पुढे तिचे महमूद या इराकी तरुणाशी लग्न होते. तो हॉटेलात कर्मचारी असतो. तिला खलिद, अमीरा आणि अल्ला अशी तीन अपत्ये होतात. महमूद तिला वैवाहिक सुख व स्थैर्य देतो. तिच्या कामात मदत करतो. तिला भावनिक पाठबळ देतो.

डोन्याची यापुढची कारकीर्द विलक्षण साहसाची ठरते. ती एक वेगळेच क्षेत्र निवडते आणि त्यात नाव कमावते. तिला 'हिरॉइन ऑफ द डेझर्ट' अशी नवी ओळख प्राप्त होते.

थिओशी लग्न झाल्यावर डोन्या मर्लिन या मुलासह सायप्रसमधून पळ काढते, जॉर्डन, लिबिया, सायप्रस, ट्युनिशिया, इराक, इराण वगैरे मुस्लीम देशातील तरुण युरोपमध्ये शिक्षणासाठी वा उद्योग व्यवसायासाठी येतात. तेथील मुलींवर छाप टाकतात. आपल्या श्रीमंतीने त्या गौर तरुणींना भुरळ घालतात. त्या तरुणींशी लग्ने करतात. लग्नानंतर इस्लामी धर्माचा स्वीकार त्यांना करावा लागतो. इस्लामी जीवनशैलीचा अवलंब करावा लागतो. नमाज पडणे, बुरखा घालणे, अरबी भाषा शिकणे, मुलांची इस्लामी संस्कारात व वातावरणात एकत्र कुटुंबात वाढ करणे वगैरे त्यांना जाचक वाटू लागते. त्या पुन्हा आपल्या मूळ देशात व वातावरणात जाऊ पाहतात. मात्र कधी कधी आपल्या मुलांना मुस्लीम कुटुंबातच ठेवून जाणे त्यांना भाग पडते. मर्लिनला आपल्याबरोबर इंग्लंडला नेणे डोन्याला शक्य झाले तसे बहुसंख्य स्त्रियांना जमत नाही. मुलांपासून त्यांना दूर राहावे लागते. हे मुलांपासून दूर राहण्याचे दु:ख डोन्याला सहन करायला दुर्धर वाटते. अशी पाळी ज्या स्त्रियांवर येते त्यांना मदत करणे, त्यांची मुले त्यांना परत मिळवून देणे यासाठी चक्क मुले पळवणेही तिला मानवतावादी वाटते. कायद्याला न जुमानता किंवा कायदे धाब्यावर बसवूनच मायलेकरांची ताटातूट दूर करावी लागते. अपहृत मुलांचे त्यांच्या मातांशी पुनर्मीलन घडवून आणण्यासाठी डोन्या वाटेल तो धोका पत्करायला तयार असते आणि आपला जीव धोक्यात घालून, प्रसंगी न्यायदेवतेलाही साद घालून ती हे काम तडीस नेते. त्यामागची तळमळ आणि व्यूहरचना निश्चितच दाद देण्यासारखी असते. शेकडो ब्रिटिश महिलांच्या दृष्टीने डोन्याचे हे काम देवदूतासारखे पवित्र आहे. डोन्याला त्या बायका देवदूत मानतात.

संस्कारक्षम वयात मुलांना त्यांच्या मातांबरोबर राहण्याचा निर्विवाद हक्क आहे; मुलांच्या निकोप वाढीसाठी मुलांच्या या हक्काला डावलता कामा नये हा विचार डोन्याच्या सर्व कार्याला पायाभूत आहे.

ताटातूट झालेल्या मायलेकरांचे पुनर्मीलन घडवून आणण्याची अनोखी कल्पना

डोन्याला कशी सुचली?

त्यासाठी एक घटना कारणीभूत ठरली.

लंडनच्या क्वीन्सवे बस स्टॉपजवळ डोन्या आपल्या चार मुलांसह बसची प्रतीक्षा करीत असताना एक स्त्री आपल्याकडे कुतूहलाने पण खिन्नपणे बघत आहे हे लक्षात आल्यावर डोन्या तिच्याशी संवाद साधते. लंडनच्या या भागात वेगवेगळ्या सांस्कृतिक व धार्मिक पार्श्वभूमी असणाऱ्या स्थलांतरितांची वस्ती आहे. ती गौरकाय महिला ही आपल्याप्रमाणेच मुसलमान धर्म स्वीकारलेली आणि मनाने खचलेली आहे हेही तिला जाणवते. मेरी हे तिचे नाव. ती आपली आपली कहाणी सांगते. सहा वर्षांची लैला नावाची मुलगी असून तिला सहा महिन्यांपूर्वी तिचे वडील लिबियाला घेऊन गेले, तेही मेरीला कसलीची पूर्वसूचना न देता, शाळेतून परस्पर. दंतवैद्याची अपॉइंटमेंट आहे असे वर्गशिक्षिकेला सांगून. मेरीने लिबियातील नवऱ्याच्या कुटुंबीयांना फोन केला तर तिला सांगण्यात आले, ''विसरून जा आता लैलाला. यापुढे तिची देखभाल आम्हीच करणार आहोत.'' नंतर लिबियातल्या कुटुंबाने घरही बदलले. त्यामुळे फोनही लागेना.

डोन्याच्या मनात मेरीची ही हकीकत ऐकल्यावर एक प्रश्न उभा राहतो.

''मेरीचा नवरा एवढ्या सहजतेने तिच्या मुलीचे अपहरण करू शकतो तर मेरी आपल्या मुलीला लिबियातून परत का आणू शकत नाही?''

हा प्रश्न मनात येताच डोन्या मेरीला म्हणते, ''मी लिबियाला जाऊन तुझ्या मुलीला परत आणीन.''

डोन्याचे हे वाक्य ऐकताच मेरीला खरे तर आनंद वाटायला हवा होता. पण ती इतकी भयभीत, हताश आणि विमनस्क होती की असे काही करणे शक्य आहे हेच तिच्या डोक्यात शिरत नव्हते. लिबियाला जाण्याची उत्सुकता तिच्यात नव्हती, तिच्याकडे लिबियाला जाण्याएवढे पैसे होते, पण तेथे जास्त दिवस राहण्यासाठी लागणारे पैसे नव्हते. तशात तिला तेथील भाषा अजिबात येत नव्हती. डोन्याला मात्र अरेबिक भाषा येत होती.

डोन्याने ही कल्पना आपल्या नवऱ्याला सांगितली. तेव्हा त्याने संभाव्य अडचणींचा पाढाच वाचला.

मुलीबरोबर कोणीतरी असणार तर तिला स्वतंत्रपणे कसे गाठणार? तिला विमानाने किंवा अन्य मार्गाने कसे नेणार? पोलिसांकडे तक्रार केली गेली तर काय करणार? पासपोर्टचे काय? तुम्हाला मुलीसकट पकडले गेले तर? तुम्हाला मुलीच्या अपहरणासाठी तुरुंगात डांबले तर आपल्या मुलांकडे कोण बघणार? या कामाला किती दिवस लागणार?

या प्रत्येक गोष्टीची शक्यता गृहीत धरून मार्ग काढावा लागणार हे डोन्याच्या लक्षात येते. पण लैलाला पळवून लिबियातून लंडनला आणायचेच हा डोन्याचा

निर्धार पक्का असतो. सुदैवाने मेरीही तिला या प्रयत्नात साथ द्यायला तयार होते.

त्या दोघी लिबियाला विमानाने जातात. राजधानी त्रिपोलीत उतरतात. हॉटेलात मुक्काम करतात. मेरी आपल्या बहिणीच्या पासपोर्टवर प्रवास करते. बहिणीच्या पासपोर्टमध्ये बहिणीच्या मुलीचेही नाव असते. मुलीचे वय लैलाएवढेच असते. त्यामुळे लैलाला परत विमानाने आणणे शक्य होणार असते.

लैलाच्या घरावर मेरी आणि डोन्या पाळत ठेवतात. सकाळी लैला शाळेच्या बसने जाते. तेव्हा घराशी काही करण्याऐवजी शाळेत बस पोचल्यावर लैलाला बाजूला घेऊन पुढे काय करायचे ते ठरवावे असा बेत ठरतो.

तिसऱ्या दिवशी सकाळी शाळेच्या बसमधून उतरलेल्या लैलाला मेरी भेटते. मिठीत घेते. हॉटेलवर जाऊन विमानतळ गाठतात. पण विमान चार तास लेट. शेवटी टॅक्सीनेच अल्जीरिया (१७ तास) आणि तेथून मोरोक्को (१५ तास) असा प्रवास करून मोरोक्कोहून विमानाने लंडन असा प्रवास पार पडतो. लंडन विमानतळावरून ते सहीसलामत बाहेर पडतात.

मेरी आणि लैला नाव बदलून अज्ञातवासात जातात. लैलाचा बाप शोधायला आला तर त्याला लैला सापडू नये म्हणून.

डोन्याला आपला हा पहिलाच प्रयत्न यशस्वी झाल्याने उत्साह वाटतो. तिची उमेद वाढते. मात्यापित्याच्या रस्सीखेचीत स्त्रियांच्या बाजूने लढणारी एक चॅम्पियन म्हणून डोन्याची प्रतिमा समाजमनात स्थिर होते. इतर समाजसेवी संस्था कायद्याच्या कक्षेत राहून करू शकत नव्हत्या, ते डोन्या करून दाखवत होती. हे काम डोन्या विनामूल्य करत होती हेही लोकांना ठाऊक होते. इतर संस्थांकडे जाऊन काही फायदा न झालेल्या, निराश झालेल्या बायका डोन्याकडे येऊ लागल्या. पण ती आपली प्रसिद्धी टाळत असे. आपले नाव वा फोन नंबर फारसा कोणाला सांगत नसे. आपली सुरक्षितता आणि खाजगीपणा अबाधित राहावा यासाठी दक्षता घेत असे... तरी डझनावारी केसेस तिच्याकडे येत असत.

मुलांना आईकडून पळवून नेणाऱ्या बापांच्या कार्यपद्धतीबाबतचे काही ठोकताळे डोन्याला अनुभवाने ठरवता आले.

आईवर अवलंबून असलेल्या मुलांना, पाच वर्षाच्या आतील मुलांना पळवण्याचा फारसा प्रयत्न होत नसे. रडणारे मूल किंवा दूध पिणारे मूल पळवणे गैरसोयीचे ठरे. कारण त्यांची खेळणी, बेबीफूड - सर्व बरोबर घेणे भाग असते.

मुलांना अशा प्रकारे पळवून नेण्याचे प्रकार घडण्याआधी काही संकेतही मिळतात. उदाहरणार्थ, पासपोर्टची चौकशी, मुलाच्या आवडत्या गोष्टींची लपवाछपवी, बायकोवर अकारण दोषारोप किंवा अकारण गोडीगुलाबीचा वर्षाव. इ.

सात, आठ, नऊ या वयोगटातील मुलांना पळवणे सोपे असे. ही मुले खाण्यापिण्याच्या बाबतीत आत्मनिर्भर, एकटी राहू शकत. वडिलांबरोबर ती विश्वासाने

मागे जाण्यास तयार असत.

मोरोक्कोन नवऱ्याने आपल्या मुलीचे अपहरण केल्याची तक्रार घेऊन आलेल्या डेबीची केस फार गुंतागुंतीची होती. तिला आपल्या नवऱ्याच्या कुटुंबाचे नाव व घर यांचा नेमका ठावठिकाणा ठाऊक नव्हता.

एका मैत्रिणीचा तिला फोन येतो, समुद्रकाठच्या अमुक अमुक रिझॉर्टवर एका कुटुंबाबरोबर तुझी मुलगी अमीना दिसली.

तेव्हा डोन्या डेबीला घेऊन मोरोक्कोच्या त्या रिझॉर्टवर पोचते.

डोन्या त्या कुटुंबातील जरा वयस्क बाईशी गप्पा मारू लागते. ती अमीनाला कौतुकाने बघत असते.

''सुंदर आहे ही छोकरी! कोण आहे ही?''

''माझी नात. तिला समुद्र खूप आवडतो.''

''तुम्ही याच गावात राहता का?''

''नाही. सुटीसाठी आलोय. परवा परत जाणार.''

अमिना आजीला विचारते, ''मग उद्या दिवसभर इथे खेळायला देशील ना?'' आजी होकार देते.

...डोन्या त्यानुसार दुसऱ्याच दिवशी संधी साधून समुद्रकिनाऱ्यावरून अमिनाला पळवण्याची योजना आखते. वाळूचा किल्ला बनवणाऱ्या अमिनाला एकटीला डेबी गाठते. तिला कल्पना देते आणि तिला उचलून घेऊन डेबी किनाऱ्यावरच्या हॉटेलातल्या आपल्या खोली घेऊन जाते. तेथून टॅक्सीने विमानतळ... चेक इन काउंटरवरचे सोपस्कार पूर्ण करून विमानात सर्वजण स्थानापन्न होतात. अमिना हवाई सुंदरीशी आनंदाने गप्पा मारते. डेबीच्या चेहऱ्यावर मातृसुलभ अभिमानाने सुटकेचं स्मितहास्य झळकते. डोन्याच्या धमन्यांतून उत्तेजक ॲड्रेनलिन दौडू लागते.

तिची दुसरी सुटका मोहीम यशस्वी झालेली असते.

...तिसऱ्या केसमध्ये कैरोमधून एका मुलाला सोडवायचे होते. पण त्या बाईजवळ एकटीच्या विमान प्रवासापुरते पैसे होते. डोन्या स्वखर्चाने कैरोला जाऊन मुलाचा छडा लावते. मुलगा तेथे आनंदात असतो. वडील, आजी त्याची चांगली काळजी घेत असतात. आईने लंडनमध्ये मुलाबद्दल सांगितलेली त्याचा छळ होत असल्याची माहिती चुकीची होती हे डोन्याच्या लक्षात येते. मुलगा बिलकुल दु:खी नसतो. तो डोन्याला सांगतो, ''मला इथेच आवडते. लंडनला आईजवळ राहायला नको वाटते.''

डोन्या त्या बाईला स्पष्टच सांगते, ''मी मुलाला परत आणणार नाही. त्या मुलाला त्याच्या इच्छेविरुद्ध लंडनला आणणं मला योग्य वाटत नाही.'' ती बाई डोन्यावर फसवणुकीचा आरोप करते. तेव्हा डोन्या तिने दिलेली भाड्याची रक्कम परत करते.

प्रिन्सेस डायनाबरोबर ज्याचा करुण अंत झाला तो दोडी, त्याच्याबद्दल माध्यमात

सतत टीका होत असे. त्याचे वडील मोहम्मद-अल-फायेद हे अशा गरजू स्त्रियांना मुले परत मिळवण्यासाठी डोन्याला आर्थिक मदत करायला नेहमी तत्पर असत. डोन्याच्या या कामाचे महत्त्व त्यांना पटलेले होते.

एका केसमध्ये इजिप्शियन नवऱ्याने नेलेली दोन मुले परत हवी होती. तिचा नवरा आणि सासरा त्या मुलांना परत पाठवायला तयार होता. पण तिचे म्हणणे, नवऱ्याने इंग्लंडचा व्हिसा मिळवून मुलांबरोबर लंडनला यावे. नवरा लंडनमध्ये तिच्याबरोबर राहणार असेल तरच तिला मुलांना लंडनला नेण्यात रस होता. नवऱ्याला बरोबर घेतल्याशिवाय ती इजिप्त सोडायला तयार नव्हती. डोन्याला मग एकटीलाच परतावे लागते.

...खुद्द आपल्या नवऱ्याच्या बहिणीच्या युसुफ नावाच्या मुलालाही खोट्या पासपोर्टवर इराकमधून बाहेर काढण्याचा अवघड आणि धोक्याचा मार्गही डोन्या पत्करते. त्या मुलाला कॅन्सरचा पेशंट दाखवून, त्याचे केस काढून विमानतळावरच्या तपासण्यातून त्याला सहीसलामत नेण्यातली व्यूहरचना डोन्याची कसोटी पाहणारीच होती.

...डोन्याचे हे काम, टीव्हीसारखे माध्यमे यांच्यापर्यंत पोचत होते. स्वत:चे नाव गुप्त ठेवण्याची इच्छा असली तरी आपल्या कामाची माहिती लोकांना व्हावी, अडचणीतल्या स्त्रियांना आणि मुलांना मदत व्हावी ही भावनाही प्रबळ होती. स्वत:च्या मुलांचा ताबा मिळवणे हा प्रत्येक आईचा हक्क आहे; त्यासाठी कायदेशीर मार्ग निष्प्रभ व कुचकामी ठरत असेल तर डोन्याच्या मार्गाने स्वत:च्या हक्कासाठी लढा देऊन यश मिळण्याची शक्यता आहे असा संदेश अपहृत मुलांच्या आयांपर्यंत पोचणे गरजेचे होते. त्याचबरोबर मिश्र विवाह करणाऱ्या स्त्रियांना सावध करण्यावरही डोन्याचा कटाक्ष होता. त्यामुळे नाव गुलदस्त्यात ठेवूनही डी नावाने टीव्हीवरच्या मुलाखतीच्या कार्यक्रमात डोन्या भाग घेऊ लागली.

इ. स. २००२ मध्ये जगभर प्रसारित झालेल्या कव्हर स्टोरीने डोन्याला एकदम प्रकाशझोतात आणले.

सारा फॉदरिंगहॅम या बाईने तिला फोन करून सांगितले, ''मी एकेकाळी हवाईसुंदरी होते. दुबईच्या एका पुरुषापासून मला मूल झालेले होते. ते मूल परत मिळवण्यासाठी मी इंग्लंड, नेदरलँडस, दक्षिण अमेरिकेतील एक देश यातील तीन संस्थांशी संपर्क साधला आहे. त्यांनी मला चोवीस हजार पौंड लागतील, पण यशाची गॅरंटी देता येणार नाही, असे स्पष्ट केले होते.'' डोन्याने तिला दिलासा देत म्हटले, ''मला फक्त माझ्या खर्चाचे पैसे द्यावे लागतील. माझा उदरनिर्वाह यावर अवलंबून नाही.'' सारा मुलाचे नाव सांगते. तारिक, वय ११, वडील रशीद अल हबतूर, दुबईतील अतिश्रीमंत कुटुंब. तारिकचा जन्म इंग्लंडमधला. त्याचे बालपण इंग्लंडमध्ये गेलेले. त्याला आईपासून दूर ठेवणे योग्य नाही. रशीद अल हबतूरने तिला दुबईत

येऊन राहा, तिचा सर्व खर्च करू असे कळवले. त्याप्रमाणे सारा दुबईला गेली. रशीदने तिला घर घेऊन दिले. पण रशीदला मात्र भेटू दिले नाही. तेव्हा ती इंग्लंडला एकटीच परतली. इंग्लंडच्या कोर्टात तिने खटला भरला. पण याचा निर्णय दुबईच्या कोर्टानेच करावा असा निकाल देण्यात आला.

हे प्रकरण डोन्याने हाती घेतले.

तारिकला पळवण्याची योजना आखली. ती अमलात आणली. तारिक आणि सारा यांच्यात भावनिक नाते घट्ट दिसत नाही, हे डोन्याच्या लक्षात आले. साराची केस घेण्यात आपण घाई केली अशी चुटपुट डोन्याला लागून राहते.

अबुधाबी दुबईच्या सरकारकडून त्यांना अटक होते.

आपण एक भयानक चूक केलीय अशी खात्री डोन्याची पटते.

डोन्याला तुरुंगातील कोठडीत डांबले जाते. त्यांचे पासपोर्ट जप्त केले जातात.

वेगवेगळ्या देशातील स्त्रिया तेथे तुरुंगात असतात. वेश्या, स्मगलर, चोर.

ब्रिटिश एम्बॅसीच्या वतीने सुझॉन तिच्या भेटीला येते.

मानवाधिकार हक्क समितीचे प्रमुख त्यांना भेटतात.

पोलीस प्रॉसिक्युटर त्यांना जामीनावर सोडायची तयारी दाखवतो.

टीव्हीवर आणि वृत्तपत्रातून या प्रकरणाला प्रसिद्धी मिळते.

शेक-अल-मकतूल हे दुबईचे शक्तिशाली राज्यकर्ते.

त्यांच्याकडे मदतीची याचना करणारे पत्र जाते.

ते पत्र समक्ष त्यांनाच देण्याची संधी मिळते.

पाच मिनिटात डोन्या व सारा यांचे पासपोर्ट परत मिळतात.

साराच्या मुलाचा पासपोर्ट अल-हबतूर नावाने मिळतो. फॉदरिंगहॅम या नावाने नाही.

लगेच विमानाची तिकिटे मिळवून लंडनकडे प्रयाण होते.

ब्रिटिशमाध्यमे डोन्याचे नाव उघड करतात. आता आपली खरी आयडेंटिटी लपवण्याचे कारण उरलेले नाही असे डोन्याला वाटते. आपल्याकडे मदतीसाठी येणाऱ्या महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी आता नवे मार्ग शोधायला हवेत हे तिला उमगते. वेगवेगळ्या राष्ट्रीयत्वाच्या कुटुंबात मुलाच्या ताब्यावरून टोकाचा वाद निर्माण होतो तेव्हा त्या आईपासून मुलाची ताटातूट होऊ नये म्हणून प्रयत्न करणे आवश्यकच असते.

डोन्याने आपले आत्मचरित्र लिहावे अशी सूचना अनेकजण करतात. त्यासाठी अँड्र्यू क्रॉफ्टस या घोस्ट रायटरची मदत घेण्यात येते. कुटुंबातील दुरावा सांधण्याचे काम चालू ठेवण्याचे बळ तिला मिळते.

'दि हिरॉइन ऑफ द डेझर्ट' हे तिचे वर्णन सार्थ ठरते.

किंमत : १५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.

पुरस्कार

*** पंजाबी कवी सुरजित पटार यांना सरस्वती सन्मान**

साहित्यक्षेत्रात प्रतिष्ठेचा मानला जाणारा सरस्वती सन्मान पुरस्कार यंदा पंजाबी कवी सुरजित पटार यांना 'लफजन दि दर्गाह' या कवितासंग्रहासाठी जाहीर झाला आहे. पाच लाखांची थैली, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. के. के. बिर्ला फाऊंडेशनतर्फे हा पुरस्कार दिला जातो. पटार हे ६५ वर्षांचे असून २००९ च्या पुरस्कारासाठी त्यांची ही निवड करण्यात आली आहे. निवड समितीत माजी सरन्यायाधीश जी. बी. पटनायक यांच्यासह तेराजणांचा समावेश होता. लफजन दि दरगाह हा पंजाबी कवितांचा संग्रह आहे. २००३ मध्ये तो प्रकाशित झाला होता.

१९९१ मध्ये पहिला सरस्वती सन्मान हा कवी हरिवंशराय बच्चन यांना देण्यात आला होता.

मराठी नाटककार विजय तेंडुलकर, मल्याळी कवयित्री बालमणियम्मा, बंगाली कादंबरीकार सुनील गंगोपाध्याय, उर्दू समीक्षक शमसूर रहमान फारुखी, संस्कृत कवी जी. सी. पांडे, ओरिया कवी रमाकांत रथ यांचा या पुरस्काराने आजवर सन्मान करण्यात आला आहे. पटार हे पंजाबीतील एक नामांकित कवी असून त्यांच्यावर गुरबानी व सुफी कवितांचा प्रभाव आहे.

*** सुलोचना यांना राजा परांजपे सन्मान**

राजा परांजपे जन्मशताब्दी समारोप सोहळ्याचे उद्घाटन १४ एप्रिल रोजी प्रसिद्ध अभिनेते सचिन यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ अभिनेते रमेश देव आणि ज्येष्ठ अभिनेत्री सीमा देव या वेळी उपस्थित होते. यानिमित्ताने होणाऱ्या 'मला भावलेले राजा परांजपे' या गप्पांच्या कार्यक्रमात ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त, मधुकर पाठक, ज्येष्ठ कॅमेरामन बाळ बापट, ज्येष्ठ अभिनेत्री चित्रा आणि रेखा सहभागी झाले होते.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते सुलोचना यांना 'राजा परांजपे सन्मान' प्रदान करण्यात आला. मानपत्र, शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

या वेळी सोनाली कुलकर्णी, सलील कुलकर्णी आणि परेश मोकाशी यांना

तरुणाई सन्मान प्रदान करण्यात आला. स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे सन्मानाचे स्वरूप होते.

राजाभाऊंच्या अभिनय, दिग्दर्शन, लेखनशैलीचे दर्शन घडविणारा चित्रपट महोत्सव राष्ट्रीय संग्रहालयाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. 'हा माझा मार्ग एकला', 'ऊनपाऊस', 'पडछाया', 'पाठलाग', 'लाखाची गोष्टी', 'सुवासिनी', 'जगाच्या पाठीवर' आणि 'पेडगावचे शहाणे' हे चित्रपट दाखविण्यात आले. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाने १५ ते १९ एप्रिल या कालावधीत राजाभाऊंची छायाचित्रे आणि चित्रपटांच्या पोस्टरचे प्रदर्शन भरविण्यात आले.

*** हॉटेल व्हिक्टर पॅलेस पुरस्कार**

हॉटेल व्हिक्टर पॅलेस, कोल्हापूर यांच्यातर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त प्रत्येक वर्षी सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो. त्याप्रमाणे यावर्षीचा म्हणजे २०१० सालचा हॉटेल व्हिक्टर पॅलेस पुरस्कार आशा आपराद यांना देण्यात आला.

'हॉटेल व्हिक्टर पॅलेस पुरस्कार' स्वीकारताना आशा आपराद

*** 'बहुरूपी'ला आठ पुरस्कार**

सदाबहार अभिनेते प्रशांत दामले यांच्या 'बहुरूपी'ला राज्य नाट्य स्पर्धेमध्ये पहिल्या पुरस्कारासह आठ पुरस्कार मिळाले आहेत. त्यानिमित्त संवाद, पुणे आणि अन्य संस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. नाटकाचे दिग्दर्शक मंगेश कदम, सुनील महाजन, बालगंधर्व रंगमंदिराचे व्यवस्थापक अमर परदेशी आणि समीर हंपी हे या वेळी उपस्थित होते. सातत्याने नव्याचा ध्यास घेणारे दामले म्हणाले, ''अभिनयाचे प्रशिक्षण देणारी अकादमी मी सुरू करणार आहे. तिचे स्वरूप

वेगळे असेल. एखाद्या संस्थेत पन्नास जणांपैकी पाच जण उत्कृष्ट अभिनय करतात. पण उरलेल्या ४५ जणांना चांगला अभिनय यावा यावर माझा भर असेल. या अकादमीची पहिली शाखा पुण्यात काढणार असून नंतर अन्य ठिकाणी तिचा विस्तार करण्यात येईल.''

'बहुरूपी'च्या यशाबाबत ते म्हणाले, ''हे सांघिक यश आहे. मी जेव्हा त्याची संहिता वाचली, तेव्हाच त्यामध्ये एक 'सच्चाई' आहे, असे माझ्या लक्षात आले. मी आजवर 'कॉमेडी' भूमिका केल्या. पण ही भूमिका वेगळी आहे. बहुरूपी ही आपली पारंपरिक पण दुर्लक्षित कला आहे. या दुहेरी भूमिकेपैकी एक प्रशांत दामले नावाचे पात्र हे आजकालच्या अभिनेत्यांचे प्रतिनिधित्व करते, तर दुसरे बहुरूपी हे कलेला वाहून घेतलेले 'इनोसंट' पात्र आहे. या दोघांची तुलना करण्यात आली आहे. कलाकारास खुलायचे असेल, तर त्याने त्या भूमिकेसाठी वेळ दिलाच पाहिजे. पण सध्या 'बाकीचे पळतात म्हणून मलाही पळावे लागते,' अशी परिस्थिती आहे. त्यात गैर नाही, पण नाटक करायचे असेल तर इमानदारीनेच केले पाहिजे. मी बहुरूपीसाठी ५० दिवस तालमी केल्या. सध्या धावपळीच्या जीवनात कलाकार इतका वेळ देऊ शकतील का, हा प्रश्न आहे.''

*** ज्येष्ठ नाटककार शं. ना. नवरे यांना वसंतराव कानेटकर पुरस्कार**

वसंतराव कानेटकर हे मराठी नाट्यसृष्टीतील राजाधिराज होते. त्यांच्या हजारो प्रेक्षक वाचकांतील मी एक आहे. अशा व्यक्तीच्या नावे पुरस्कार मिळणे हे माझे भाग्य आहे अशी भावना ज्येष्ठ नाटककार शं. ना. नवरे यांनी व्यक्त केली.

रंगतसंगत प्रतिष्ठान व साहिल फाउंडेशनतर्फे देण्यात येणाऱ्या वसंतराव कानेटकर स्मृती पुरस्काराने श्री. नवरे यांना ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते गौरविण्यात आले. पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. वि. भा. देशपांडे, रंगतसंगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रमोद आडकर, अंजली कानेटकर, साहिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुराधा फडणीस हे सर्व या वेळी उपस्थित होते.

शन्ना नवरे म्हणाले, ''सर्व साहित्य प्रकारांत नाटक हा प्रकार जास्त आव्हानात्मक असतो. कारण त्यात प्रेक्षक, कलाकार यांना नाट्यनिर्मात्याला प्रत्यक्ष अनुभवावे लागते. वसंतरावांची नाटके पाहिल्यानंतर दुसरा दिवस त्याच्या चर्चेत जायचा. असे घराघरात नाटक पोचविणारे नाटककार फार थोडे आहेत.''

''कानेटकरांच्या 'वेड्याचं घर उन्हात' या कलाकृतीने नाटकाची परिभाषा बदलून टाकली. या नाटकाने मला यश, प्रसिद्धी व वसंतराव यांच्यासारखा मित्र मिळाला. ते माझ्या आयुष्यात आले नसते तर मी आज जो काही आहे, त्याच्या शतांशही नसतो,'' अशी कृतज्ञपूर्व भावना डॉ. लागू यांनी व्यक्त केली. स्वाती

महाळंक यांनी सूत्रसंचालन केले.

*** डॉ. व. सी. ताम्हनकर यांना 'निसर्गसेवक' पुरस्कार**

''ग्रामीण भागात सकारात्मक दृष्टिकोन असून त्यांच्याकडून पाण्याच्या व्यवस्थापनाबाबत राबविण्यात येणाऱ्या संघटित प्रयत्नांना यश मिळते आहे. पण खरे अपयश आहे ते नागरी जीवनामध्ये, जलनियोजनासाठी स्वतंत्र निकष आखण्याची गरज असून नागरी जीवनातील यांत्रिकीकरणाचा फेरविचार केला पाहिजे,'' असे मत जलतज्ज्ञ डॉ. माधव चितळे यांनी व्यक्त केले.

निसर्गसेवक संस्थेतर्फे डॉ. चितळे यांच्या हस्ते ज्ञानप्रबोधिनी हराळी केंद्राचे प्रमुख डॉ. व. सी. ताम्हनकर यांना 'निसर्गसेवक' पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. ताम्हनकर यांनी सोलापूरजवळील हराळी या गावी साठ एकर क्षेत्र पर्यावरणपूरक उपक्रमांतून फुलवले आहे. या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

महाराष्ट्रातील विविध गावांमध्ये जलनियोजनाबाबत झालेल्या यशस्वी उपक्रमांची माहिती चितळे यांनी दिली. ते म्हणाले, ''पाणी ही देणगी आहे, पण याच पाण्याची चणचण हा या पुढील कळीचा मुद्दा राहणार आहे. यासाठी विविध भागात सुरू असलेल्या जलनियोजनाच्या उपक्रमांचे सार्वत्रिकीकरण करण्याची गरज आहे.''

निसर्गाची लेकरे वाढविण्याचे काम निसर्गसेवक संस्था करते आहे, असे गौरवोद्‌गार काढून ताम्हनकर म्हणाले, ''आपण मनापासून काम करीत राहिले की समाज आणि पैसा स्वत:हून आपल्याकडे चालत येतात.''

*** सुलोचना चव्हाण यांना 'माणिक वर्मा पुरस्कार'**

पुणे भारत गायन समाज, तसेच वर्मा प्रतिष्ठानतर्फे 'श्रीमती माणिक वर्मा पुरस्कार' समाजाचे संस्थापक देवगंधर्व पं. भास्करबुवा बखले यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रदान करण्यात आला. दहा हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ज्येष्ठ व्हायोलिन पं. प्रभाकर जोग, राणी वर्मा, समाजाचे अध्यक्ष सुधाकर जोशी या प्रसंगी उपस्थित होते.

चव्हाण म्हणाल्या, ''माणिकताईंच्या नावाचा पुरस्कार मिळेल असे स्वप्नातही वाटले नव्हते. पुण्यातच पहिला गायनाचा कार्यक्रम झाला आणि माझा प्रवास सुरू झाला. आज माझ्या वयाच्या ७८व्या वर्षीही रसिक मला विसरलेले नाहीत. त्यांचे हे ऋण कधीच फिटणार नाही, त्यामुळे कलाकारांची कदर करणारा रसिकमान्यतेचा पुरस्कारच माझ्यासाठी सर्वांत मोठा आहे.''

रसिकांच्या आग्रहाखातर 'फड सांभाळ तुऱ्याला गं आला' या लावणीच्या ओळी चव्हाण यांनी या प्रसंगी सादर केल्या.

पूर्वार्धात 'पद्मश्री श्रीमती माणिक वर्मा : बहुस्पशी गायकी' कार्यक्रम गायिका शैला दातार व त्यांच्या शिष्यांनी सादर केला. राजीव परांजपे (हार्मोनियम), समीर पुणतांबेकर (तबला), दर्शना जोगा (सिंथेसायझर), राजेंद्र साळुंके (तालवाद्य) यांनी त्यांना साथसंगत केली. विनया देसाई यांनी निवेदन केले.

*** डॉ. मनचंदा यांना साहित्य पुरस्कार**

पुणे विद्यापीठाच्या संत नामदेव अध्यासनाच्या प्रमुख व संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. वीणा मनचंदा यांना राज्य हिंदी साहित्य अकादमीचा छत्रपती शिवाजी राष्ट्रीय एकता पुरस्कार जाहीर झाला आहे. संत साहित्याच्या प्रसारातून एकात्मता साधण्याच्या कार्यात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांची निवड करण्यात आली आहे. ५१ हजार रुपये, मानपत्र, शाल असे त्याचे स्वरूप आहे. गेली ३५ वर्षे हिंदीचा प्रसार-प्रचार करण्याबरोबरच टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयात हिंदी विषयाच्या विभागप्रमुख म्हणून त्या कार्यरत होत्या. त्याचप्रमाणे हिंदी पाठ्यपुस्तके, त्यांचे भाषांतर, समीक्षण आणि गुणवत्ता परीक्षणाचे कार्य त्यांनी केले आहे.

*** चंद्रशेखर गाडगीळ यांना जीवनगौरव पुरस्कार**

कोणत्याही कलेच्या माध्यमातून विचार आणि प्रश्न मांडले जातात, म्हणून त्या कला टिकवण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवा, असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले.

शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि श्री संतदर्शन मंडळ यांच्यातर्फे आयोजित सोहळ्यात ज्येष्ठ गायक चंद्रशेखर गाडगीळ यांना 'राम कदम जीवनगौरव' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष लक्ष्मीकांत खाबिया यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला ज्येष्ठ संगीत संयोजक इनॉक डॅनियल, अपर पोलीस आयुक्त धनंजय कमलाकर, श्री संतदर्शन मंडळाचे अध्यक्ष श्रीराम साठे, विजय कदम व श्यामला गायकवाड उपस्थित होत्या.

गाडगीळ म्हणाले, रामभाऊंबरोबर काम करतच मी बहरत गेलो. पुढे त्यांनी दिलेल्या गाण्यावरच मी जगलो आणि जगतोय. या माझ्या यशात कुटुंबाचा व मित्र परिवाराचा मोठा वाटा आहे. या वेळी डॅनियल आणि कमलाकर यांचेही भाषण झाले.

❐

वाचकांचा प्रतिसाद

संपादक सुनील मेहता

सप्रेम नमस्कार,

आपणाकडून मेहता मराठी ग्रंथजगत नेमाने मिळते. आपले मन:पूर्वक धन्यवाद. 'ग्रंथजगत' उत्कृष्ट पद्धतीने संपादित केले जाते. महाराष्ट्राच्या साहित्यवार्ता भरपूर वाचावयास मिळतात. लेख अभ्यासपूर्ण असतात. खूपच माहिती मिळते.

मन:पूर्वक अभिनंदन! संपादनाचे कौतुक!

शिरीष पै, मुंबई

श्री. अशोक पाध्ये यांना

स.न.वि.वि.

'एका सैतानी विषाणूची दहशत' (**द सटन बग**) हा अनुवाद वाचून संपवला. आपण अनेक अनुवाद केलेले आहेत. त्यात निपुण आहात. मला ब्लेड साठी 'पातं' आणि हॉर्नसाठी 'भोंगा' हे शब्द वाचल्यावर जुन्या ओळखीचा कोणी अचानक भेटावा तसा आनंद झाला. हे मराठी शब्द आता कुणाच्या ध्यानीही नसतील.

संजीव ठकार, पुणे ४११ ००२.

नमस्कार शोभनाताई,

आपण अनुवादित केलेलं **'पीस ऑफ केक'** हे पुस्तक वाचून कालच पूर्ण केलं. अप्रतिम!

अनुवाद वाचतोय असं वाटलंच नाही इतकी भाषा ओघवती.

आपल्या पुढील कामासाठी शुभेच्छा!

ज्योती गिरीश

प्रिय सौ. नीला चांदोरकर,

तू अनुवादित केलेले **'द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी'** हे पुस्तक वाचले.

आफ्रिकेतील बोटस्वानातील एका कृष्णवर्णीय महिलेची ही कथा.

कथा मूळ इंग्लिशमधून आहे पण वाचताना आपण भाषांतर वाचतो आहोत असं मुळीसुद्धा जाणवत नाही. मूळ भाषा नीट आत्मसात झाल्याशिवाय अनुवाद उत्तम उतरणार नाही. त्याबद्दल अभिनंदन! नायिकेचं नाव, गाव, प्रदेश, भौगोलिक, सामाजिक परिस्थिती आफ्रिकेतील असूनही भाषांतरात कुठेही बोजडपणा जाणवत नाही. काम फत्ते होणं, दूधखूळ्या समजणे, काळजीने मेंदूचा भुगा होणे असे शब्दप्रयोग सहजरीत्या येतात.

कोणत्याही देशात जा, स्त्रियांची परिस्थिती थोड्याफार फरकाने तीच. पण स्त्री जाग येऊन उठली की तिचे कर्तृत्व कसे नेत्रदीपक ठरते हे प्रेश्यसच्या कहाणीवरून कळून येते. आफ्रिकेतील खाण मजुरांची दु:खे, गोऱ्यांची अरेरावी पण त्यातही एखादा सहृदयी निघतो. प्रेश्यसचे आईविना वाढणे, वडिलांचे प्रेम, प्रेम-विवाह,लग्नबंधन त्रासदायक पण वडिलांचे सहाय्य. या सर्व घटना छान मांडली आहेत.

तुझ्या स्तुत्य उपक्रमाबद्दल अनेक शुभेच्छा.

कुसुमताई

आदरणीय मीरा सिरसमकर,

'नोबेल ललना' हे स्फूर्ती देणारे मूर्तिमंत असे आदर्श पुस्तक आहे. त्याहीपेक्षा पुस्तकातील शब्दरचना ही थेट हृदयाला स्पर्श करून स्फूर्ती देते. एक जगण्याची जिद्द, आयुष्यात काहीतरी करून दाखविण्याची प्रेरणा यातून मिळते. पुरस्कार प्राप्त स्त्रियांनी जी काही मेहनत घेतली त्याचे इतके सूक्ष्म अध्ययन तुम्ही केलेत, त्याचेच मला आश्चर्य वाटते. ह्या स्त्रियांना इतके जवळून पाहताना मला मी स्त्री असल्याचा अभिमान वाटतो. मला कथा-कादंबऱ्यांपेक्षाही वास्तववादी व सत्य घटनांवरील पुस्तके वाचायला फार आवडते. कल्पनेत रमत बसण्यापेक्षाही वास्तवाचा सामना करायला व वास्तव जाणून घ्यायला मला फार आवडते.

येणाऱ्या अनेक पिढ्यांना तुमच्या पुस्तकाचे वाचन करण्याचे भाग्य लाभो हीच देवा चरणी प्रार्थना करते.

जया साहेबराव वाघमारे
धामणगाव, जि. अमरावती ४४४ ७०९.

❐

श्रद्धांजली



*** 'ग्रंथ साहिब'चे भाषांतरकर्ते विनायक लिमये**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि 'श्रीगुरू ग्रंथ साहिब'चे भाषांतरकर्ते विनायक उर्फ भाऊ लिमये (वय ८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुलगे, दोन मुली असा परिवार आहे.

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'चे कार्यकर्ते म्हणून कार्यरत असणाऱ्या लिमये यांनी १९५० ते १९५३ या कालावधीत आसाम प्रांतामध्ये उल्लेखनीय कार्य केले. निवृत्तीनंतर त्यांनी कन्याकुमारी येथील 'विवेकानंद शिला स्मारका'साठी निधीसंकलन केले. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांनी 'सुखसागर सांस्कृतिक मंडळा'ची स्थापना केली. २००२ मध्ये स्वामी विवेकानंदांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त 'सर्व धर्म समादर परिषदे'चे आयोजन केले. 'श्रीगुरू ग्रंथ साहिब' हा शीख धर्मग्रंथ मराठी भाषकांना कळावा म्हणून त्याचा मराठी भावानुवाद करण्याचा संकल्प केला आणि शीख धर्माचे अभ्यासक सरदार तारासिंग गोरोवाडा यांच्या सहकार्याने सात खंडांमध्ये अनुवादित ग्रंथ तयार केला.

*** 'ज्येष्ठ रंगकर्मी मोहन वाघ**

सातत्याने पाच दशके मराठी रंगभूमीवर अवीट ठसा उमटवणारे नाट्य निर्माते, दिग्दर्शक, नेपथ्यकार मोहन वाघ (वय ७९) यांचे २४ मार्च रोजी निधन झाले.

नाट्यनिर्माता, नेपथ्यकार, प्रकाशयोजनाकार, दिग्दर्शक म्हणून रंगभूमीवर सतत नावीन्याचा वेध घेत राहणारे मोहन वाघ हे तितकेच श्रेष्ठ छायाचित्रकार आणि रंगरेखाकार म्हणूनही प्रसिद्ध होते. त्यांना स्वत:ला त्यांच्या रंगकर्मी म्हणून असलेल्या ओळखीपेक्षा त्यांची छायाचित्रकार म्हणून असलेली ओळख अधिक महत्वाची वाटत असे. वीस वर्षे त्यांनी वृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून काम केले. १९६७ मध्ये त्यांनी स्वत:ची 'चंद्रलेखा' ही नाट्यसंस्था स्थापन केली आणि रंगभूमीवर अनेक विक्रम करून दाखवले. ३१ डिसेंबर १९७० रोजी मध्यरात्रीनंतर २ वाजता 'गारंबीचा बापू' या नाटकाचा प्रयोग त्यांनी मुंबईच्या शिवाजी मंदिरात केला आणि तेव्हापासून दर ३१ डिसेंबरला मध्यरात्री नव्या नाटकांचा पहिला प्रयोग करण्याची त्यांनी प्रथाच पाडली. त्यांच्यातला 'नेपथ्यकार' विशाल दृष्टीचा होता. 'गगनभेदी'चा शुभारंभ

लंडनच्या गोल्डन लेन थिएटरमध्ये केला, तर १९८८ च्या ३१ डिसेंबरला एकाच दिवशी तीन नवीन नाटकांचे शुभारंभ केले. १९९१ मध्ये संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त त्यांनी एकाच वेळी नऊ नाटकांचे मुहूर्त लता मंगेशकर आणि सुनील गावसकर यांच्या हस्ते केले. १० डिसेंबर १९९८ ला पानिपतच्या रणांगणावर त्यांनी विश्वास पाटील यांच्या 'रणांगण' या नाटकाचा मुहूर्त केला. त्यांच्या 'ऑल द बेस्ट' या नाटकाने अनेक विक्रम केले. मराठी रंगभूमीला आणि चित्रसृष्टीला याच नाटकाने अनेक नवे कलाकार दिले.

*** प्रा. मं. वि. राजाध्यक्ष**

सूक्ष्म विश्लेषक बुद्धी आणि स्वभावातील मिश्कीलता अशी जोडप्रतिभा लाभलेले ज्येष्ठ लेखक व समीक्षक मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांचे १९ एप्रिल रोजी 'साहित्य सहवास' मध्ये राहत्या घरी निधन झाले. ते ९६ वर्षांचे होते. ज्येष्ठ कथालेखिका व समीक्षक विजया राजाध्यक्ष या त्यांच्या पत्नी होत.

म. विं.चा जन्म ५ जून १९१३ रोजी झाला. छबिलदास शाळा आणि एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये त्यांचे शिक्षण झाले.

राजाध्यक्ष यांनी आपल्या लेखनाची सुरुवात 'अभिरुची' मासिकातून केली. या मासिकात 'निषाद' या टोपणनावाने प्रसिद्ध झालेले 'वाद-संवाद' हे त्यांचे सदर खूप गाजले होते. 'पाच कवी'(१९४६) हे आधुनिक कवींच्या कवितांचे संपादन हे त्यांचे पहिले पुस्तक होय. या पुस्तकात त्यांनी केशवसुत, बालकवी, विनायक, गोविंदाग्रज, ना.वा. टिळक यांच्या काव्याचा आढावा घेतला होता. 'खर्डेघाशी'(१९६३), 'आकाशभाषिते'(१९६३), 'शालजोडी', 'पंचम'(१९८४), 'पाक्षिकी'(१९८६), ही त्यांची लघुनिबंधांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'शब्दयात्रा'(१९८६) आणि 'भाषाविवेक'(१९९७) ही पुस्तकेही गाजलेली आहेत. कुसुमावती देशपांडे यांच्या सहकार्याने लिहिलेला 'हिस्टरी ऑफ मराठी लिटरेचर' हा ग्रंथही अभ्यासकांसाठी विशेष महत्त्वाचा ठरला आहे.

❐

बालनगरी



सात कुमार गुप्तहेरांच्या चातुर्याची कमाल दाखविणाऱ्या उत्कंठावर्धक कादंबरिका

द सीक्रेट सेव्हन

एनिड ब्लायटन
अनु. प्रियंका कुलकर्णी

'द सीक्रेट सेव्हन' ही कादंबरिकांची मालिका एनिड ब्लायटनने १९४३ पासून लिहायला आरंभ केला. पुढील पंधरा वर्षात तिने या मालिकेत १४ कादंबरिकांची भर घातली.

प्राथमिक शाळेत शिकणारी पाच मुले आणि दोन मुली सिक्रेट सेव्हन क्लब स्थापन करतात, आणि गुप्तहेर म्हणून, डिटेक्टिव्ह म्हणून काम करण्याचे ठरवून अवतीभवती घडणाऱ्या रहस्यमय घटनांचा छडा लावतात. या क्लबसाठी एका टपरीत कार्यालय उभारतात. या टपरीत शिरण्यासाठी पासवर्ड लागतो. हा पासवर्ड दर आठवड्याला बदलण्यात येतो. एस एस क्लबच्या सदस्यत्वाचा बिल्ला प्रत्येकाला जवळ बाळगावा लागतो. या सातजणांच्या मदतीला स्कॅंपर हा गोल्डन स्पॅनियल कुत्रा असतो. तो गुन्हेगाराला पकडण्यासाठी सदैव तत्पर असतो आणि सांगितलेले काम चोख करतो.

या सात सदस्यांच्या क्लबचा पीटर हा नेता आहे.

एकूणच मुलांची चौकसबुद्धी, साहसीवृत्ती, बहुश्रुतपणा, हुशारी यांना चालना देणारी ही सिक्रेट सेव्हनची पराक्रम मालिका वाचनीय आहे.

एकूण १५ भाग प्रत्येकी किंमत ८०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज एकत्रित ४०रु.

विज्ञान नवलाई

डॉ. बाळ फोंडके

आजचे युग हे विज्ञानाचे आहे, माहिती तंत्रज्ञानाचे आहे, ज्ञानसाधनेचे आहे. एखादी नवी कल्पना किंवा एखादे नवे तंत्र जर हाती लागले तर दहा-वीस वर्षांत माणूस जगातला सर्वांत श्रीमंत माणूस होऊ शकतो. आपल्या त्या कल्पनेचा वा तंत्राचा सबंध जगभर चाललेला मुक्त संचार बघू शकतो. एका कल्पनेचे पेटंट मिळाले तर त्याद्वारे कोट्यवधीची कमाई होऊ शकते.

सारांश, ज्ञान, नवे ज्ञान, नवे संशोधन, नवी कल्पना यांना आज खरे महत्त्व आहे.

नवे ज्ञान होण्यासाठी, नवे काही शोधून काढण्यासाठी, नवे वर्गीकरण करण्यासाठी उपलब्ध ज्ञानाचीही व्यवस्थित कल्पना हवी.

म्हणजे सध्या आपल्या अध्ययन क्षेत्रातील एखाद्या विषयाबद्दल जे काही ज्ञान आहे, त्याची यथायोग्य कल्पना हवी. तरच नवीन काय करता येईल हे उमजू शकते.

त्यासाठी पुस्तकांची, सीडींची मदत होऊ शकते. सध्या त्यासाठी प्रकाशक, शिक्षणतज्ज्ञ, उत्तमोत्तम साधनेही निर्माण करीत आहेत.

ज्ञान मिळविणे हे आपले उद्दिष्ट हवे.

विज्ञानविषयक अशी प्राथमिक माहिती देणारा सहा पुस्तकांचा एक संच मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केला आहे.

डॉ. बाळ फोंडके यांनी या पुस्तकांचा मजकूर तयार केला आहे.

१. आपले पूर्वज (प्राचीन सजीव, डासनोसॉर, गोरिला)
२. प्राणिजगत (कृमी-कीटक, सर्पसृष्टी, देवमासे-शार्क)
३. पशूपक्षी (शिकारी पक्षी, रानटी पशू, समुद्रातील सस्तन प्राणी)
४. अंतराळ (विमाने, अंतराळ यान, अंतराळ वेध)
५. खगोल (आपली सौर मालिका, सौरमालिकेपलीकडे, रात्रीचे आकाश)
६. भूगोल (आपली पृथ्वी, अस्वस्थ पृथ्वी, जगाच्या पाठीवर)

अशी ही सहा विषयांवरची पुस्तके भरपूर चित्रे व छोटी छोटी टिपणे याद्वारे अजिबात कंटाळा येऊ नये अशा प्रकारे तयार केली गेली आहेत.

प्रत्येक पुस्तकात तीन पोटभाग असून ते प्रत्येकी १० पृष्ठांचे आहेत. या १० पृष्ठात ४०-५० बाबींची माहिती प्रश्नोत्तराच्या रूपात देण्यात आली आहे. त्याशिवाय खरं की खोटं, नवलच अशा चौकटीही दर पानाआड आहेत. त्यातून खूप माहिती सूत्ररूपाने मिळू शकते.

ही पुस्तके मुलांसाठी आहेत हे खरे आहे; परंतु पालकांनाही आपले विविध विषयांवरचे ज्ञान अजमावून बघता यईल. त्यासाठी आपल्या मुलांबरोबर बसून प्रश्नोत्तराच्या रूपात एकमेकांना या पुस्तकातील तपशील आत्मसात करता यईल. पाचवी पास पेक्षा आपण कमी नाही असा स्वतःलाच मग निर्वाळा देता येईल.

भरपूर चित्रे, आकृत्या पुस्तकात जागोजागी दिल्या आहेत. त्यामुळे शब्द आणि चित्र यांचीही आपल्या डोक्यात व्यवस्थित नोंद होईल. जनरल नॉलेजच्या दृष्टीने या पुस्तिकांची उपयुक्तता निर्विवाद पटल्याशिवाय राहणार नाही.

एकूण ६ भाग प्रत्येकी किंमत ३०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज एकत्रित ४०रु.

फ्रँकलिन कासवाच्या गमतीजमती

फ्रँकलिन एक किशोर नायक

पोलेत बूर्ज्वा अनु. मंजूषा आमडेकर

ससा आणि कासव ही 'इसापनीती' मधली गोष्ट सर्वांना माहीत असते. चपळ सशाला सावकाश धीम्या गतीने चालणारे कासव पळण्याच्या शर्यतीत हरवते. शर्यत जिंकते.

कासवालाच मध्यवर्ती पात्र बनवून त्याच्याविषयी कथा लिहिण्याची उदाहरणे फार थोडी आढळतात. तसा एक यशस्वी प्रयत्न झाला आहे.

पोलेत बूर्ज्वा या लेखिकेने कासवाला किशोर नायक बनवून बालकथामालिका निर्माण केली आहे. या कासवाला फ्रँकलिन असे नाव देऊन त्याला खेळकर, खोडकर मुलाप्रमाणे वेगवेगळ्या घटनांचा सामना करायला लावला आहे. हा फ्रँकलिन कासव कुठल्याही लहान मुलासारखा वागतो. कंटाळा करतो, दंगा करतो, मित्रांशी भांडतो, कधी कधी भाव खातो, कधी दादागिरी करतो. तो अंधाराला घाबरतो, आई घरी नसली की घरभर पसारा करतो. तो वेगवेगळ्या खेळात भाग घेतो. प्राणी पाळायचा प्रयत्न करतो. कधी रस्ता चुकतो. जंगलात हरवतो. तो बढाया मारतो. थापा मारतो. पण तो तसा प्रेमळ आहे. मित्रांना तो मदत करतो. अडीअडचणीत कोणाच्याही सहाय्याला धावतो. त्याच्या या स्वभावगुणांचे दर्शन घडवणाऱ्या गोष्टींची थोडथोडकी नव्हे तर नऊ पुस्तके मराठीत आली आहेत आणि आणखी येणार आहेत. मंजूषा आमडेकर यांनी मूळ इंग्रजी पुस्तकांचे मराठी भाषांतर केले आहे.

कासवाच्या या गोष्टी पोलेत बूर्ज्वा या लेखिकेने वीस वर्षांपूर्वी प्रथम

लिहिण्यास आरंभ केला. ब्रेन्डा क्लार्क यांनी ही पुस्तके रंगीत चित्रांनी सजवली. मराठीतही ही मूळ रंगीत चित्रेच वापरलेली आहेत.

पाठीवर कवचाचे (पुस्तकांचे) ओझे घेऊन जाणारा फ्रँकलिन बालवाचकांना आपल्या वर्गातीलच मुलगा वाटेल. हे चित्र बघितल्यावर हा मुलगा कासव आहे याचाच विसर पडण्याची शक्यता आहे. फ्रँकलिन कासवाला वेगवेगळ्या अवस्थात चितारण्यात ब्रेन्डा क्लार्क यांनी खूपच कल्पकता दाखवली आहे.

डोक्यावर कॅप, हातात बॉल आणि बॅट निघालेला फ्रँकलिन,

एप्रन घालून केक तयार करण्यासाठी लाटण्याने पीठ मळणारा फ्रँकलिन,

पाठीवरचे कवच दोरीला बांधून फरफटत नेणारा फ्रँकलिन,

आईच्या कुशीत घट्ट बिलगणारा फ्रँकलिन,

घरभर पसारा करणारा फ्रँकलिन,

कपाटातली पुस्तके चाळणारा फ्रँकलिन,

तलवार हातात घेऊन मोहिमेवर निघालेला फ्रँकलिन,

कापडी कुत्र्याला खाऊ घालणारा फ्रँकलिन,

फांदीला बांधलेल्या झोपाळ्यावर बसून झोके घेणारा फ्रँकलिन,

खिडकीतून बाहेर डोकावून बघणारा फ्रँकलिन,

खुर्ची-टेबलावर बसून दंतपरीला पत्र लिहिणारा फ्रँकलिन,

भेटवस्तू बघून छाती फुगवणारा फ्रँकलिन,

गोगलगायीला पाठीवर बसवून करवंदांच्या जाळीतून चाललेला फ्रँकलिन.

असा नानाविध उद्योग करणारा फ्रँकलिन कासव हा मिकी माऊस, टेडी बेअर यांच्याप्रमाणेच बालवाचकांना मित्र म्हणून आवडायला हरकत नाही.

त्याची ही चित्रमय पुस्तके नुसती बघत राहिले तरी मजा वाटेल.

एकूण १९ भाग प्रत्येकी किंमत ५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज एकत्रित ४०रु.

चित्र रंगवा



सुविचार

नवं काहीतरी शिकण्यासाठी मिळालेला वेळ म्हणजेच सुट्टी

मेहता पब्लिशिंग हाऊस

आमचे आकर्षक बालसाहित्य

चित्रमय रंगतदार कथा

चतुर बोकोबा आणि इतर कथा	वृषाली पटवर्धन	३०
नशीबवान शेखर आणि इतर कथा	वृषाली पटवर्धन	३०
लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा	वृषाली पटवर्धन	३०
सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा	चारुता पुराणिक	३०
हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या	चारुता पुराणिक	३०
लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या	चारुता पुराणिक	३०
सूर्याची चोरी आणि गोष्टी देशोदेशीच्या	चारुता पुराणिक	३०

(फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स पुरस्कार २००८)
('राजहंस प्रकाशन' पुरस्कार)
(अ.भा.म.प्रकाशक संघ-उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २००६-०७)

निद्राराणी आणि इतर कथा	विजया देशपांडे	३०
जादूचं खीरपात्र आणि इतर कथा	अरुंधती पंडित	३०
टिंबक टू आणि इतर कथा	मंजूषा आमडेकर	३०
गम्मत गोष्टी	मंजूषा आमडेकर	३०
धमाल गोष्टी	मंजूषा आमडेकर	५०
मजेदार लोककथा	मंजूषा आमडेकर	३०
आदर्श लोककथा	मंजूषा आमडेकर	३०
राजाचं गुपित आणि इतर कथा	मंजूषा आमडेकर	३०
ढुम ढुम ढुमाक ढुम आणि इतर कथा	मंजूषा आमडेकर	३०
सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी	मंजूषा आमडेकर	३०
ड्रॅगनचं घर आणि मजेदार गोष्टी	मंजूषा आमडेकर	३०
बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी	अर्चना ओक	३०
चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी	अर्चना ओक	३०
छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी	अर्चना ओक	३०
छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी	अर्चना ओक	३०
गंपू चिंपू आणि इतर कथा	उमा खरे	३०
मैत्रीचे मोल आणि इतर कथा	उमा खरे	३०
सिंड्रेला आणि इतर कथा	उमा खरे	३०
घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी	उमा खरे	३०

गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी	उमा खरे	३०
बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी	उज्ज्वला केळकर	३०
गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी	उज्ज्वला केळकर	३०
बंटू बसला ढगात आणि इतर कथा	राजीव तांबे	३०
बंटूचा टिकटिक मित्र आणि इतर कथा	राजीव तांबे	३०
घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी	निर्मला मोने	३०
अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी	निर्मला मोने	३०
खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी	निर्मला मोने	३०
जादूचं बटण आणि इतर गोष्टी	निर्मला मोने	३०
जादूचं रबर आणि इतर गोष्टी	निर्मला मोने	३०
जादूचं तळं आणि इतर गोष्टी	निर्मला मोने	३०
गोष्टी पानोपानी	ईशान पुणेकर	३०
गोष्टी मनोमनी	ईशान पुणेकर	३०
गोष्टी कानोकानी	ईशान पुणेकर	३०
जादूचा अंगरखा आणि मजेदार गोष्टी	संस्मिता गुप्ते	५०
पिनू-चिनूची चतुराई आणि मजेदार गोष्टी	संस्मिता गुप्ते	५०
पतंगाची करामत आणि मजेदार गोष्टी	संस्मिता गुप्ते	५०
चालणारे बूट आणि मजेदार गोष्टी	संस्मिता गुप्ते	५०
आजीनं सांगितलेल्या चातुर्यकथा		
पंचतंत्रातील बोधपर गोष्टी	अनिल किणीकर	२५
हितोपदेश : बोधप्रद कथा	मोहन वेल्हाळ	३०
हितोपदेश : मनोरंजक कथा	मोहन वेल्हाळ	३०
हितोपदेश : प्रेरक कथा	मोहन वेल्हाळ	३०
हितोपदेश : रोचक कथा	मोहन वेल्हाळ	३०
जातक कथा : मनोरंजक	निर्मला सारडा	३०
जातक कथा : प्रेरक	निर्मला सारडा	३०
जातक कथा : रोचक	निर्मला सारडा	३०
जातक कथा : शिक्षाप्रद	निर्मला सारडा	३०
शेखचिल्लीचे किस्से	निर्मला सारडा	२५
मन्नो	मंजूषा आमडेकर	२५
मोठ्यांच्या छोट्या गोष्टी	माधव मोर्डेकर	३०
रमज्या गमज्या आणि जम्मत गोष्टी	अरुंधती महाम्बरे	३०
ठकुबाई ठेंगे आणि जम्मत गोष्टी	अरुंधती महाम्बरे	३०

बुटुकबैंगण विसरभोळे आणि जम्मत गोष्टी	अरुंधती महाम्बरे	३०
फ्रँकलिन मालिका मूळ लेखिका : **पोलेत बूर्ज्वा**		
फ्रँकलिन आणि दंतपरी	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन थाप मारतो	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन आणि अंधारगुडुप	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिनची दादागिरी	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन हरवतो	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिनचा पसारा	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन आणि फुटबॉल स्पर्धा	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन आणि पाळीव प्राणी	मंजूषा आमडेकर	५०
चल, आटप लवकर, फ्रँकलिन	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन आणि हरवलेला कॅमेरा	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन शाळेत जातो	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिनचं पांघरूण	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन आणि सण	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिनचा वाईट दिवस	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन सायकल चालवतो	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिनचा नवा मित्र	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन आणि वादळी पाऊस	मंजूषा आमडेकर	५०
फ्रँकलिन आणि रात्रीची धमाल	मंजूषा आमडेकर	५०
शाळेच्या नाटकात फ्रँकलिन	मंजूषा आमडेकर	५०
तेनालीराम मालिका		
बुद्धिमान तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
जगावेगळा तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
चतुर तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
न्यायप्रिय तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
समयसूचक तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
लाडका तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
प्रसंगावधानी तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
निर्भय तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
राज्याचे भूषण तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
हजरजबाबी तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
हुशार तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०

विनोदवीर तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
मजेदार तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
परोपकारी तेनालीराम	मंजूषा आमडेकर	३०
बिरबल मालिका		
विनोदवीर बिरबल	निर्मला सारडा	३०
लाजवाब बिरबल	निर्मला सारडा	३०
बुद्धिमान बिरबल	निर्मला सारडा	३०
चतुर बिरबल	निर्मला सारडा	३०
ससोबा-हसोबा मालिका		
शेपटीवालं झाड आणि इतर कथा	राजीव तांबे	५०
ससुल्या आणि इतर कथा	राजीव तांबे	५०
शूर ससोबा आणि इतर कथा	राजीव तांबे	५०
चला चहा पिऊया आणि इतर कथा	राजीव तांबे	५०
छत्रीची जादू आणि इतर कथा	राजीव तांबे	३०
(महाराष्ट्र राज्य पुरस्कार २००८-०९)		
झॅकपॅक शोध आणि इतर कथा	राजीव तांबे	३०
गुरुशिष्य कथा		
कसोटी आणि इतर कथा	शरद दळवी	३०
सत्त्वपरीक्षा आणि इतर कथा	शरद दळवी	३०
जंगल कथा		
इमानी मित्र आणि इतर गोष्टी	शरद दळवी	३०
पंचरंगी खार आणि इतर गोष्टी	शरद दळवी	३०
जंगल जंमत मालिका		
जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी	वैशाली कार्लेकर	३०
फट्फजिती आणि जंमत गोष्टी	वैशाली कार्लेकर	३०
गाढवाचं गाणं आणि जंमत गोष्टी	निर्मला मोने	३०
सिंहाचं उड्डाण आणि जंमत गोष्टी	निर्मला मोने	३०
सोनेरी चोच आणि जंमत गोष्टी	निर्मला मोने	३०
पिंटू पेलिकन आणि जंमत गोष्टी	निर्मला मोने	३०
तल्लख मोती आणि जंमत गोष्टी	निर्मला मोने	३०
लालतोंडी चोर आणि जंमत गोष्टी	निर्मला मोने	३०
उंटाची मान आणि जंमत गोष्टी	निर्मला मोने	३०

बुम बुम बैल आणि जम्मत गोष्टी	अरुंधती महाम्बरे	५०
तीन छोटे मासे आणि जम्मत गोष्टी	अरुंधती महाम्बरे	५०
छोटुश्या बब्बडच्या गमतीदार गोष्टी		
चंपी मालीश आणि था..था..था!	राजीव तांबे	३०
दांडोबा राक्षस आणि गुळगुळीत मावशी	राजीव तांबे	३०
गुळाची ढेप आणि सरबत	राजीव तांबे	३०
सू सुटका आणि रंगीत डोंगर	राजीव तांबे	३०
बोधकथा		
महाकवि कालिदास आणि बोधकथा	शरद दळवी	३०
मोह आणि बोधकथा	शरद दळवी	३०
न्याय आणि बोधकथा	शरद दळवी	३०
चातुर्यकथा		
बुद्धिरामाचा न्याय आणि चातुर्यकथा	शरद दळवी	३०
प्रधानाची निवड आणि चातुर्यकथा	शरद दळवी	३०
विज्ञान नवलाई		
अंतराळ	डॉ. बाळ फोंडके	३०
आपले पूर्वज	डॉ. बाळ फोंडके	३०
भूगोल	डॉ. बाळ फोंडके	३०
खगोल	डॉ. बाळ फोंडके	३०
पशू-पक्षी	डॉ. बाळ फोंडके	३०
प्राणिजगत	डॉ. बाळ फोंडके	३०
कुमार साहित्य		
प्रल्हाद	संपादक : अनंत पै	२५
श्रीरामाची कथा	संपादक : अनंत पै	२५
कर्ण	संपादक : अनंत पै	२५
चाणक्य	संपादक : अनंत पै	२५
खरा मित्र आणि इतर गोष्टी	शरद दळवी	३०
एकमेका साह्य करु आणि इतर गोष्टी	शरद दळवी	३०
आजीचं घर आणि इतर गोष्टी	शरद दळवी	३०
पत्राचा प्रवास आणि इतर गोष्टी	शकुन्तला फडणीस	३०
पैज जिंकली छोट्यानं आणि इतर गोष्टी	शकुन्तला फडणीस	३०
आजीचा धडा आणि इतर गोष्टी	शकुन्तला फडणीस	३०

सीक्रेट सेव्हन मालिका मूळ लेखिका : **एनिड ब्लायटन**

द सीक्रेट सेव्हन	प्रियंका कुलकर्णी	८०
सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम	प्रियंका कुलकर्णी	८०
शाब्बास, सीक्रेट सेव्हन	प्रियंका कुलकर्णी	८०
रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन	प्रियंका कुलकर्णी	८०
आगे बढो, सीक्रेट सेव्हन	प्रियंका कुलकर्णी	८०
सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी	प्रियंका कुलकर्णी	८०
सीक्रेट सेव्हनची सरशी	प्रियंका कुलकर्णी	८०
सीक्रेट सेव्हन झिंदाबाद	प्रियंका कुलकर्णी	८०
सीक्रेट सेव्हन आणि रहस्य	प्रियंका कुलकर्णी	८०
सीक्रेट सेव्हन समोर कोडं	प्रियंका कुलकर्णी	८०
सीक्रेट सेव्हनची आतषबाजी	प्रियंका कुलकर्णी	८०
'गुणवान' सीक्रेट सेव्हन	प्रियंका कुलकर्णी	८०
सीक्रेट सेव्हनला धक्का	प्रियंका कुलकर्णी	८०
सावधान! सीक्रेट सेव्हन	प्रियंका कुलकर्णी	८०
सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत	प्रियंका कुलकर्णी	८०

युद्ध चित्रकथा

दहशतीचे बेट (इवो जिमाची लढाई)	अनु. प्रा. प्रसाद बर्वे	६०
साम्राज्याचा पाडाव (मिडवेची लढाई)	अनु. निर्मला मोने	६०

संस्कारक्षम कथा / कविता

सूर्यास्त	वि.स. खांडेकर	३०
यज्ञकुंड	वि.स. खांडेकर	३०
मध्यरात्र	वि.स. खांडेकर	४०
घरटे	वि.स. खांडेकर	४०
अस्थी	वि.स. खांडेकर	३०
सैनिक हो...तुमच्यासाठी	आनंद यादव	३०

हॅरी पॉटर मालिका मूळ लेखिका : **जे.के. रोलिंग**

हॅरी पॉटर आणि परीस	बाळ उर्ध्वरेषे	१६५
हॅरी पॉटर आणि रहस्यमय तळघर	मंजूषा आमडेकर	१९५
हॅरी पॉटर आणि अझकबानचा कैदी	प्रियंका कुलकर्णी	१९५
हॅरी पॉटर आणि अग्निचषक	मंजूषा आमडेकर	३२५

ओळखा पाहू

पंडिता रमाबाई यांच्या जीवनावर कादंबरी लिहिणाऱ्या आणि अरविंद आश्रमातील माताजींचा आशीर्वाद मिळवणाऱ्या नामवंत लेखिका

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक ५ जून २०१० पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल जुलै २०१०च्या अंकात जाहीर होईल.

उत्तरे पाठविण्याचा पत्ता :

मेहता पब्लिशिंग हाऊस, माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

मार्च अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

स्वतंत्र भारताच्या अवकाश संशोधन कार्यक्रमाचे जनक डॉ.विक्रम साराभाई

स्पर्धेचे विजेते - **सुहास हरीबा जाधव - नांदगाव**

संजय इंगळे, दिलीप पाटील - नाशिक, शि.वा. आठवले, अनिकेत भालेराव, माधवी काळे, गो.का. आकुत, शमिका धर्मे - पुणे, कल्पना शेंद्रे - चंद्रपूर, राजेश तायडे, गिरीजा कंठे, उषा कंठे - अमरावती, परिमल असनारे - अकोला, पुर्वा दिंडोरे, शुभा शिंदे, अथर्व मोहिते - कोल्हापूर, व्यंकटेश माणेकरी, भीमराव गुंडे, - सोलापूर. ग. ना. कापडी - गोवा, शिवदास मुधोळकर, सुरेश पिरकर - मुंबई, राघव चोपकर - नागपूर, अरविंद झगडे, सुरज झगडे, रीना झगडे - खेर्डी, आशा आठले - इन्दौर

प्रायोजक

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,
साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

सूचना - प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत

एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%

एक वर्षाची	तीन वर्षांची	पाच वर्षांची
वर्गणी १५०रु.	वर्गणी ३५०रु.	वर्गणी ५००रु.

तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
'चतुर बोकोबा आणि नशीबवान शेखर'
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!
पोस्टेज २० रू.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
'शिवणकला–एक छंद'
(सलवार कमीज । स्कर्ट-ब्लाऊज
इव्हिनिंग गाऊन्स । मिडी)
लेखिका : हेमा कळके
हे ८० रू. चे
पुस्तक भेट !
पोस्टेज २० रु.

भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच

मेहता मराठी ग्रंथजगत, द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९४

वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 May 2010

नवीन

स्लमगर्ल ड्रीमिंग

रुबिना अली. मुंबईच्या एका झोपडपट्टीत राहून चंदेरी चित्रपट सृष्टीतली चमचमती तारका बनण्याचे स्वप्न पाहणारी एक मुलगी. वय केवळ ८-९ वर्षांचं. मात्र तिचं हे स्वप्न एक दिवस खरोखरीच साकार होतं आणि ती थेट ऑस्करपर्यंत मजल मारते. 'स्लमडॉग मिलेनिअर'मधल्या या चिमुरड्या चित्रतारकेचा हा ऑस्करपर्यंतचा प्रवास आपल्याला या पुस्तकात बघायला मिळेल– तोही तिच्याच शब्दांत!



ऑस्कर जिंकूनही पुन्हा त्याच बकाल वस्तीत परत येणाऱ्या रुबिनामधे बालसुलभ निरागसता आणि परिस्थितीनं शिकविलेलं शहाणपण यांचं मजेदार मिश्रण आढळतं. कादंबरीच्या अखेरच्या भागात तर अतिक्रमण विभागाकडून तिचं ते झोपडंही पाडण्यात येतं आणि नाईलाजाने ते लोक तिच्या अब्बांच्या मित्राच्या घरी राहायला जातात. एकीकडे असं चटका देणारं दाहक वास्तव तर दुसरीकडे हॉलीवुडच्या झगमगत्या दुनियेत. अनुभवलेली रेड कार्पेट ट्रीटमेंट!! तो मानसन्मान, ते सत्कार समारंभ, ती यशाची धुंदी!.... तिचा दुर्दम्य आशावाद; तो ही इतक्या लहान वयात; कौतुकास्पदच!

रूबिना अली अनुवाद : **मैत्रेयी जोशी**

किंमत– १२० रु. **पोस्टेज –२५ रु.**

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति,

_____

_____

_____

_____

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.